




# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, बुधवार २९ आक्टोबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०










## बैठकीला बोलावून अटक करण्याचा सरकारचा डाव-कडू

**नागपूर/प्रतिनिधी :** शेतक-यांच्या कर्जमाफीच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला तीव्र स्वरूप आले असून माजी आमदार बच्चू कडू यांनी सरकारवर थेट आरोप केला आहे की, बैठकीला बोलवून आपल्याला अटक करण्याचा सरकारचा डाव होता. बैठकीची गरज काय, थेट निर्णय घ्या, असे सांगत कडू यांनी सरकारच्या भूमिकेवर नाराजी व्यक्तकेली. त्यांनी सांगितले की, यापूर्वी दहावेळा आम्ही बैठका घेण्यासाठी विनंती केली, पण सरकारने प्रतिसाद दिला नाही. आता मोर्चा निघाल्यावर आम्हाला बैठकीसाठी बोलावणे म्हणजे आंदोलन कमकुवत करण्याचा प्रयत्न आहे. आंदोलक जनतेला वा-यावर सोडून आम्ही बैठकीला गेलो आणि त्यानंतर आम्हाला अटक केली, तर ते अन्यायकारक ठरेल. कडू यांनी स्पष्ट केले की, आता सरकारच्या कोणत्याही बैठकीला ते उपस्थित राहणार नाहीत आणि शेतक-यांच्या हितासाठी सरकारने तातडीने कर्जमाफीचा निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखालील ट्रॅक्टर मोर्चा नागपूरच्या दिशेने निघाला असून सध्या तो बुटीबोरी येथे दाखल झाला आहे. मोठ्या संख्येने शेतकरी ट्रॅक्टरसह सहभागी झाल्याने तेथील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. या आंदोलनामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. सुरक्षा दृष्ट्या प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला असून मुख्यमंत्री यांचे नागपुरातील धरमपेठ मधील निवासस्थान, सिव्हील लाइन्स मधील कामगिरी हे शासकीय निवासस्थान आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय येथे पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. कोणताही अप्रिय प्रकार घडू नये म्हणून पोलीस आणि वाहतूक विभाग पूर्ण सतर्कतेने काम करत आहेत. आंदोलक वर्धा येथून बुटीबोरीत दाखल झाले आहेत. रॅलीत हजारो ट्रॅक्टर, बैलगाड्या आणि मेंढपाळ

(पान २ वर)

> सरकारच्या कोणत्याही बैठकीला उपस्थित राहणार नाही



### बच्चू कडू यांचा इशारा

**जर आमच्या मागण्या त्वरित पूर्ण झाल्या नाहीत तर उद्या दुपारी 12 वाजता रेल्वे गाड्या बंद करण्याचा आणि 'भारत बंद' पाळण्याचा निर्णय घेतला जाईल.**

'गेल्या अनेक दिवसांपासून, आम्ही सरकारकडून कर्जमाफी आणि शेतक-यांशी संबंधित इतर मागण्यांसाठी निदर्शने, याचिका आणि मार्गदर्शक बैठका घेउन सातत्याने मागणी करत आहोत. तथापि, सरकारने जाणूनबुजून या मागण्यांकडे दुर्लक्ष केले आहे. आज संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी, शेतमजूर, मजूर, अपंग, मच्छीमार आणि पशुपालकांनी नागपुरात इतिहास घडवला आहे. आमच्या ताकदीमुळे आज नागपूरचे रस्ते पूर्णपणे ठप्प झाले आहेत! जर आमच्या मागण्या त्वरित पूर्ण झाल्या नाहीत, तर आम्ही उद्या दुपारी 12 वाजता गाड्या बंद करून 'भारत बंद' पाळण्याचा निर्णय घेउ. हा लढा आता काही व्यक्तींपुरता मर्यादित राहिलेला नाही; हा संपूर्ण महाराष्ट्राचा लढा आहे.' ● बच्चू कडू

## दोन-चार मंत्र्यांना कापा-तुपकर

**नागपूर :** शेतकरी कर्जमाफीच्या मागणीसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली आज नागपुरात सीमेवर मोर्चा काढला. स्वाभिमानी शेतकरी संघटना आणि विविध शेतकरी संघटनांचा उपस्थितीने हा मोर्चा झाला, ज्यामुळे नागपूर-हैदराबाद महामार्ग काही काळासाठी ठप्प झाला. बच्चू कडूंनी सरकारला दिलेल्या अल्टिमेटमची

(पान २ वर)



## महाएल्गारमुळे वर्धा, चंद्रपूर वाहतूक पूर्णतः ठप्प

### रात्रभर मुक्कामाच्या तयारीने आंदोलक मैदानात

**नागपूर/प्रतिनिधी :** सरसकट कर्जमाफी, सातबारा कोरा करा, दिव्यांगांना न्याय द्या, या व अन्य अशा २० प्रमुख मागण्यांसाठी आक्रमक झालेले माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या महा एल्गार आंदोलनामुळे वर्धा, चंद्रपूर, हैदराबादसह अमरावती आणि जबलपूर महामार्गावरील वाहतूक मंगळवारी सायंकाळी सहा नंतर पूर्णतः ठप्प झाली. आक्रमक झालेले शेतकरी संपूर्ण वर्धा मार्गावर ठिय्या मांडून बसले आहेत. जामठा येथील कापूस संशोधन केंद्राच्या ३० एकर मैदानासह संपूर्ण वर्धा मार्गावर आंदोलक पसरल्याने नागपूरकडे येणारी सर्व वाहतूक जागच्या जागी खोळंबली आहे. संभाव्य परिस्थिती पाहता आंदोलक समृद्धी महामार्गावर पोहोचू नये यासाठी पोलीसांनी समृद्धीच्या आरंभबिंदूकडे जाणारा मार्गही पूर्णतः बंद केला आहे.

विदर्भासह मराठवाड्यातील २५ हजारांहून अधिक शेतकरी एल्गारच्या तयारीने मैदानात उतरल्याने सरकारला देखील धडकी भरल्यासारखी परिस्थिती आहे. वर्धेसह, चंद्रपूर, हैदराबाद आणि जबपूरवरून बाह्यवळण रस्ता मार्गे नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटकडून अमरावतीच्या दिशेने जाणारी आणि तिकडू येणारी सर्व वाहतूक व्यवस्था ठप्प पडली आहे. बुटीबोरी ते जामठा रस्ता संपूर्णपणे आंदोलनामुळे जाम झाला आहे. आंदोलक शेतक-यांनी संपूर्ण वर्धा मार्गावर ठाण मांडल्याने मिहान पुलाखाली देखील चक्का जाम झाला आहे. महा एल्गारची धास्ती घेतलेल्या राज्यसरकारने सिव्हिल लाईन्स परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे. त्यामुळे संपूर्ण सिव्हिल लाईन्सला छावणीचे स्वरू प आले आहे. रोज सायंकाळ गजबजणारा वाकर्स स्ट्रीट वाहतूकीस पूर्णपणे बंद करण्यात आला. रोज पायी फिरणा-यांना देखील मंगळवारी या मार्गावर मनाई करण्यात आली. कामगिरीकडे येणा-या सर्व मार्गांवर पोलिसांनी बॅरिकेट्स लावून वाहतूक थांबवली आहे. सोबतच आंदोलक राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय असलेल्या महाल आणि रेशिमबागकडेही जाउ

(पान २ वर)

## आठव्या वेतन आयोगास मंजुरी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्र सरकारने आठव्या वेतन आयोगास मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे केंद्र सरकारच्या तब्बल ५० लाख कर्मचा-यांना व निवृत्ती वेतनधारकांना फायदा मिळणार आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याबाबतची माहिती देताना सांगितले की हा आयोग १८ महिन्यांच्या आत आपल्या शिफारसी सादर करेल. न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई या नवीन वेतन आयोग समितीच्या अध्यक्ष असतील, त्यांच्याबरोबर प्राध्यापक पुलक घोष आणि पंकज जैन यांची देखील नेमणूक करण्यात आली आहे. ही समिती वेतन संरचना आणि भत्ते यामध्ये सुधारणा करेल. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे केंद्रीय कर्मचा-यांची अनेक वर्षांपासूनची मागणी आता पूर्ण होताना दिसत आहे. यासह केंद्र सरकारने पोषक तत्त्वांवर आधारित अनुदानासही मान्यता दिली आहे. रब्बी पिकांच्या उत्पादनासाठी ३७,९५२ कोटी रु पयांचं अनुदान देण्याची घोषणा करण्यात आली आहे. यामुळे शेतक-यांच्या खिशावरील ओझं थोडं कमी होणार आहे.




***नव्या वेतन आयोगाच्या समितीत कोण?***

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निवेदनानुसार आठवा वेतन आयोग ही एक तात्पुरती संस्था असेल. त्यामध्ये एक अध्यक्ष (रंजना प्रकाश देसाई), एक सदस्य सचिव आणि एक सदस्य असतील. मंत्रालये, राज्ये व कर्मचारी प्रतिनिधींशी चर्चा करून ही समिती स्थापन करण्यात आली आहे.

***न्यायमूर्ती रंजना देसाई आयोगाच्या अध्यक्षपदी-*** न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई या नवीन वेतन आयोग समितीच्या अध्यक्षा असतील. त्यांच्याबरोबर प्राध्यापक पुलक घोष व पंकज जैन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही समिती केंद्रीय कर्मचा-यांची वेतन रचना व भत्ते सुधारेल अशी अपेक्षा आहे. १८ महिन्यांच्या आत या

(पान २ वर)

## राज्यावर 'मोंथा'चे संकट



**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रासह ५ राज्यांवर मोंथा चक्रीवादळाचे संकट घोंघावत आहे. मोंथा चक्रीवादळामुळे आंध्र प्रदेश किना-यावर मोठ्या प्रमाणात स्थलांतर सुरू आहे. वाढता धोका पाहता सरकारने पाचही बाधित राज्यांमध्ये २२ एनडीआरएफची पथके तैनात केली आहेत. आतापर्यंत आंध्र प्रदेश, ओडिशा, पुद्दुचेरी, तामिळनाडू आणि छत्तीसगडमधील सर्व बाधित भागात एनडीआरएफ पथके

(पान २ वर)

> महाराष्ट्रातील भागात मुसळधार पावसाची शक्यता

## पुढच्या आठवड्यात आचारसंहिता?

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रमुख विरोधी पक्षांनी आधी मतदारयाद्या दुरु स्त करा आणि नंतर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची मागणी केली असली, तरी नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात या निवडणुकांचा बिगुल फुंकला जाणार असल्याचे समजते. आधी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपरिषदा व नगरपंचायती यांच्या निवडणुका घेण्याची तयारी राज्य निवडणूक आयोगाने केली असून, यापैकी सर्वप्रथम कोणत्या निवडणुकांचा बार उडतो, याकडे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक प्रक्रिया जानेवारी महिन्याच्या अखेरीपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने या निवडणुकांसाठी तयारी सुरू केली आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी गट आणि गण रचना, आरक्षण जाहीर केले आहे. नगरपरिषद



आणि नगरपंचायतींसाठीही नगराध्यक्ष आरक्षण, प्रभाग रचना, तसेच प्रभागनिहाय आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. महापालिकांसाठी प्रभाग रचना तयार केली असली, तरी अजूनही आरक्षण जाहीर करणे बाकी आहे.उपलब्ध माहितीनुसार, प्रथम जिल्हा परिषद, पंचायत समिती, तसेच नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुका घेतल्या जाणार आहेत. त्यातही नगरपरिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका आधी होण्याची शक्यता आहे. त्यानंतर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक घेतली जाईल, अशी चर्चा आहे, हा क्रम बदलूही शकतो. सर्वात शेवटी महापालिका निवडणुकांचा रणसंग्राम होईल, अशीही शक्यता आहे.






## आदित्य ठाकरेंनी महाराष्ट्राचा पप्पू बनू नये

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. या अनुषंगाने सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी जोरदार मोर्चे बांधणी सुरू केली आहे. यातच सोमवारी मुंबईत ठाकरे गटाचा एक मेळावा पार पडला. या मेळाव्यात बोलताना उद्धव ठाकरे यांनी अमित शाह यांचा ॲनाकोंडा असा उल्लेख केला. त्यामुळे राजकारण तापलं असून भाजपासह शिवसेना शिंदे पक्षाच्या नेत्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. दुसरीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आदित्य ठाकरे यांचा पप्पू असा उल्लेख केला आहे. शिवसेना (उबाठा) आमदार आदित्य ठाकरे यांनी सोमवारी (२७ ऑक्टोबर) मतचोरीवरू न राज्य सरकार

(पान २ वर)



## 'निवडणुकीत लक्ष्मी दर्शन, कुणाला चपटी, कुणाला कोंबडं बकरू लागतं, तयारी ठेवा'

### अजित पवारांच्या आमदाराचे विधान

**मुंबई/प्रतिनिधी :** दिवाळी संपताच राज्यभरात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. प्रत्येक पक्षाकडून स्थानिक नेते, इच्छुक उमेदवारांना तयारीला लागण्याचे आदेश दिले जात आहे. अशातच अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार प्रकाश सोळंके यांनी निवडणुकीत खर्च करण्याची तयारी ठेवा अशा आशयाचे विधान केले आहे. 'नुसती निवडणूक लढवायची इच्छा असून उपयोग नाही. तुमच्याकडे किती 'दारू'गोळा आहे, याची माहिती आम्हाला द्या', असे प्रकाश सोळंके म्हणाले. माजलगाव येथे २७ ऑक्टोबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेसची कार्यकर्ता बैठक झाली.



या बैठकीत बोलताना प्रकाश सोळंके यांनी हे विधान केले. त्यांच्या विधानाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

आमदार प्रकाश सोळंके म्हणाले, 'माझ्या विधानसभेच्या निवडणुकीत कार्यकर्त्यांनी कसे मतदान घेतले हे त्यांना चांगले माहिती आहे. ते एक्सपर्ट झाले आहेत. शेवटच्या दोन दिवसात कुणाला चपटी द्यावी लागते. कुणाला कोंबडं कापावं लागतं आणि कुणासाठी बकरु कापावं लागतं. कुणाला लक्ष्मी दर्शन घडवावं लागतं. पण, यात तुम्ही एक्सपोर्ट बनलेले आहात.'

**नुसती निवडणूक लढवण्याची इच्छा असून उपयोग नाही-** 'माझ्या अनेक निवडणुका तुम्हीच लढवल्या आहेत. आपण घेतलेल्या अनुभवाचा वापर या निवडणुकीमध्ये करावा लागणार आहे. इच्छुक उमेदवारांनी त्यांच्याकडे काय दारूगोळा उपलब्ध आहे, याची माहिती सुद्धा आम्हाला द्यावी लागणार आहे. निवडणूक लढवण्याची नुसती इच्छा असून उपयोग नाही, तर बंदुकीतून गोळ्या झाडाव्या लागतात, असे

(पान २ वर)

### भारताचा मोठा निर्णय, रशियाबरोबर विमान निर्मितीचा ऐतिहासिक करार

## आता भारतात प्रवासी विमान तयार होणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** गेल्या काही दिवसांपासून अमेरिका आणि भारतामधील व्यापारी संबंध ताणले गेले आहेत. याचं कारण म्हणजे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे भारताच्या व्यापार धोरणांवर आणि आंतरराष्ट्रीय धोरणांवर सातत्याने टीका करत आहेत. एवढंच नाही तर डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर जवळपास ५० टक्के आयात शुल्क लादलं आहे. त्यांमुळे भारताला मोठ्या प्रमाणात फटका बसत आहे. यातच भारताने रशियाकडून तेल आयात करू नये म्हणून ट्रम्प सातत्याने टीका करत आहेत. मात्र, अमेरिकेच्या या दबावाला भारत जुमानत नाहीये. यातच आता एक मोठी बातमी समोर आली आहे.



(पान २ वर)




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# दर्यापूर नगर परिषदेत सहा कोटी रुपयांची विकास कामे मॅनेज करण्याचा डाव

**खल्लार/प्रतिनिधीः-** नगरपालिका दर्यापूर मध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना, नगरोत्थान, दलितेत्तर विकास निधी, नगर परिषद फंड अंतर्गत दहा कोटी रुपयांचे विकास कामाची निविदा नगरपालिका प्रशासनाने प्रकाशित केली असून या निविदेमध्ये जवळपास ६ कोटी २० लाख रुपयांच्या अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना मध्ये प्रशासनाचे हे टेंडर मॅनेज करण्याचा डाव दिसून येत आहे.

विविध योजना अंतर्गत एकाच दिवशी १७ ऑक्टोंबर २५ ला ७ निविदा प्रकाशित करण्यात आल्या मात्र दोन निविदामध्ये विशिष्ट कंत्राटदाराला लाभ पोहोचावा यासाठी एका राजकीय व्यक्तीच्या सांगण्यानुसार कंत्राट दाराजवळ मालकीचा किंवा भाडे करार पद्धतीने आर एम सी प्लांट असणे बंधनकारक राहील आर एम सी कॉंक्रीट मिक्स प्लांट किंवा ट्रम्प टाईप मिक्सर २५ किलोमीटरच्या आत असणे बंधनकारक राहील. यासह प्रतिज्ञापत्र हे काही जाचक अटी टाकून निविदा मागवण्यात येत आहे. अशी अट टाकण्यात आल्याची विश्वसनीय माहिती आहे. १० लाखापेक्षा कमी दराच्या विकास कामांना सुद्धा अशा अटी टाकून एका विशिष्ट कंत्राटदाराला लाभ पोहोचावा यासाठी या अटी टाकण्यात आलेल्या आहेत . जेणेकरून मर्जीतल्या कंत्राटदाराला सी एस आर दराने कॉन्ट्रॅक्ट मिळेल आणि त्यातून आपल्याला भरपूर मलाई खाता येईल असा सर्व नगरपालिका प्रशासनाचा डाव दिसून येत आहे. या अटीमुळे जिल्ह्यातील विविध कंत्राटदारांना भाग घेता येणार नाही व नगरपालिकेमध्ये स्पर्धा होणार नाही. यापूर्वी नगरपालिकेत स्पर्धा होऊन टेंडर २५ ते ३० टक्के कमी दराने देण्यात आलेले आहे.त्यामुळे नगरपालिकेचा आर्थिक लाभ झालेला आहे. मर्जीतल्या ठेकेदारासाठी विशिष्ट अटी टाकून या विकास कामांमध्ये



जवळपास नगरपालिकेला १कोटी ७५ लाख रुपयाचे आर्थिक नुकसान होणार आहे. मागे सुद्धा अशाच प्रकारे नगरपालिकेने टेंडर मॅनेज करण्याचा डाव टाकला होता. मात्र वर्तमानपत्राने लावलेल्या बातम्यांमुळे नगरपालिकेत स्पर्धा दिसून आली व प्रत्येक निविदेवर जवळपास सात ते आठ निविदा २५ ते ३० टक्के कमी दराने निविदा टाकूनभाग घेतला होता. मात्र नगरपालिका प्रशासनाने टेंडर मॅनेज होत नसल्यामुळे निविदा न उघडता त्या रद्द केल्या आणि पुन्हा टेंडर मॅनेज करण्यासाठी विशिष्ट कंत्राटदाराला लाभ पोहोचावा यासाठी कंत्राटदाराच्या सोयीनुसार अटी टाकण्यात आलेल्या आहेत जेणेकरून नगरपालिका प्रशासनाला भरपूर मलाई खाता यावी. या मॅनेज करण्याच्या प्रक्रियेमध्ये एका विशिष्ट राजकीय नेत्याने कंत्राटदार कडून अगोदरच अ?डव्हान्स पेमेंट घेतल्याचे बोलले जात आहे. तरी प्रशासनाने या जाचक अटी रद्द करून सर्व कंत्राटदारांना या स्पर्धेमध्ये भाग घेता यावे याकरिता या जाचक अटी रद्द करून फेरनिविदा लावावी याकरीता जिल्हाधिकारी अमरावती, व विभागीय आयुक्त अमरावती यांनी यामध्ये हस्तक्षेप करावा जेणेकरून नगरपालिकेच्या निविदा प्रक्रियेत स्पर्धा होऊन नगरपालिकेचे १कोटी ७५ लाख रुपयांचे आर्थिक नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी समिती नेमून करण्यात यावी अशी दर्यापूर शहर वासियांनी एकमुखी मागणी केली आहे.

# साथी पोर्टलची अंमलबजावणी बंद करा

## कृषी विक्रेत्यांचा एकदिवसीय संप

**मोर्शी/प्रतिनिधीः-** शासनाने कृषी विक्रेत्यांसाठी लागू केलेल्या 'साथी पोर्टल' प्रणालीविरोधात आज मोर्शी तालुक्यातील सर्व कृषी विक्रेत्यांनी आपले व्यवसाय बंद ठेवून एकदिवसीय संप पुकारला. या निर्णयामुळे शहरातील सर्व कृषी सेवा केंद्रे बंद राहिल्याने शेतकऱ्यांना खते, बियाणे आणि औषधांसाठी धावपळ करावी लागली. कृषी विक्रेत्यांनी सांगितले की, साथी पोर्टलचे नियम अतिशय क्लिष्ट असून त्यातील कार्यपद्धती वेळखाऊ व त्रासदायक आहे. त्यामुळे व्यवसाय करणे कठीण झाले आहे. या पार्श्वभूमीवर अमरावती जिल्ह्यातील सर्व कृषी विक्रेत्यांच्या असोसिएशनने एक दिवसासाठी संपूर्ण विक्री केंद्रे बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. संपाला महाराष्ट्र राज्य कृषी विक्रेता संघटनेचाही पाठिंबा मिळाला असून, साथी पोर्टल रद्द करण्याची मागणी तीव्र झाली



आहे. यासंदर्भात मोर्शी तालुका कृषी संघाच्या असोसिएशनतर्फे उपविभागीय कृषी अधिकारी यांना निवेदन देण्यात आले.कृषी विक्रेत्यांनी शासनाने शेतकरी व विक्रेता दोघांच्याही अडचणी लक्षात घेऊन साथी पोर्टल तात्काळ रद्द करण्याची मागणी केली याप्रसंगी सुहास ठाकरे, उपाध्यक्ष गोपाल मंत्री , सचिव गणेश उमाळे, विनोद सोनटक्के, गोविंद लढा तसेच इतर सभासद उपस्थित होते.

# दीपक देशमुख यांचे निधन

**अमरावती/प्रतिनिधीः-**



अमरावती शहरातील अंबागेटच्या आत मधील ज्येष्ठ नागरिक तसेच श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ पैलवान व अमरावती शहर जिल्हा कुस्ती संघटनेचे सोशल मीडिया प्रमुख पै.समीर देशमुख यांचे वडील दीपक देशमुख (वय६६) यांचे आज सकाळी दुःखद निधन झाले. त्यांची अंतिम यात्रा त्यांच्या निवासस्थान मृगेंद्र मठ अंबागेट येथून दुपारी ५ वाजता निघाली.

त्यांच्या पश्चात परिवारामध्ये दोन मुलं समीर ,शुभम आणि एक मुलगी अंकिता असा परिवार आहे. ते अत्यंत मनमिळावू सामाजिक व क्रीडा कार्यामध्ये आवड ठेवणारे होते.

# बस स्थानक परिसराने घेतला मोकळा श्वास

## पोलिसांनी हटविले चौकातील ऑटो स्टॅण्ड

**चांदूरबाजार प्रतिनिधीः-** शहरातील सर्वच चौकांना अनेक वर्षापासून, वाहतूक कोंडीच्या समस्येचा सामना करावा लागत आहे.अशातच बस स्थानक परिसर व पोलीस स्टेशन समोर , ऑटो धारकांनी अनधिकृत वाहनतळ तयार केले होते. या अवैध वाहतूकीची मजल तर, बस स्थानक वाहने उभे करण्यापर्यंत गेली होती.या अवैध वाहनतळामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांना, एस.टी.च्या वाहनांना व नागरीकांना ही मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता.या त्रासाला पोलिस ही अपवाद नव्हते.बस स्थानक चौकातील वाढत्या गर्दीचा विचार करता स्थानिक पोलिसांनी,धडक मोहीम राबवून अनधिकृत ऑटोस्टँड हटविण्याची कारवाई केली. पोलिसांच्या या



कारवाईमुळे, बस स्थानक परिसराने मोकळा स्वास घेतला आहे. बस स्थानक परिसरात अवैध वाहतूक करणारे काही ऑटो चालकांनी नियमांचे उल्लंघन करून, बस स्थानकाच्या प्रवेशद्वारावर व रस्त्यांचे कडेलाच तात्पुरते ऑटो स्टॅण्ड तयार केले होते.त्यामुळे एस.टी.बस व इतर वाहनांना वळण घेण्यास मोठी अडचण निर्माण होत होती. हे सर्व पोलिस स्टेशनच्या समोरच घडत होते.अनेक वेळा या बाबत नागरीकांनी आपला संताप ही व्यक्त केला होता. तर या परिसरात होणा-या वाहतूक कोंडी बाबत, तक्रारी ही दाखल करण्यात आल्या होत्या.अखेर या तक्रारींची दखल घेत पोलिस निरीक्षक अशोक जाधव यांचे मार्गदर्शना खाली, स्थानिक पोलिसांनी पोलिस पथकासह धडक कारवाई केली. बस स्थानक चौकशी वाहतूक कोंडी

दूर करण्यासाठी, अवैध ऑटो स्टॅण्ड हटवून ऑटो चालकांना नियमांचे पालन करत कोठेही ऑटो उभे न करण्याचे आदेश दिले.यावेळी परिसरात मोठा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. अनधिकृत ऑटो स्टॅण्ड हटवितांना, सुरवातीला काही ऑटो चालकांनी या कारवाईला विरोध करण्याचा प्रयत्न केला.मात्र पोलीसांच्या धडक कारवाई पुढे,अखेर त्यांना ही पोलिसांना सहकार्य करणे भाग पडले. आता हा मार्ग वाहतूकीसाठी सध्या तरी मोकळा झाला आहे.

बंद ठेवून नागरिकांना चालणे, धावणे, सायकल चालविणे, योगाभ्यास, नृत्य, खेळ, संगीत, कला आणि सांस्कृतिक उपक्रम अशा विविध उपक्रमाचा आनंद घेण्याची संधी दिली जाणार आहे.

महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, या उपक्रमामुळे शहरातील नागरिकांना आरोग्यवर्धक जीवनशैली स्वीकारण्याची प्रेरणा मिळेल, तसेच सामाजिक ऐक्य वाढेल. कार्यक्रमाच्या सुरळीत आयोजनासाठी विविध विभागांमधील समन्वय, नागरिकांचा सहभाग आणि शिस्तबद्ध नियोजन यावर विशेष भर देण्यात येणार आहे.

त्यांनी नागरिकांनाही आवाहन केले की, 'हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रत्येक अमरावतीकराने उत्साहाने सहभाग घ्यावा आणि शहराचे नाव उज्ज्वल करावे.' अमरावती शहरातील विविध वृत्तपत्रांनाही या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले. अमरावती शहरातील ज्यांनाही या उपक्रमात सहभागी व्हायचे असेल त्यांनी आपला प्रस्ताव आयुक्त कार्यालयात देण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

अमरावती महानगरपालिकेचा हा उपक्रम शहराच्या नागरी जीवनात नवीन ऊर्जा निर्माण करणार असून, नागरिकांच्या आरोग्यदायी आणि सुसंवादी जीवनशैलीकडे वाटचाल घडवून आणणारा ठरणार आहे.

या बैठकीत सहाय्यक जिल्हाधिकारी कौशल्या एम., अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त डॉ.मेघना वासनकर, उपायुक्त नरेंद्र वानखडे, अ?ड.प्रशांत देशपांडे, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव, बाजार परवाना विभागाचे सहाय्यक आयुक्त दिपक खडेकार, अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश रघटाटे, क्रीडा विभागाचे अधिकारी प्रविण ठाकरे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी पंकज सपकाळ, विविध विभागांचे अधिकारी, वाहतूक पोलीस विभागाचे वरिष्ठ अधिकारी, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना आणि स्थानिक नागरिक प्रतिनिधी उपस्थित होते.

## चेन स्नेचिंग करणाऱ्या दोन

स्नेचिंग आणि बॅग मधून पर्स चोरी करताना लोकांना दिसल्या. नागरिकांनी तात्काळ धावून या दोन्ही महिलांना पकडले. यामुळे प्रवाशांचे साहित्य चोरी होण्यापासून वाचले. बडनेरा पोलिसांना याची माहिती देण्यात आली. माहिती मिळताच बनडेरा पोलीस तिथे पोहचले. त्यांनी दोन्ही महिलांना ताब्यात घेतले. त्यांच्या कडून विचारपूस केली जात आहे.

## वनबंधू परिषदेचा अमरावतीत भव्य

भाषणात एकल अभियानाच्या राष्ट्रीय सेवाकार्यांचा गौरव केला व दानधर्माचे महत्त्व सांगितले. त्यांनी आपल्या परिवारातर्फे दरवर्षी उत्पन्नाच्या ८ टक्के रक्कम समाजसेवेसाठी देण्यात येते, अशी माहिती दिली.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी मिळून एकूण ८८ एकल विद्यालयांचे दत्तक घेण्याचे आश्वासन दिले. त्यामध्ये नानकजी नेभनानी ने २५, चंद्रकुमार जाजोदीया (लप्पीभैय्या) २१, दिलीप भाई पोपट ३, प्रदीप जैन १, राजकुमार जी बर्डिया २,आशीष जखोटिया २, मनोज जैन २, श्याम पिंजांनी १, श्यामसुंदरजी राठी १, राजेश डागा १, मुकेश अग्रवाल १, सत्यनारायण अग्रवाल १, गोपाल बजाज १, दर्शन कलंत्री १, विनोद कलंत्री १, सुरेंद्रजी चोरडिया १, सितारामजी राठी १, मुकेश लोहिया १, ठाकूरदास लड्डा १, ओमप्रकाश लड्डा १, आर बी अटल ५, गजानन वाकोडे १, डॉक्टर सुरेशजी रुंगठा २, प्रकाश तारेकर १, जुबीन धोतीवाला २, अनिलसिंग गौतम १, गोविंद सोमानी १, मीनाक्षी सिकची २, कुंजनजी वेद १, आशा लड्डा १, माधुरी छावछरीया १ , पवन मोंडे १ इत्यादींचा समावेश होता.

कार्यक्रमाचे सुंदर संचालन डॉ. राकेश बडगुजर यांनी केले. अध्यक्ष ओमप्रकाश नावंदर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. या भव्य समारंभाला शहरातील अनेक मान्यवर, दानशूर व महिला प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात सुनीता राठी, उषा करवा, संगीता टवाळणी, राधा काकांनी, नीता कलंत्री, पुष्पा राठी , ज्योती कंडालिया , बंकटलाल राठी, श्याम अग्रवाल, राजकुमार टवानी, संजय जाजू, डॉक्टर नंदकिशोर भुतडा, प्रवीण जाजू, डॉक्टर दीपक करवा, गोकुळ कडू, संगीता राठी, डॉक्टर सुषमा राठी, डॉक्टर राधेश्याम राठी, नितीन राठी, प्रवीण चांडक, चेतन कोटेच्या, घनश्याम वर्मा ,अमर करवा ,सुरेंद्र श्रुती ,सुरेश सिंग ठाकूर, पराग बोरगीर, प्रकाश लड्डा, अनिकेत जोशी, दिलीप बोबडे ,रेखा तारेकर, श्याम शर्मा ,नवल किशोर मालपाणी ,मांडवगडे ,डॉक्टर प्रीती वर्मा ,सुदर्शन गांग ,प्रशांत लढा आदि उपस्थित होते.

## माजी राज्यमंत्री वसुधाताई

खरं पाहता वसुधाताई देशमुख सुदृढ आणि निरोगी असून त्यांनी एका व्हिडीओ द्वारे आपण निरोगी असल्याचे सांगीतले आहे.

वसुधाताई देशमुख यांच्या निधनाची खोटी बातमी ऐकताच सर्वत्र गोंधळ व चिंता निर्माण झाली होती. असंख्य चाहते, कार्यकर्त्यांकडून कॅम्प परिसरातील त्यांच्या चिरंतन या निवासस्थानी फोन करून वास्तविक माहिती घेतली जात होती. मात्र या खोट्या बातमीमुळे प्रसार माध्यमांच्या विश्वासहार्यतेवर प्रश्न चिन्ह निर्माण झाले. वसुधाताई देशमुख यांच्या निधनाच्या खोट्या बातमीमुळे सर्वत्र गोंधळ निर्माण होत असतांना त्यांनी एक व्हिडीओ द्वारे आपण निरोगी व सुदृढ असल्याचे सांगीतले आहे.

ैर्ल्ूाग् ेस्ल्व्प् उु

# १ व १० वरिल उर्वरित

## महाएल्गार यात्रेचा दुसरा दिवस...

मत मागताना तुम्ही आमच्या घरात रात्री येता, पण आज आम्ही न्याय मागायला निघालो आहोत, तर तुम्हाला दिवसाढवळ्या आमच्या दारात यायला भीती वाटते का?हा लोकशाहीचा अपमान नाही का?

त्यांनी पुढे विचारलं 'शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे मरणारा शेतकरी हा हिंदू नाही का?त्याच्या मृत्यूवर मौन का पाळता?' असा सवाल शेतकरी नेत्यांनी यावेळी उपस्थित केला.

## स्पाय कॅमेऱ्याने उघड केली

करतोय की काय, असा संशय होता. शेख उस्मान यांनी अखेर २७ ऑक्टोबरच्या रात्री आपल्या घराच्या छतावर स्पाय कॅमेरा लावला. दुसऱ्या दिवशी फूटेज पाहिले, तर शेजारी राहणारा २३ वर्षीय युवक रात्री भिंत ओलांडून घरात शिरताना आणि छतावर चढताना दिसला. शेजाऱ्याने केवळ मजेसाठी हा प्रकार केल्याचे उघड झाले. मात्र या 'भूतकांडामुळे' शेख कुटुंबाला अनेक दिवस अस्वस्थतेत राहावे लागले. अखेर शेख उस्मान यांनी बडनेरा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

## महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या

आणि हिशेब नसल्याचे नमूद केले आहे, ज्यामुळे आर्थिक गैरव्यवहाराच्या शंका निर्माण झाल्या आहेत.

तक्रारीनंतर शिरगावकर यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. या घडामोडीने महाराष्ट्रातील क्रीडा समुदायात खळबळ उडाली आहे, क्रीडा संघटनांच्या शासन आणि आर्थिक व्यवस्थापनाबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

क्रीडा विकास आणि प्रोत्साहनासाठी जबाबदार असलेल्या र्श्ँ कडून पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाची उच्च मानके राखण्याची अपेक्षा आहे. शिरगावकर यांच्याविरुद्धचे आरोप संघटनेची प्रतिष्ठा डागाळले आहे आणि चांगल्या प्रशासनाप्रती त्यांच्या वचनबद्धतेबद्दल प्रश्न निर्माण झाले आहेत.

चौकशी पुढे जात असताना, प्रकरण कसे हाताळले जाईल आणि र्श्ँ आणि त्याच्या नेतृत्वासाठी त्याचे काय परिणाम होतील याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.

## शिवसेना पक्ष कार्यालयासाठी

महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ५१(४) नुसार, पक्षकार्यालयांसाठी जागा वाटप करण्याची तरतूद आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या नियमांनुसार योग्य अशी जागा दिल्यास आम्हाला पक्षाच्या कामकाजास गती देणे सुलभ होईल. आपण या संदर्भात आवश्यक ती कार्यवाही करून लवकरात लवकर जागा उपलब्ध करून द्यावी असेही निवेदनात म्हटले आहे.यावेळी गोविंद दायम विभाग प्रमुख, प्रमोद वानखडे माजी विभाग प्रमुख, श्रीकांत शर्मा युवा सेना सरचिटणीस, रुपेश आलेकर बूथ प्रमुख, संदीप मानेकर, उमेश केडिया, शाखाप्रमुख जुगल दवे ,शाखाप्रमुख राजू हिरे ,विनोद मंडालकर शेगाव प्रभाग प्रमुख, विजय ठाकरे उपशहरप्रमुख पंजाबराव तायवाडे उपशहर प्रमुख, डॉक्टर चंद्रशेखर गिरी ,संजय अडाऊ, अतुल सावरकर विभाग प्रमुख, विनोद शर्मा शाखाप्रमुख, धर्मेश मालवे शाखाप्रमुख, शुभम पाटील विद्यापीठ युवा सेना शाखाप्रमुख, अजमत खान उपशहरप्रमुख ,सुलतान खान विभाग प्रमुख ,शाहिद खान, रामा सोळंके उपजिल्हाप्रमुख, संजय गव्हाळे उपशहरप्रमुख, नितीन तारेकर, बाळा सावरकर उपशहर प्रमुख, मुन्ना चव्हाण विभाग प्रमुख, केतन मसतकर विभाग प्रमुख, सय्यद शकील उपशहर प्रमुख व अनेक शिवसैनिक उपस्थित होते.

## दिवंगत नेते रा. सू. गवई स्मारकाचे

प्रताप अडसड, केवलराम काळे, प्रवीण तायडे, राजेश वानखडे, उमेश उर्फ चंदू यावलकर, गजानन लवटे, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा-चांडक, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र उपस्थित राहणार आहेत.

केरळ आणि बिहारचे माजी राज्यपाल तसेच रिपब्लिकन चळवळीचे ज्येष्ठ नेते दिवंगत रा. सू. (दादासाहेब) गवई यांच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी उभारण्यात आलेल्या भव्य स्मारकामध्ये त्यांचे जीवन कार्य दर्शवणारे स्मृतीसभागृह (म्युझियम) आणि अत्याधुनिक श्रोतगृह (ऑडिटोरियम) यांचा समावेश आहे. स्मारकाच्या दर्शनी भागावर दादासाहेबांचा १५ फूट उंचीचा ब्राँझ धातूचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला आहे. तसेच दादासाहेब गवई यांच्या जीवनाचा आणि कार्याचा प्रवास दर्शविणारे सभागृह तयार करण्यात आले आहे. स्मारकाच्या दर्शनी भागात दादासाहेबांचा २.५ फूट उंचीचा ब्राँझचा अर्धाकृती पुतळा उभारण्यात आला आहे. त्यांचा जीवनपट, दुर्मिळ छायाचित्रांसह, भिंतीवरील १६ डिजिटल पोस्टर्सच्या माध्यमातून प्रदर्शित केला जाणार आहे. अभ्यागतांना त्यांच्या कार्याबद्दल सखोल माहिती मिळावी यासाठी दृकश्राव्य कियॉस्क आणि व्हीडीओ वॉलची सोय उपलब्ध आहे. यासोबतच स्मारकात स्मरणिका दालन देखील उभारण्यात आले आहे. तसेच स्मारकाच्या पहिल्या माळ्यावर २०० आसनी क्षमतेचे अद्ययावत श्रोतगृह तयार करण्यात आले आहे. याशिवाय श्रोतगृहाच्या तळ मजल्यावर अभ्यागतांसाठी आणि कार्यक्रमांसाठी लागणाऱ्या सुविधा म्हणून एक सुसज्ज किचन आणि उपहारगृहाचा समावेश आहे.

## फेक ई-चलानची लिंक ठरली

दिवसांपूर्वी एक संदेश आला. संदेशात लिहिले होते 'आपल्या वाहनावर ट्रॅफिक चालान झाले आहे. तपासण्यासाठी खालील लिंक क्लिक करा.' देशमुख यांनी लिंक उघडताच आणखी एक मेसेज प्राप्त झाला, ज्यामध्ये 'बँक खात्यातील शिल्लक तपासा' अशी लिंक होती. सदर लिंक उघडल्यानंतर काही मिनिटांतच देशमुख यांच्या खात्यातून ऑनलाइन व्यवहाराद्वारे ९३,००० इतकी रक्कम काढण्यात आली. ही घटना लक्षात येताच त्यांनी तत्काळ गाडगेनगर पोलिस स्टेशन गाठले आणि तक्रार नोंदवली. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध माहिती तंत्रज्ञान अधिनियमाअंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला असून, सायबर पोलिसांकडून तपास सुरू आहे. पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, 'अशा प्रकारचे ई-चलान, बँक खाते किंवा केवायसी संबंधित संशयास्पद मेसेज आल्यानंतर त्यावर कधीही क्लिक करू नये. अधिकृत संकेतस्थळावरूनच माहिती तपासावी.' सायबर फसवणुकीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असून, फक्त एक चुकीचा 'क्लिक' आयुष्यभराच्या बचतीवर पाणी फेरू शकतो, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

## अमरावतीत 'हॅप्पी स्ट्रीट प्रोग्राम

यांनी सांगितले की, 'हॅप्पी स्ट्रीट प्रोग्राम म्हणजे केवळ एक उपक्रम नाही, तर तो शहराच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात उत्साह निर्माण करणारा एक उपक्रम आहे. नागरिकांना आनंददायी वातावरण देण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाची भूमिका बजावेल,' असे त्या म्हणाल्या.

'ैप्रॅग' या नावाने ओळखला जाणारा हा उपक्रम देशातील अनेक प्रमुख शहरांमध्ये यशस्वीपणे राबविण्यात आला आहे. आता अमरावतीतही हा उपक्रम सुरू होणार असल्याने नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरणाची निर्मिती होईल. या अंतर्गत शहरातील ठराविक मुख्य रस्त्यांवर सकाळी काही तासांसाठी वाहनांची वाहतूक

○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○

## बैठकीला बोलावून अटक

बांधवांचा सहभाग आहे. आंदोलनासाठी अन्नसामुग्रीची मोठ्या प्रमाणात तयारी करण्यात आली आहे. सोलापूरहून २० हजार भाक-या, मिरची आणि शेंगदाण्याचा खरडा, नाशिकहून कांदा व भाजीपाला, लातूरहून तूरडाळ, तसेच इतर भागांतून हुरडा व अन्नधान्य नागपूरकडे रवाना झाले आहे. दरम्यान आंदोलकांनी दुपारी ५ वाजेपर्यंत सरकारला अल्टिमेटम दिला होता. तो संपला आहे. त्यामुळे आता आंदोलक नागपूरच्या दिशेने कुच करीत आहे. गावोगावी चिवडा बनवण्याचे काम सुरू असून संपूर्ण ग्रामीण महाराष्ट्र या आंदोलनासाठी सज्ज असल्याचे सांगितले जात आहे. शेतक-यांचा सातबारा कोरा करू अशी घोषणा देउन सत्तेत आलेल्या सरकारने आजवर शेतक-यांना दिलासा दिला नाही, असा आरोप आंदोलनकर्त्यांकडून करण्यात आला आहे. ना कर्जमाफी, ना हमीभाव- उलट केंद्र सरकारच्या चुकीच्या आयात-निर्यात धोरणामुळे शेतकरी आर्थिक संकटात आहे. कापसाची आयात वाढल्याने देशांतर्गत भाव घसरले, तर सोयाबीनचा किमान आधारभूत भाव ५ हजार ३३५ रुपये असूनही शेतक-यांना ५०० ते ३ हजार दरम्यानच विक्री करावी लागते, हा कोणता आत्मनिर्भर भारत? असा सवाल शेतक-यांकडून केला जात आहे.

## दोन-चार मंत्र्यांना

मुदत संपल्याने आजचे आंदोलन विशेषतः लक्षवेधी ठरले. मोर्चात प्रमुख शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी आक्रमक भाषण करून राज्य सरकार आणि मंत्र्यांवर तीव्र टीका केली. विधानसभेची निवडणूक होउन एक वर्ष पूर्ण झाले, परंतु शेतक-यांची कर्जमुक्ती का झाली नाही? आम्ही भीक मागायला आलेलो नाही; हा आमचा नैतिक हक्क आहे, असे त्यांनी ठामपणे म्हटले. तुपकरांनी सोयाबीन, कापूस आणि उस यांसारख्या मुख्य पिकांवरील आर्थिक दुर्गत गोष्टींचा उल्लेख करत शेतक-यांच्या आर्थिक संकटाचे दृश्य उभे केले. आज सोयाबीनचा एक क्विंटल उत्पादन खर्च सुमारे साडे सात हजार इतका येतो, पण बाजारात कारभारामुळे तीन ते साडेतीन हजार रुपये भाव मिळत आहेत, असे त्यांनी सांगितले. रविकांत तुपकर यांचे भाषण अनेक ठिकाणी गंभीर आणि वादग्रस्त ठरले. त्यांनी म्हटले, जसं बच्चू भाउ म्हणाले की दोन-चार आमदारांना कापा, तसंच मी सांगतो दोन-चार मंत्र्यांना कापा. आता मागे हटायचं नाही. या वाक्यांनी सभेत उत्साहाचा वेग वाढवला तर विरोधकांकडून तीव्र टीकेचा अंदाजही व्यक्तकेला जातोय. तुपकरांनी पुढे सांगितले की, आता शेतकरी आत्महत्या करणार नाही; आम्ही लढणार आहोत.

## महाएल्गारमुळे वर्धा, चंद्रपूर

शकतात अशी गुप्त सूचना मिळताच पोलिसांनी या दोन्ही ठिकाणी देखील कडेकोट बंदोबस्त वाढवला आहे. जोवर सातबारा कोरा नाही तोवर रस्ता सोडणार नाही आता करो या मरोची लढाई आहे. त्यामुळे जोवर सरकार सातबारा कोरा करत नाही, तोवर वर्धा मार्ग सोडणार नाही, असा खणखणीत इशारा देत प्रहारच्या नेतृत्वाखाली मैदानात उतरलेल्या शेतक-यांनी एल्गार कायम राहणार असल्याचा निर्धार केला. जामठा वरून वाहतूक पुढेच सरकत नसल्याने वर्धा, चंद्रपूरच्या दिशेने आलेल्या अनेकांनी आपली वाहने सोडून पायी शहर गाठले.

## आठव्या वेतन आयोगास

समितीला अंतिम अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. आवश्यकता निर्माण झाल्यास अंतरिम अहवाल देखील सादर केला जाउ शकतो. या अहवालात राष्ट्रीय अर्थव्यवस्थेवर दबाव वाढणार नाही आणि सरकारी खर्च संतुलित राहील याची खात्री केली जाईल.

## राज्यावर 'मोंथा'चे

तैनात करण्यात आली आहेत. पुढील २४ तासांच्या आत २८ ऑक्टोबरच्या रात्री आंध्र प्रदेशच्या समुद्रकिना-यावर मछलीपट्टणम आणि कलिंगपट्टणम दरम्यान काकीनाडाजवळ मोंथा चक्रीवादळ धडकण्याचा अंदाज आहे. मोंथा चक्रीवादळामुळे महाराष्ट्रातील विदर्भात २८ ते ३० ऑक्टोबर दरम्यान मध्यम ते मुसळधार पाउस पडण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने याबाबत घोषणा केली.

## आदित्य ठाकरेंनी महाराष्ट्राचा

व निवडणूक आयोगावर जोरदार हल्लाबोल केला. कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांच्याप्रमाणेच आदित्य ठाकरे यांनी मोठ्या स्क्रीनवर सादरीकरण करत काही कथित पुरावे सादर करत राज्यात मतचोरी होत असल्याचा आरोप केला. यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आदित्य ठाकरे यांना टोला लगावला.

## 'निवडणुकीत लक्ष्मी दर्शन

आमदार प्रकाश सोळंके कार्यकर्त्यांच्या बैठकीत म्हणाले. 'लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. आपण त्यांची अपेक्षापूर्ती करू शकत नाही. मात्र, कुठेही कमी पडता कामा नये. समोरचा माणूस निवडणुकीत जर १०० रुपये खर्च करणार असेल, तर आपलीही १०० रुपये खर्च करण्याची तयारी असावी. आजपर्यंत तुम्ही माझ्यासोबत राहिला आहात. विधानसभेपेक्षा चारपट अधिक वेगाने काम करावं लागणार आहे. चारपट अधिक कष्ट करावे लागतील', अशा सूचना आमदार प्रकाश सोळंके यांनी कार्यकर्त्यांना दिल्या.

## आता भारतात प्रवासी

भारताने रशियाबरोबर विमान निर्मितीच्या क्षेत्रातील ऐतिहासिक करार केला आहे. हिंदुस्तान एरोनाटिक्स लिमिटेड आणि रशियाच्या युनायटेड एअरक्राफ्ट कार्पोरेशन यांनी ऐतिहासिक करार केला आहे. या करारानुसार आता सुखोई सुपरजेट SJ-१०० या नागरी विमानाच्या निर्मितीसाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली आहे. या संदर्भातील वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने दिलं आहे.

वृत्तानुसार, हिंदुस्तान एरोनाटिक्स लिमिटेड आणि रशियाच्या युनायटेड एअरक्राफ्ट कार्पोरेशन यांच्या सहकार्यातून भारत SJ-१०० नागरी प्रवासी विमानांचं उत्पादन करण्यासाठी आता सज्ज झाला आहे. या करारामागचं उद्दिष्ट प्रादेशिक हवाई संपर्क आणि देशांतर्गत उत्पादन वाढवणे हे असून त्यामुळे भारताच्या विमान वाहतूक उद्योगासाठी एक नवीन युग असेल. या प्रकल्पामुळे प्रादेशिक विमानांची मागणी देखील पूर्ण होईल आणि विकासाला चालना मिळेल अशी अपेक्षा आहे.रशियाच्या मॉस्कोमध्ये मंगळवारी या कराराची स्वाक्षरी झाली असून भारताने पहिल्यांदाच संपूर्ण प्रवासी विमानाचं उत्पादन करण्याच्या दिशेनं एक मोठं पाउल टाकलं आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, २९ ऑक्टोबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# वाशिम तहसील कार्यालयातील पुरवठा विभाग भ्रष्टाचारात अव्वल ?




■ पप्पु घुगे ■

**तहसील कार्यालयातील अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग हे नागरिकांच्या जीवनाशी थेट संबंधित असलेले अत्यंत महत्त्वाचे विभागांपैकी एक आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे (PDS) शिधापत्रिकाधारकांना स्वस्त धान्य व आवश्यक वस्तू पुरवण्याचे जबाबदारीचे कार्य या विभागाकडे असते. मात्र, प्रत्यक्षात वाशिम तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात भ्रष्टाचाराची जाळी घट्ट होत चालल्याची चर्चा सर्वत्र रंगू लागली आहे.**

शिधापत्रिकांवरील अनियमितता, धान्य उचल व वाटपातील विलंब, तसेच स्वस्त धान्य दुकानदारांकडून घेतले जाणारे 'हिस्से' या कारणांमुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. जिल्ह्याला मिळणाऱ्या धान्याचे योग्य नियोजन आणि वितरण होणे अपेक्षित असताना, काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने अपात्र लाभार्थ्यांना धान्य मिळत असल्याचे आणि पात्र कुटुंबांना वंचित ठेवण्यात येत असल्याचे आरोप होत आहेत.वजने व मापे विभागातही नियमांची अंमलबजावणी फक्त कागदावरच असल्याचे नागरिकांत चर्चा आहे. दुकानदारांकडून घेतल्या जाणाऱ्या दरमहा 'हप्त्या'च्या बदल्यात अनेक

## नागरिकांमध्ये वाढत आहे असंतोष ; तपासाची मागणी जोर धरतेय

अनियमिततेकडे डोळेझाक केल्याचे उघडपणे सांगितले जात आहे.या सर्व प्रकरणांतून स्पष्ट होते की, वाशिम तहसील पुरवठा विभाग हे जनहितापेक्षा स्वार्थासाठी काम करणारे केंद्र बनले आहे. विभागाची मुख्य जबाबदारी असलेले पारदर्शक वितरण, नियमांची अंमलबजावणी आणि ग्राहक संरक्षण या सर्व गोष्टी केवळ फाईलपुरत्या मर्यादित राहिल्या आहेत. सुज्ञ नागरिक या गैरप्रकारांची सखोल चौकशी करण्याची मागणी करत असून, जिल्हा प्रशासनाने लक्ष घालावे अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. अन्यथा भ्रष्टाचाराचा खेळ नागरिकांच्या पोटावर घाव घालणारा ठरेल.

पुरवठा विभागाचा अतिरिक्त प्रभार असलेले समाधान राठोड हे वारंवार आजारी असल्याचे कारणे देत कार्यालयात गैरहजर असतात अशा अधिकाऱ्याची वैद्यकीय तपासणी करून शारीरिक दृष्ट्या तंदुरुस्त नसलेल्या सदर अधिकाऱ्याला वैद्यकीय तपासणीसाठी मेडिकल बोर्डाला पाठवून खरे खोटे करावे आणि सदरील व्यक्ती जर शारीरिक दृष्ट्या अयोग्य असेल तर सक्तीच्या सेवानिवृत्तीवर पाठवावे अशी मागणी सुज्ञ नागरिक करीत आहेत.

# चोरीच्या घटनांचा तपास जलदगतीने करण्याची मागणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मागील काही महिन्यांमध्ये वाशिम शहरात घडलेल्या घरफोडीच्या व चोरीच्या घटना तसेच मालमत्तांच्या नुकसानीच्या घटनांचा तपास अद्यापही प्रलंबित आहे. या घटनांचा तपास जलद गतीने करून नुकसान भरपाई मिळवून देण्याची मागणी नुकसानग्रस्तांनी पोलीस अधीक्षकांना दि. २७ ऑक्टोबर रोजी निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनानुसार, मागील काही महिन्यांमध्ये वाशिम शहरात भर दिवसा घरफोडी व चोरीच्या घटना घडल्या. यामध्ये दि. ५ जानेवारी रोजी शहरातील इरिगेशन कॉलनी येथील रहिवासी इंजि. सिताराम वाशिमकर यांच्या घरी २५ लाख रुपयांचे रोख व सोन्या चांदीचे दागिने भर दिवसा घरफोडी करून चोरट्यांनी लंपास केले. याच दिवशी सिव्हिल लाईन भागातील अरुणराव सरनाईक यांच्या घरी भर दिवसा घरफोडी झाली. यानंतरच्या काळातही चोरी व घरफोडीच्या अनेक घटना घडल्या. तिरुपती सिटी येथील रहिवासी सुनील नामदेवराव राऊत यांच्या घरी दि. २९ जुलै रोजी भर दिवसा १६ लाख रुपयांचा ऐवज रोख रकमेसह



## घरफोडीतील नुकसानग्रस्तांचे पोलीस अधीक्षकांना निवेदन

चोरट्यांनी लंपास केला. मागील आठवड्यात काकडदाती गावाजवळील साईलीला नगर मध्ये भर दिवसा घरफोडी झाली.

चोरी व घरफोडीच्या घटनांसह घरासमोरील वाहने पेटवून देणे, वाहनांचे टायर चोरून नेणे आदी प्रकारच्या घटनाही घडल्या. यामध्ये गुरुवार बाजार जवळील दिलीप काष्टे यांच्या अंजली गॅरेजला आग लावल्याची घटना घडली. जुनी आययूडीपी येथील रहिवासी किशोर रंधवे यांच्या घरासमोरील १० लाख रुपये किमतीची कार पेटवून देण्यात आली. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेजही पोलीस प्रशासनाला देण्यात आले.

आकाश आव्हाळे यांच्या घरासमोरील कारची चाके चोरट्यांनी चोरून नेली. आदी घटनांसह इतर छोट्या, मोठ्या अनेक घटना घडल्या. ह्या घटना म्हणजे एक प्रकारे पोलीस प्रशासनाला चोरट्यांनी दिलेले आव्हान होय. या घटनांचा तपास अजूनही प्रलंबित असल्यामुळे चोरट्यांचे मनोबल वाढत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळेच शहरात सातत्याने चोरी व घरफोडीच्या घटना घडत आहेत. तथापि, चोरट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी पोलीस प्रशासनाने कठोर पाऊले उचलून कारवाई करावी. अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच झालेल्या चोरीच्या घटनांमधील मुद्देमाल मिळवून देण्याची मागणी निवेदनकर्त्यांनी केली आहे. निवेदनाची प्रतिलिपी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांना पाठविण्यात आली आहे. निवेदन देतांना इंजि. सिताराम वाशिमकर, सुनील नामदेवराव राऊत, किशोर रंधवे आदिसह इतर नुकसानग्रस्त उपस्थित होते.

# विराट हिंदू धर्मसभेसाठी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे - मंगेश कडेल यांचे आवाहन



■ प्रतिनिधी | कारंजा ■

मंगरूळनाथ येथे येत्या १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता होणाऱ्या विराट हिंदू धर्मसभेसाठी जिल्ह्यातील सर्व हिंदू बांधव आणि भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा प्रखंड अध्यक्ष मंगेश कडेल यांनी केले आहे.

ही धर्मसभा सकल हिंदू समाजा तर्फे आयोजित करण्यात आली असून कार्यक्रमाचे ठिकाण जिल्हा परिषद क्रीडा मैदान, छत्रपती शिवाजी महाराज चौक, मंगरूळनाथ असेल. धर्मसभेचे प्रमुख वक्ते म्हणून टायगर राजाभैय्या ठाकुर, विधायक गोशामहल (भाग्यनगर –हैद्राबाद) हे मार्गदर्शन करणार असून प्रमुख उपस्थिती म्हणून सुदर्शन गिरी नागा संन्याशी, सिध्देवरनाथ आश्रम, वृंदावन विभूषित स्वामी शिवव्यंकटेशानंद भारती महाराज हेही लाभणार आहेत.

या धर्मसभेतून हिंदू समाजाने संघटित राहून धर्माप्रती जागरूक राहण्याचे आवाहन करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

विशेषतः नवयुवकांमध्ये या धर्मसभेबाबत उत्साहाचे वातावरण असून, जिल्हाभरातून हजारो युवक सहभागी होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# वरोली–कारखेडा–विठोली रस्ता बनला खड्डयांचा महाकुंड!

**मानोरा :** तालुक्यातील विठोली ते मानोरा या कारखेडा मार्गे जाणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. मागील दोन ते अडीच वर्षांपासून या रस्त्याची परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत असून तळप (रामतीर्थ), कारखेडा, वरोली, हर्सुल या गावांतील नागरिकांना दररोज या रस्त्याने प्रवास करताना अक्षरशः हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत.या मार्गावरील खड्डे इतके खोल व मोठे झाले आहेत की, दुचाकीस्वार, शाळकरी मुले, रुग्णवाहिका आणि जड वाहनांसाठी प्रवास करणे म्हणजे संकट ओढवून घेणे ठरत आहे. पावसाळ्यात या रस्त्यावर पाण्याचे डबके व चिखल झाल्याने नागरिकांना



रस्ता ओळखणेही कठीण बनले होते. विशेष म्हणजे, स्थानिक ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी वारंवार निवेदनं देऊन, आंदोलने करून आणि लोकप्रतिनिधींना याकडे लक्ष देण्याची विनंती करूनही प्रशासनाने केवळ 'दाखवायापुरती' थातूरमातूर डागडुजी केल्याचे जनतेत बोलले जात आहे.काही महिन्यांपूर्वी नागरिकांनी रास्ता रोको आंदोलनाची चेतावणी दिल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने घाईघाईने काही ठिकाणी मुरुम टाकून मलमपट्टी केली; मात्र पहिल्याच पावसात ती वाहून गेली आणि पुन्हा खड्डयांचे साम्राज्य उभे राहिले. या रस्त्यावर प्रवास करणाऱ्या नागरिकांना रोज शारीरिक, आर्थिक आणि मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.सदर रस्ता अनेक गावांना जोडणारा प्रमुख मार्ग असून शेतीमाल वाहतुकीसाठीही महत्त्वाचा आहे. मात्र या रस्त्याच्या दुर्दशेमुळे शेतकरी आणि व्यापारीवर्गही अडचणीत आले आहेत.सामाजिक कार्यकर्ते नामा जाधव यांनी सांगितले की, 'किमान पायाभूत सुविधा आणि सोयी मिळणे हे ग्रामीण भागातील नागरिकांचे मूलभूत अधिकार आहेत. मात्र निष्क्रिय लोकप्रतिनिधी आणि बेजबाबदार यंत्रणेमुळे नागरिकांचे हाल होत आहेत.

# जिल्ह्यात पावसाची शक्यता

**अकोला :** जिल्ह्यात दि. २८ ते ३० ऑक्टोबर दरम्यान पाऊस पडण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवली आहे. या दरम्यान वा-यांचा वेग ताशी ३० ते ४० कि. मी. असेल. अशास्थितीत नागरिकांनी वीज, वारा व पावसापासून बचाव करण्यासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. झाडाखाली आश्रय घेऊ नये. नदीकाठावरील गावांना सूचना देण्यात आली आहे.

# तालुक्यातील कृषी व्यवसायिकांचा बाजारच्या दिवशी कडकडीत बंद




■ प्रतिनिधी | मालेगाव ■

केंद्र शासन व राज्य सरकारने कृषी साहित्य विक्रेत्यांना बियाणे विक्री करिता साथी पोर्टल टू ॲप ची सक्ती केली असून सदर ॲपमुळे कृषी विक्रेत्यांना प्रचंड मनस्ताप होऊन मोठी अडचण निर्माण होत आहेत ,साथी फेस टु शक्ती विरोधात निषेध व्यक्त करण्याकरता माफदा कृषी व्यवसायिक संघटनेमार्फत राज्यभर दि. २८ नोव्हेंबर मंगळवार रोजी राज्यव्यापी आस्थापने बंद ठेवण्याचे आव्हान करण्यात आले होते त्याकरिता

दिनांक मंगळवार २८ नोव्हेंबर हा मालेगाव चा आठवडी बाजार दिवस असूनही मालेगाव शहरातील सर्वच्या सर्वच कृषी व्यवसायिकांनी तसेच तालुक्यातील आमानवाडी, जऊळका, किन्हीराजा, मेडशी, मुंगळा, शिरपूर आदी ग्रामीण भागातील कृषी सेवा केंद्र व्यावसायिकांनी आपली प्रतिष्ठाने कडकडीत बंद ठेवून शासनाच्या साथी फेस टू शक्ती विरोधात निषेध व्यक्त केला . शासनाने कृषी विक्रेत्यांना बियाणे विक्री करताना साथी फेस टू पोर्टल ॲप शक्तीचे केलेले आहे. सदर प्रणाली अतिशय किचकट असून यामुळे विक्रेत्यांना मोठी अडचण निर्माण होत असून बहुतांश वेळ त्यांचा वाया जात आहे. तसेच मनुष्य बळही कमी पडत आहे. त्यामुळे शासनाने साथी फेस टू शक्ती रद्द करावी करिता आम्ही सर्व कृषी विक्रेत्यांनी हा बंद पळून याचा विरोध केला आहे जर सरकारने या विषयी तोडगा काढून साथी फेस टू रद्द केले नाही तर यापुढेही कृषी व्यावसायिक संघटनेच्या मार्फत मोठे आंदोलन करण्यात येईल असे सिद्धेश्वर वनस्कर सचिव कृषी व्यवसायिक संघटना मालेगाव यांनी जाहीर केले आहे.

# अनुदानाअभावी शेतकऱ्यांची दिवाळी अंधारातच

## प्रतीक्षेने वाढली शेतकऱ्यांची चिंता

■ प्रतिनिधी | मानोरा ■

दिवाळीचा सण आनंद , उत्साह व प्रकाशाचा उत्सव असतो , मात्र यंदा अनेक शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात गेली आहे. सततच्या पावसामुळे शेतातील पिके हातची गेली आहेत.त्यामुळे खर्च कसा भागवायचा या विवंचनेत शेतकरी गुरफटला आहे. अश्यातच शेतकऱ्यांना सरकारकडून मदत जाहीर करण्यात आली मात्र सदर अनुदानाची रक्कम अजूनही त्यांच्या खात्यात जमा झालेली नाही. परिणामी, अनेक शेतकऱ्यांना दिवाळीचा खर्च भागवणेही कठीण झाले असून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद, उत्साहाऐवजी निराशा पहावयास मिळत आहे.

गत काही महिन्यांपासून निसर्गाच्या लहरीपणामुळे खरिपातील पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. काही भागांत अतिवृष्टी तर काही ठिकाणी ओला दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे सोयाबीन, कापूस, तूर अशापिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. संततधार पावसामुळे सोयाबीन पिकाची उत्तम वाढ झाली नाही, कापसावरही लाल्या रोग आला. त्यामुळे तूर, सोयाबीन व कापूस पिकाचे उत्पादन घटणार असल्याची शक्यता शेतकऱ्यांतून वर्तविली जात आहे.



यामुळे शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पन्न मिळाले नाही. आधीच कर्जबाजारी असलेले शेतकरी आता आर्थिक संकटात सापडले आहेत. शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी अनुदान जाहीर केले असले तरी अनेक शेतकऱ्यांच्या खात्यात दिवाळी होवून आठवडा उलटला आहे तरी सुद्धा अद्याप ती रक्कम जमा झालेली नाही. मदत निधी वितरित करण्यात येत असलेल्या विलंबामुळे शेतकरी वर्गात नाराजी व्यक्त होत आहे. स्थानिक शेतकरी सांगतात, दरवर्षी दिवाळीला थोडाफार आनंद साजरा करतो, पण यंदा उत्पन्नच नाही. शासनाने जाहीर केलेली मदत खात्यात जमा केली असती तर सण आनंदात साजरा झाला असता. आता खते, बियाणे आणि घरखर्च या सगळ्याचे ओझं वाढले आहे, त्यामुळे त्वरित मदत देण्याची मागणी शेतकरी वर्गातुन होत आहे.

# चलो बुद्ध की ओर अभियानांतर्गत भव्य धम्मचक्र प्रवर्तन सोहळा; मालेगावात भव्यतेने साजरा होणार!

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

परित्राण बुद्धिस्ट फाउंडेशनच्या वतीने 'चलो बुद्ध की और' अभियानांतर्गत विशाल धम्मचक्र प्रवर्तन सोहळा आणि भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त जिल्ह्यातील आदर्श बुद्धविहारांना अष्टधातूंच्या बुद्धमूर्ती दान समारंभ याचे आयोजन गुरुवार, दि.३० ऑक्टोबर रोजी मालेगाव येथील एम.सी.सी. क्रिकेट मैदानावर करण्यात आले आहे. या कार्यक्रमात धम्मविधी म्हणून भदंत उपाली, भदंत श्रद्धानंद आणि भदंत प्रज्ञापाल थेरो यांची उपस्थिती लाभणार असून, विशेष उपस्थिती म्हणून भदंत पय्याबोधी थेरो (नांदेड – संचालक, श्रामणेर प्रशिक्षण केंद्र, खुरगाव नांदूना) व त्यांचा भिक्खू संघ तसेच प्रज्ञापाल महाथेरो उपस्थित राहणार आहेत.कार्यक्रमाला डॉ. भदंत अग्गराहेरा कश्यपा थेरो,



श्रीलंका उपासिका आयुष्यमती कौशल्या विक्रमसिंघे, श्रीलंका आदि मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे तर मुख्य मार्गदर्शक ॲड. संदीप ताजणे आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून सी.एल. थूल (माजी न्यायमूर्ती) तर मुख्य उपस्थिती प्रसिद्ध सिने अभिनेते गगनजी मलिक (टीव्ही मालिकेत बुद्धांची भूमिका साकारणारे), भदंत पय्याबोधी (नांदेड),विशेष उपस्थिती ॲड. संतोष तेन्हालीकर,ॲड. अश्विन थूल,नाना देवगडे (संचालक, प्रबुद्ध युवा इंटरनॅशनल फोरम, चंद्रपूर) गोपाल पवार आदि मान्यवरांची राहणार आहे.

कार्यक्रमाला न्गोपाळराव आटोटे, डॉ. सिद्धार्थ देवळे, सम्राट डोंगरदिवे, सुरेश महाडिक, डॉ. मधुसूदन वानखेडे, दौलतराव इंगोले, भाई जगदीश इंगळे, मधुकर जुमडे, रवींद्र गवई, अनंतकुमार जुमडे, आनंद शेंगदाणे, गोवर्धन चोतमल, मनोहर भिलंग, गोपाल पवार, सागर कोकस, सौ. आम्रपाली अनिल ताजणे, चैतन्यभाई इंगळे, अमोल पखाले, ॲड. प्रशांत इंगळे, ॲड. मोहन गवई, प्रवेश खडसे, सदानंद भालेराव, देवानंद ताजणे, हनुमान खडसे, नंदकुमार वानखेडे, अशोक वानखेडे, दिलीप कंकाळ, देवा इंगळे, साहेबराव भगत, दत्तराव धांडे, रमाबाई तुळशीराम सुर्वे, हरीदास बनसोड, आदींची उपस्थिती राहणार आहे.

# सोयाबीनची हमी पेक्षा कमी भावाने खरेदी

## नाफेडच्या खरेदीचा मुहुर्तच नाही

■ प्रतिनिधी | मानोरा ■

खरीप हंगामातील नगदीचे पिक म्हणून सोयाबीन समजले जाते.मागील एक महिन्यापासून सोयाबीन काढणीचा हंगाम सुरू झाला असून अद्यापही अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील सोयाबीनची काढणी बाकी आहे. आर्थिक परिस्थिती जेमतेम असल्याकारणाने काढलेले सोयाबीन दिवाळीच्या तोंडावर अनेक शेतकऱ्यांना विकावे लागले. शेतातील 'पिवळे सोने' म्हणून ओळख असलेल्या सोयाबीनला बाजारात मात्र कवडीमोल भाव मिळत आहे.तालुक्यामध्ये नाफेडच्या खरेदीचा मुहूर्तच निघाला नसल्याने सोयाबीनची हमी भावापेक्षा कमी भावाने सर्रास खरेदी होत आहे.

यावर्षी सततच्या पावसामुळे सोयाबीनच्या उत्पादनात लक्षणीय घट झाली. सरासरी दोन ते तीन क्विंटल प्रति एकर तर काहींना एकरी एक क्विंटल सोयाबीनचे उत्पादन झाले. दिवाळीच्या तोंडावर काही शेतकऱ्यांचे सोयाबीन घरी आले. दिवाळी या महत्वाच्या सणाला शेतकऱ्यांनासुद्धा पैशाची अत्यंत गरज असते. त्यामुळे नाईलाजाने अनेक शेतकऱ्यांना आपल्याकडील सोयाबीन बेभाव विकावे लागले. सोयाबीनला हंगामाच्या सुरुवातीला २५०० रुपयापासून ३२०० रूपये भावाने सोयाबीन विकावे लागले. सध्या सोयाबीनला ३२०० पासून तर ४१०० रुपये पर्यंतचा बाजारभाव मिळत आहे . मात्र सोयाबीनचा हमीभाव हा ५३२८ रुपये एवढा आहे.

# शेलुखडसे जिल्हा परिषद शाळेला शिक्षक उपलब्ध करुन द्या!

**रिसोड :** तालुक्यातील शेलुखडसे जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळेत एक ते सात वर्ग असून शाळेची पटसंख्या १५० च्या आसपास आहे. मात्र शिक्षक केवळ चार असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. एका शिक्षकाची कमतरता ही येथील शाळेची कायमची समस्या होऊन बसली आहे. त्यामुळे पालक नाराजी व्यक्त करीत आहेत. याबाबत शिक्षण विभागाकडे अनेकवेळा पाठपुरावा केला आहे. परंतु आमच्या मागणीला केराची टोपली दाखवण्यात आली असल्याचा गंभीर आरोप येथील शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेश अभिमन्यू खडसे यांनी केला असून शाळेला शिक्षक उपलब्ध करून द्या! अशी कळकळीची मागणी केली आहे.

प्राथमिक शिक्षण हाच यशस्वी होण्याचा पाया आहे. तो भक्कम करण्यासाठी शिक्षकांची नितांत गरज असते. शिक्षाअभावी वर्ग एक ते पाचच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होत असल्याने विद्यार्थ्यांचे पालक रोष व्यक्त करीत असल्याचे अध्यक्ष राजेश खडसे यांनी म्हटले आहे. तद्वतच येथील जिल्हा परिषद शाळा तालुक्यातील नावारूपास आलेली शाळा असून शिक्षकांनी मोठ्या मेहनतीने शाळेचे नंदनवन केले आहे. मात्र शिक्षकाची कमतरता ही नित्याचीच समस्या होऊन बसल्याने या आदर्श शाळेत शैक्षणिक कार्यात मोठा अडथळा येत आहे. या बाबत रिसोड पंचायत समितीचे गट विकास अधिकारी आणि शिक्षण विस्तार अधिकारी यांच्याकडे अनेकवेळा तोंडी व लेखी स्वरूपात मागणी केली आहे. परंतु प्रत्येक वेळी आमच्या मागणीकडे दुर्लक्ष केल्या जात आहे. येथील वर्ग एक ते पाचच्या विद्यार्थ्यांची संख्या शंभराच्या वर असून वर्ग सहा ते सातची पटसंख्या लक्षात घेता विद्यार्थी संख्या दिडशेच्या आसपास आहे. मुळातच चार शिक्षक होते त्यात भागवत संपत साबळे हे शिक्षक ३० सप्टेंबर २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. तर एका शिक्षकाच्या जागेवर बदली शिक्षक दिले असले तरी पुन्हा एका शिक्षकाची कमतरता कायम आहे. शाळेत शैक्षणिक सर्व सोईसुविधा उपलब्ध असून केवळ शिक्षकाच्या कमतरतेमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची माहिती खडसे यांनी दिली आहे. या गंभीर समस्येकडे शिक्षण विभागाने तातडीने लक्ष द्यावे अन्यथा पालकांच्या सहनशीलतेचा बांध फुटल्यास मोठे आंदोलन छेडल्या जाण्याची शक्यता शाळा व्यवस्थापन समितीने वर्तवली आहे. त्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चव्हाण यांनी तातडीने लक्ष घालून आमच्या शाळेला किमान आणखी एक शिक्षक उपलब्ध करुन द्यावा ! अशी मागणी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेश अभिमन्यू खडसे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.



## शाळा व्यवस्थापन समितीची मागणी

जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक ३२९ ■ बुधवार, २९ ऑक्टोबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# फेब्रुवारीत मुंबई क्लायमेट वीक; मुंबई बनेल वातावरणीय कृतीचे जागतिक केंद्र: मुख्यमंत्री

## तीसहून अधिक देशांचा सहभाग

**मुंबई जनमाध्यम :** वातावरणीय बदल, ऊर्जा संक्रमण आणि शाश्वत विकासाच्या दिशेने भारताच्या नेतृत्वाला नव्या उंचीवर नेणारा 'मुंबई क्लायमेट वीक' हा जागतिक स्तरावरील परिषद उपक्रम येत्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात मुंबईत आयोजित केला जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत या महत्वाकांक्षी उपक्रमाची घोषणा केली. प्रोजेक्ट मुंबई या संस्थेच्या संकल्पनेतून साकार झालेला हा कार्यक्रम महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने पार पडणार आहे.

१७ ते १९ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर, मुंबई येथे हा मुख्य कार्यक्रम होईल. या बैठकीला उपमुख्यमंत्री व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, महापालिका आयुक्त भूषण गगराणी, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, तसेच 'प्रोजेक्ट मुंबई'चे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी उपस्थित होते.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भारत जागतिक दक्षिणेकडील देशांसाठी हवामान कृती आणि सहकार्याचा न्याय्य, नाविन्यपूर्ण आणि निधी सहाय्यित मार्ग दाखविण्यास तयार आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीतून मार्गदर्शित होत, महाराष्ट्र आणि मुंबई वातावरणीय बदलाच्या परिणामांविरुद्ध प्रभावी कृती करण्यासाठी सज्ज आहे. मुंबई क्लायमेट वीक'मध्ये तीसहून अधिक देशांतील अभ्यासक, पर्यावरण तज्ज्ञ, धोरणकर्ते, उद्योगजगत, विद्यार्थी व सामाजिक संस्था एकत्र येऊन हवामान बदलाच्या आव्हानांवरील सर्वंकष उपाययोजना रचतील. या परिषदेतून ग्लोबल साऊथमधील देशांसाठी व्यवहार्य असा हवामान कृती आराखडा तयार होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.नागरिकांच्या सहभागावर आधारित हा उपक्रम केवळ परिषद मर्यादित न राहता शहरभर विविध उपक्रमांच्या माध्यमातून राबविण्यात

**-१७ ते १९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे परिषद**

येणार आहे. कार्यशाळा, प्रदर्शने, कला, क्रीडा, आरोग्य आणि अध्यात्म यांसंबंधित कार्यक्रम, तसेच 'क्लायमेट फूड फेस्टिव्हल'च्या आयोजनातून हवामान कृतीत सहभागी होण्याचा संदेश देण्यात येईल.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आपण आता कृती करण्याची वेळ आली आहे. समाजातील प्रत्येक घटकाने हवामान बदलाच्या परिणामांविरुद्ध मोहिमेत सहभागी व्हावे लागेल. यासाठी आपण महाराष्ट्र आणि मुंबईसाठी दीर्घकालीन मार्ग निश्चित करून ठोस ध्येय ठरवावे लागेल. कार्यक्रमाचे प्रतीकात्मक लोगो अनावरण तसेच उपक्रमाची माहितीपट या वेळी प्रदर्शित करण्यात आली. मुंबई क्लायमेट वीक'चा भर अन्न प्रणाली, ऊर्जा संक्रमण आणि शहरी सक्षमता या तीन मुख्य विषयांवर असेल. न्याय, नवोन्मेष आणि वित्तीय दृष्टीकोनातून या विषयांची चर्चा केली जाईल. या उपक्रमाचा नॉलेज पार्टनर मॉनिटर डिलॉईट असेल, तर क्लायमेट ग्रुप, इंडिया क्लायमेट कोलॅबोरेटिव्ह, वर्ल्ड रिसोर्सेस इन्स्टिट्यूट (इंडिया), युनिसेफ, शक्ती फाउंडेशन, एव्हरसोर्स, एचटी पारेख फाउंडेशन आणि रेनमॅटर फाउंडेशन यांसारख्या प्रतिष्ठित संस्थांचा सहभाग असेल.कार्यक्रमाबद्दल बोलताना प्रोजेक्ट मुंबई'चे शिशिर जोशी म्हणाले, 'ही परिषद महाराष्ट्र आणि भारतासाठी ऐतिहासिक ठरेल. लोकसहभागावर आधारित अशा परिषदेतील मंथनातून शाश्वत आणि समावेशक उपाय प्रस्तावित होतील. या बैठकीत मुख्यमंत्री कार्यालयातील अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार कौस्तुभ धवसे तसेच प्रोजेक्ट मुंबईचे सल्लागार मंडळ सदस्य रिधम देसाई आणि जलज दाणी उपस्थित होते. मुंबई क्लायमेट वीक मुळे भारताचे पर्यावरणीय नेतृत्व अधोरेखित होईल, तसेच जागतिक दक्षिणेकडील राष्ट्रांना एकात्मिक कृतीसाठी प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# साथी पोर्टलच्या बंधनाविरोधात कृषी सेवा केंद्रचालक आक्रमक

## सरकारच्या निर्णयाचा निषेध; जिल्हाभर दुकानें बंद ठेवून व्यापाऱ्यांचा इशारा



**वर्धा जनमाध्यम :** कृषी विक्रेत्यांना बियाणे आणि कृषी साहित्य विक्रीसाठी साथी पोर्टल-२ वापरण्याचे राज्य सरकारचे बंधन येथील सेवा केंद्रचालकांना धोक्याचे ठरत आहे. या निर्णयाविरोधात मंगळवारी जिल्हाभरातील कृषी सेवा केंद्रचालकांनी दुकानं बंद ठेवत सरकारविरोधात तीव्र निषेध व्यक्त केला.राज्यभरातील विक्रेत्यांनी 'साथी पोर्टल' निर्णय मागे घ्यावा, अशी मागणी केली असून, तांत्रिक साधनांची कमतरता, प्रशिक्षणाचा अभाव आणि मर्यादित सुविधा या अडचणींमुळे हा निर्णय अमान्य असल्याचे स्पष्ट केले.२५ ऑगस्ट रोजी कृषी संचालक व राज्य गुणवत्ता नियंत्रण अधिकारी यांच्या उपस्थित झालेल्या बैठकीनंतर साथी पोर्टल-२ चा वापर अनिवार्य करण्यात आला. मात्र अनेक कृषी विक्रेत्यांकडे संगणक, प्रिंटर, इंटरनेटसारख्या सुविधा नसल्याने व्यवहार करणे अशक्य ठरत आहे. कृषी विभागाने या अडचणींकडे दुर्लक्ष केले, असा आरोप विक्रेत्यांनी केला.कृषी व्यवसाय संघटनेचे अध्यक्ष रवी शेंडे, सचिव मनोज भुतडा, उपाध्यक्ष श्रीकांत महाबुद्धे, प्रफुल्ल देवतळे, गणेश चांडक, विनोद भुतडा आदींसह जिल्ह्यातील शेकडो विक्रेत्यांनी आंदोलनात सहभाग घेतला. जिल्हाधिकारी कार्यालयास निवेदन देऊन शासनाने निर्णय मागे घ्यावा, अन्यथा राज्यव्यापी बंदची हाक दिली जाईल, असा इशाराही देण्यात आला.दरम्यान, साथी पोर्टलचा वापर न केल्याने अनेकांवर नोटिशा व दंडात्मक कारवाई सुरू असल्याने विक्रेत्यांत असंतोष आहे. आठ वर्षांपासून खत विक्रीमध्ये पीओएस मशीनचा त्रास सहन करावा लागत असताना आता नव्या पोर्टलचे ओझे त्यांच्यावर टाकले जात असल्याची टीका करण्यात येत आहे.समुद्रपूर तालुक्यातील सर्व कृषी सेवा केंद्रांनीही सकाळपासूनच कडकडीत बंद ठेवत या निर्णयाचा निषेध व्यक्त केला.

# डॉ. संपदा मुंडे प्रकरणातील आरोपींना कठोर शिक्षा व्हावी : महिला काँग्रेसची मागणी

## वर्धा जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत तीव्र निषेध नोंद

**वर्धा जनमाध्यम :** फलटन येथील डॉ. संपदा मुंडे यांच्या बळी प्रकरणाचा महिला काँग्रेसतर्फे वर्धा येथे तीव्र निषेध करण्यात आला. आरोपींना कठोर शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेस कमिटीने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली. हे निवेदन प्रभारी जिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले यांनी स्वीकारले.

या वेळी आंदोलनाचे नेतृत्व महिला काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षा हेमलता मेघे यांनी केले. महिलांवर होणारे वाढते अत्याचार चिंताजनक असून, डॉ. मुंडे यांचा बळी हा त्याच प्रवृत्तीचा परिणाम असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि दोषींना कठोर शिक्षा व्हावी, यासाठी महिला काँग्रेस एकजूटीनं उभी असल्याचा संकल्पही या वेळी व्यक्त करण्यात आला.

निवेदन देताना अर्चना भोमले, सोनाली कोपुलवार, बबीता नेगी, प्रतिमा जाधव, शिला गुजर, सुवर्णा नगराळे, सोनू सुटे, रूपाली शिवरामवार, आशा भुजाडे, वर्षा मून, सोनिका जाधव, जयश्री कटारे, एलीस एका, संगीता वादाफळे, प्रणीता डंभारे, वैष्णवी वाटमोडे, वैष्णवी चलाख यांच्यासह अनेक महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

# तीन अल्पवयीन मुलींवरील अत्याचारप्रकरणी आरोपीस जन्मठेप

**वर्धा जनमाध्यम :** गिरड पोलिस ठाण्याच्या हद्दीत तीन वर्षांपूर्वी तीन अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचार प्रकरणी चंद्रपूर जिल्ह्यातील माखोना (ता. चिमूर) येथील ५५ वर्षीय केशव वानखेडे या आरोपीस हिंगणघाट न्यायालयाने जन्मठेप व ५० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली आहे.१८ फेब्रुवारी २०२२ रोजी घराजवळ खेळत असताना आरोपीने तिन्ही मुलींना ओसाड बाथरूममध्ये नेऊन अत्याचार केला होता.

मुलींनी हा प्रकार कुटुंबियांना सांगताच त्यांनी तत्काळ पोलिसात तक्रार दाखल केली. त्यानंतर गिरड पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेऊन सखोल तपास सुरू केला. सपोनि धनश्री कुटमाटे यांनी तपास पूर्ण करून प्रकरण न्यायालयात दाखल केले.प्रकरणातील १६ साक्षीदारांची साक्ष पैरवी अधिकारी विकास ढाकरे यांच्या उपस्थितीत शासकीय अभियोक्ता दीपक वैद्य यांनी सादर केली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्रीमती वर्षा बी. पारगावकर यांनी आरोपीला दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा ठोठावली.या निकालामुळे अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेबाबत जनजागृती वाढविण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे.

## सरकार जागं होईल तेव्हा शेतकरी जिवंत राहतील का ?

# शिवाजींच्या गनिमी काव्याने लढा देऊ, बच्चू कडूंचा सरकारला जाहीर इशारा

**वर्धा जनमाध्यम :** शब्दांच्या गोळ्या झाडणाऱ्या सत्ताधाऱ्यांना आता शेतकरीही उत्तर देणार आहेत आणि तेही शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याच्या मार्गाने सरकार शेतकऱ्यांचा अंत पाहू नये; वेळ आली आहे निर्णायक भूमिकेची, असा स्फोटक इशारा प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष बच्चू कडू यांनी वर्ध्यातील शेतकरी महाएल्गार मोर्चाच्या वेळी दिला.

राज्यात दररोज शेतकरी आत्महत्या करत असताना मंत्र्यांची भाषणे मात्र अजूनही फुलोरा धरत आहेत. भावांतर योजना ही भावांतर नाही तर फसवणुकीची योजना ठरली आहे, अशी झोड कडूंनी सरकारची उडवली. आम्हाला समित्या नकोत, आश्वासने नकोत, थेट लेखी निर्णय हवेत, अशी आग ओकणारी भूमिका त्यांनी मांडली.शेकडो ट्रॅक्टर, हजारो शेतकरी, आणि घोषणांनी भरलेला उत्साह सुकळी (बाई) येथे आंदोलनाने रणधुमाळीच माजवली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संवाद झाला, पण बैठकीसाठी आम्ही जाणार नाही; कारण लाखो शेतकरी रस्त्यावर आहेत, अशी ठणकावणी कडूंनी केली. राजकारणाच्या दबावाखाली पोलिस कारवाई थांबवत आहेत, सभा मोडल्या जात आहेत, तरीही आम्ही रामगिरी बंगला गाठणारच, असा अंतिम इशारा देत बच्चू कडूंनी सत्ताधाऱ्यांना भिड दिली. सत्ताधाऱ्यांच्या गोटात खळबळ माजली असून, शेतकरी आंदोलनाने नवचैतन्य मिळवले आहे.



# नागपूर : बच्चू कडू यांच्या चक्का आंदोलनामुळे वाहतूक ठप्प

## शेकडो शेतकऱ्यांचा ट्रॅक्टर आणि मालवाहू गाड्यांसह नागपूरकडे मोर्चा

### -शेतकऱ्यांच्या एल्गारमुळे नागपुरात तणाव

**डोंगरगाव (नागपूर) :** येथे आज सकाळपासून शेतकरी नेते बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या ट्रॅक्टर आंदोलनामुळे परिसरातील सहा किलोमीटर पर्यंत वाहतूक ठप्प झाली आहे, समुदी महामार्गासह शहरातील अनेक मार्गांवर ट्रॅफिक जाममुळे प्रवाशांना आणि नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे, शेकडो ट्रॅक्टर, ट्रक आणि चारचाकी गाड्यांमधून शेतकरी डोंगरगाव नागपूर कडे दाखल होत असून, संध्याकाळी सात वाजता शेतकरी नेत्यांची महा एल्गार सभा आयोजित करण्यात आली , आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर नागपुरातील वाहतूक पूर्णपणे ठप्प होण्याची शक्यता व्यक्त होत आहे, प्रशासनाने आंदोलनाचा विचार करून नागपूर आणि आसपासच्या रस्त्यांवर पोलीस बंदोबस्त वाढवला आहे, वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पोलिसांनी काही मार्गांवर तात्पुरती डायवर्शन केली आहेत नागरिकांनी प्रवासाच्या वेळी काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. दुपारी चार वाजता पासून नागपूर मार्गावर चक्काजाम असल्यामुळे अनेक बसेस व इतर वाहनातील प्रवासांना मनस्ताप सहन करावा लागला तर रात्री आठ वाजता डोंगरगाव येथे आंदोलनकर्ते रस्त्यावर बसल्यामुळे वाहतूक पूर्णपणे ठप्प करण्यात आली यामध्ये समृद्धी मार्गावर सुद्धा वाहतूक खोळंबली आहे, आता प्रशासन काय लक्ष देणार याकडे लक्ष केंद्रित केले जात आहे,

# गिरड-सिर्सी रस्त्यावर कार-ट्रकची भीषण धडक

## -भाऊबीजेच्या दिवशीच एका तरुणाचा अंत; तिघे गंभीर जखमी

**समुद्रपूर जनमाध्यम :** दिवाळीच्या सणावर पसरलेला आनंद भाऊबीजेच्या रात्रीच शोककळेत परिवर्तित झाला. गिरड-सिर्सी मार्गावरील सॅटीस्फॅक्शन बारजवळ झालेल्या भीषण अपघातात २४ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर त्याचे वडील, बहीण आणि बालभाचा गंभीर जखमी झाले.तुळजापूर दर्शन करून परत येत असताना एमएच ३० एझेड ५१९२ क्रमांकाची एर्टिगा कार समोरून येणाऱ्या एमएच ३२ क्यू २३६२ क्रमांकाच्या आयसर ट्रकला जबर धडक देताच कारचा चक्काचूर झाला. अपघातात हिमांशू आत्माराम गोन्नाडे (२४, रा. आरमोरी, जि. गडचिरोली) यांचा जागीच मृत्यू झाला. वडील आत्माराम गोन्नाडे (५८), बहीण शिवानी धकाते आणि दीड वर्षांचा एशित धकाते हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर सेवाग्राम कस्तुरबा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.अपघाताची माहिती हॉटेल मालक तेजराम पडोळे यांनी सिर्सी पोलिस चौकीला दिल्यानंतर बेला पोलिस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी अपघातग्रस्तांना तातडीने सेवाग्रामला हलविले. अपघातामुळे काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. ठाणेदार चेतनसिंह चव्हाण यांनी प्रत्यक्ष पाहणी करून वाहतूक सुरळीत केली. ट्रक चालक मोहम्मद रफीक शेख (रा. अड्याळ, भंडारा) यास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.उमरेड-गिरड-सिर्सी मार्गावर सतत चालणाऱ्या कोळसा वाहतुकीमुळे रस्त्याची दुरवस्था झाली असून कडेला भराव नसल्याने अपघातांची मालिका सुरूच आहे. मृत हिमांशू हे माजी पोलिस कर्मचाऱ्यांचे पुत्र असून मेहनती आणि जबाबदार स्वभावामुळे ओळखले जात होते. त्यांच्या निधनाने आरमोरी आणि सिर्सी परिसरावर शोककळा पसरली आहे.




## कार्यालय ग्रामपंचायत रोहणी (वसू) ता.देवळी, जि.वर्धा

### निविदा सूचना

ग्रामपंचायत रोहणी (वसू) ता.देवळी, जि.वर्धा कडून खालील कामांची निविदा अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या नोंदणीकृत कंत्राटदारांकडून लिफाफा बंद निविदा ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत दिनांक ८/११/२०२५ पर्यंत सादर कराव्यात. निविदा उघडण्याची प्रक्रिया येणाऱ्या आजीव सभेत करण्यात येईल.

| अ.क्र. | योजनेचे नांव किंमत | कामाचे नांव | प्राकलन निविदा फी | टी.एस.नं. कालावधी | अनामत + | कामाचा | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १५ वा वित्त आयोग | ग्रा.पं.शौचालय बांधकाम | २.२२ लक्ष | ०९/३/१०/२०२५ | २२२०+२२२ | ३ महिने | - |
| २. | १५ वा वित्त आयोग | सिमेंट रस्ता दुरुस्ती | ४५ हजार | ०७/०१/१०/२०२५ | ५०० + ५० | १ महिना | |
| ३. | १५ वा वित्त आयोग | नाली बांधकाम | ३५ हजार | ०८/०१/१०/२०२५ | ३५० + ५० | १५ दिवस | |

**अटी व शर्ती-**

१. मेजर काम प्राकलनाप्रमाणे करण्यात यावे.
२. नियमानुसार देयकातून वैधानिक कपाती करण्यात येईल..
३. निधी उपलब्ध झाल्यावर देयके देण्यात येतील.
४. निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे.

**स्वा/-**
**प्रशासक,**
**ग्रामपंचायत रोहणी (वसू)**

**स्वा/-**
**ग्रा.पं.अधिकारी**
**ग्रामपंचायत रोहणी (वसू)**


# तंबाखूजन्य पदार्थ खाणाऱ्यांवर कारवाई

## -तंबाखु मुक्त युवा अभियान

**वर्धा जनमाध्यम :** राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात ९ ऑक्टोबर पासुन ९ डिसेंबर पर्यंत तंबाखु मुक्त युवा अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुमंत वाघ याच्या मार्गदर्शनात सामान्य रुग्णालय परिसरात तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थ खाणा-यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली तर काहींना समज देऊन सोडण्यात आले.

सदर कारवाई राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रमाच्या जिल्हा सल्लागार डॉ. नम्रता सलूजा, समुपदेशक राहुल बुचुंडे, हर्षद ढोबळे व जिल्हा सामान्य रुग्णालयातील अधिकारी व कर्मचा-यांनी केली.

तरुणांना, युवा मुला-मुलींना तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थांच्या सेवनापासून दूर ठेवण्यासाठी तंबाखु मुक्त युवा अभियान राबविण्यात येत आहे. तंबाखू आणि सिगारेट पदार्थाच्या सेवनापासून होणा-या आजाराविषयी माहिती समाजाला देऊन त्यांच्यामध्ये जागरुकता निर्माण करणे गरजेचे आहे. भावी पिढीच्या निरोगी आयुष्यासाठी त्यांना तंबाखू आणि सिगारेट यासारख्या व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी युवकांमध्ये तंबाखुच्या दुष्परिणामाविषयी माहिती देऊन जागरुकता करण्यासाठी व प्रतिबंधात्मक आणि जनजागृती करण्यासाठी अभियानाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येत आहे.


## नावात बदल

**माझे पूर्वी PATHAN SAMEERKHA ISRAILKHA असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वरील SAMEER KHAN ISRAIL KHAN PATHAN हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.**

**पत्ता:- इंदिरा नगर वॉर्ड नं. १, आर्वी नाका , वर्धा ४४२००१**


## मारोतराव पारीसे यांचे निधन



**देवळी :** शहरातील कामडी चौक, येथील रहिवासी मारोतराव जानबाजी पारीसे (वय ९२ वर्षे) यांचे दि. २७ ऑक्टोबर रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सुन, नातवंडे असा आप्तपरिवार आहे. स्थानिक मोक्षधामात अंत्यसंस्कार करण्यात आले, ते क्रिश मोटर ड्रायव्हिंग स्कूल चे संस्थापक किरण पारीसे यांचे वडील होत.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# 40 लाख पूरग्रस्त शेतक-यांच्या खात्यात 8 हजार कोटी जमा

## 15 दिवसांत 11 हजार कोटी दिले जाणार : मुख्यमंत्री



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात यंदा झालेल्या अतिवृष्टी आणि महापुरामुळे प्रभावित झालेल्या लाखो शेतक-यांना दिलासा देण्यासाठी महाराष्ट्र सरकारने मदत जाहीर केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (२८ ऑक्टोबर) मंत्रिमंडळ बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना सांगितले की, आतापर्यंत ४० लाख पूरग्रस्त शेतक-यांच्या खात्यात ८ हजार कोटी रुपयांची मदत जमा करण्यात आली आहे. याशिवाय, आणखी ११ हजार कोटी रुपयांच्या वितरणाला मंजुरी देण्यात आली असून, हे पैसे पुढील १५ दिवसांत शेतक-यांच्या खात्यात पोहोचवले जाणार आहेत. हे रिलिफ पॅकेज अर्थसंकल्पीय तरतुदीबाहेरील असल्याने विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आली आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, जशा याद्या येतील, तशी निधी वितरणाला मान्यता द्यायची आणि संपूर्ण याद्या येईपर्यंत थांबायचे नाही, असा निर्णय आम्ही सुरुवातीपासून घेतला होता. त्यामुळे कुणालाही मनात शंका बाळगण्याचे कारण नाही. ज्या शेतक-यांना दोन हेक्टरच्या नुकसानीसाठी पैसे मिळाले आहेत, त्यांच्या खात्यात तिस-या हेक्टरच्या नुकसानीसाठीही पैसे जमा करण्यास सुरुवात झाली आहे. पुढील १५ ते २० दिवसांत सर्व शेतक-यांच्या खात्यात पूर्ण मदत पोहोचेल.

आम्ही ९० टक्के शेतक-यांना तातडीने ही मदत पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहोत. उर्वरित १० टक्क्यांपैकी काही शेतक-यांच्या बँक खात्यात तांत्रिक अडचणी आहेत. काहींच्या रेकॉर्डसमध्ये समस्या आहेत किंवा काही ठिकाणी मल्टिपल होल्डिंग आहे. या समस्या सोडवण्यासाठीही प्रयत्न सुरू आहेत. आता निधीची कोणतीही कमतरता राहिलेली नाही. फक्त एक गोष्ट समजून घ्यायला हवी की, या प्रक्रियेत दोनवेळा याद्यांची पडताळणी करावी लागते. कारण, पात्र व्यक्ती सुटू नये आणि अपात्र व्यक्तीच्या खात्यात पैसे जाउ नयेत, यासाठी पुनर्पडताळणी आवश्यक आहे. सुदैवाने आमच्याकडे ॲग्रिस्टॅगचा डेटा उपलब्ध आहे. त्यामुळे नोंद असलेल्या खातेधारकांची ई-केवायसी करावी लागत नाही. अन्यथा या प्रक्रियेलाच एक महिना लागला असता. फक्त ज्या केसेसमध्ये ॲग्रिस्टॅगमध्ये नाव नाही आणि ते मदतीसाठी पात्र आहेत, अशांचेच ई-केवायसी केले जात आहे.

**२१ हजार कोटींचे वितरण होणार-** या रिलिफ पॅकेजबाबत अधिक माहिती देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, हे २१ हजार कोटी रुपयांचे पॅकेज थेट शेतक-यांच्या खात्यात जाणार आहे. त्यापैकी ८ हजार कोटी वितरित झाले आहेत. ११ हजार कोटी वितरित करण्यास आज मंजुरी देण्यात आली आहे आणि १ हजार ५०० कोटी रुपये स्वतंत्रपणे वितरित करण्यात येत आहेत. अशाप्रकारे संपूर्ण पॅकेज रिलीज करण्यात येत आहे, असे त्यांनी सांगितले.

**धार्मिक पर्यटनाला वाव मिळणार-** दरम्यान, यावेळी मुख्यमंत्र्यांनी कॅबिनेटमधील इतर महत्त्वाच्या निर्णयांबाबत माहिती दिली. सोलापूर-तुळजापूर-धाराशिव या रेल्वेमार्गाच्या सुधारित आराखड्याला मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. हा आराखडा सुमारे ३ हजार २९५ कोटी रुपयांचा असून, त्यातील ५० टक्के निधी राज्य सरकार आणि ५० टक्के निधी केंद्र सरकार देणार आहे. या प्रकल्पामुळे धार्मिक पर्यटनाला मोठा वाव मिळेल आणि या भागातील विकासाला चालना मिळेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. याशिवाय, व्हिजन २०४७ या महत्त्वाकांक्षी योजनेच्या डॉक्युमेंटला मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आम्ही व्हिजन २०४७ हाती घेतले आहे. यासाठी सगळ्या विभागांनी ७ लाख स्टेकहोल्डर्सशी चर्चा करून आणि सर्वेक्षण करून आराखडा तयार केला आहे. यात २०३० पर्यंतची उद्दिष्टे, २०३५ साली महाराष्ट्र ७५ वर्षांचा होईल, तेव्हाची उद्दिष्टे आणि २०४७ साली विकसित भारत तयार करण्यासाठीची उद्दिष्टे आणि रोडमॅप समाविष्ट आहे. हे डॉक्युमेंट आज मंत्रिमंडळाने मंजूर केले आहे. या योजनेद्वारे महाराष्ट्राला विकासाच्या नव्या उंचीवर नेण्याचा प्रयत्न आहे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

**वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटची चौकशी नाही-** वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या चौकशीबाबत सुरू असलेल्या चर्चांबाबत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, काही लोक जाणीवपूर्वक आमच्यावर अन्याय होत आहे, आम्हाला मारले जात आहे, असे वातावरण तयार करण्याचा प्रयत्न करत आहेत. काही लोक विनाकारण शहीद होत असल्याचे दाखवण्याचा प्रयत्न करत आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटची कोणतीही चौकशी राज्य सरकारने सुरू केलेली नाही. गाळप हंगामाच्या बैठकीत, वेगवेगळ्या पैशांचा विनियोग कसा होतो, याची माहिती घेण्याचे ठरले होते.

**सुप्रिया सुळेंनी दाखवलेले पॅनकार्ड खोटे-** सहकार क्षेत्र संपवण्याचे काम भाजपाकडून सुरू असल्याच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या टीकेला प्रत्युत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, काही लोकांना रोज खोटी कागदपत्रे दाखवण्याची सवय जडली आहे. आजच त्यांनी दाखवलेले पॅनकार्ड खोटे निघाले. याविषयी त्या माफी मागणार आहेत का? हे पॅनकार्ड कोणी काढले, त्याच्यावर आता एफआयआर दाखल होत आहे. रोज खोटे ड?क्युमेंट्स घरी तयार करायचे आणि पत्रकार परिषद घ्यायची, असे सुरू आहे. माध्यमांनी त्यांच्याकडून माफी मागवून घेतली पाहिजे.

**बच्चू कडूंसोबतची बैठक रद्द का झाली?**

बच्चू कडू यांनी मला मेसेज पाठवला की, आम्ही बैठकीला येणार असल्याचे तुम्हाला सांगितले होते, पण आमचे सगळे शेतकरी नागपूरला जमा होत आहेत आणि आम्हीच तिथे नसलो तर कन्फ्युजन होईल. त्यामुळे आमचे मागणीपत्र तुमच्याकडे पाठवतो आहोत. त्यावर तुम्ही निर्णय घ्या. आम्ही बैठकीला येणार नाही. बच्चू कडूंच्या निरोपानंतर आम्ही बैठक रद्द केली. त्यांच्या मागणीपत्रातील ज्या बाबींवर सकारात्मक निर्णय घेता येतील, ते घेउ.

**आदित्य ठाकरे महाराष्ट्राचे पप्पू-** शिवसेनेचे (उबाठा) नेते आदित्य ठाकरेंनी केलेल्या मतचोरीच्या आरोपांवर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, माझी अपेक्षा होती की आदित्य ठाकरेंनी मी महाराष्ट्राचा पप्पू आहे, असे प्रदर्शन करू नये. पण ज्याप्रकारे राहुल गांधींनी मोठी स्क्रीन लावून खोदा पहाड, निकला चूहा करून दाखवले, तेच आदित्य ठाकरेंनी केले. त्यांच्या प्रश्नांची उत्तरे निवडणूक आयोगाने आधीच दिलेली आहेत. माझी एवढीच अपेक्षा आहे की, किमान तुम्ही राहुल गांधी बनू नका, असा टोला देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लगावला.

**मंत्रिमंडळ बैठकीतील महत्त्वाचे निर्णय-** नियोजन विभाग : विकसित महाराष्ट्र-२०४७ च्या व्हिजन डॉक्युमेंटला मान्यता. विकसित महाराष्ट्र-२०४७च्या अंमलबजावणीसाठी मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली विकसित महाराष्ट्र व्हिजन मॅनेजमेंट युनिट (व्हीएमयू) गठित करणार. राज्यातील नागरिकांकडून मतं व प्रतिसाद मागवून, त्यांचे एआय-आधारित विश्लेषण करून डॉक्युमेंट तयार. राज्य व जिल्हा पातळीवरील १६ संकल्पना निश्चित. प्रगतिशील, शाश्वत, सर्वसमावेशक आणि सुशासन या अंतर्गत १०० उपक्रम निश्चित.

**गृह विभाग** : सोलापूर-तुळजापूर-धाराशिव या नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्गाच्या सुधारित खर्चास व राज्य शासनाच्या ५० टक्के हिश्श्यानुसार अधिकचा निधी देण्यास मान्यता.

**सामान्य प्रशासन विभाग :** सामान्य प्रशासन विभागांतर्गत राजशिष्टाचार या उपविभागाचा विस्तार. सचिव (राजशिष्टाचार, परकीय थेट गुंतवणूक, परदेशस्थ नागरिकांचे विषय आणि आंतरराष्ट्रीय संपर्क) अशा पदनाम विस्तारास मान्यता. याशिवाय परकीय थेट गुंतवणूक, आंतरराष्ट्रीय संपर्क आणि परदेशस्थ नागरिकांचे विषय अशा तीन नवीन कार्यासनांच्या निर्मितीस आणि या कार्यासनांसाठी आवश्यक पदांना मंजुरी.

नगरविकास विभाग : महापालिका, नगर परिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरींसाठी सार्वत्रिक किंवा पोट निवडणुकीत राखीव जागांवर निवडून येणा-या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत. त्यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९, आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी.

**ग्रामविकास विभाग :** ग्रामपंचायत, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक किंवा पोटनिवडणुकीत राखीव जागांवर निवडून आल्यानंतर उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत. त्यासाठी महाराष्ट्र जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदत देणे, अध्यादेश २०२५ काढण्यास मान्यता.

**विधि न्याय विभाग :** धुळे जिल्ह्यातील शिरपूर येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय आणि दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर न्यायालय. याशिवाय शासकीय अभियोक्ता कार्यालय होणार. या दोन्हींसाठी आवश्यक पदांना व खर्चाच्या तरतुदीस मंजुरी.

**महसूल विभाग :** वाशिम जिल्ह्यातील सुविदे फाउंडेशन, रिसोड यांना मौजे करडा (ता. रिसोड) येथील २९.८५ हे. आर जमीन. या जमिनीच्या भाडेपट्ट्याचे नाममात्र दराने (एक रुपया) पुढील ३० वर्षांकरिता नूतनीकरणास मान्यता.

## संक्षिप्त

### पत्नीमुळे उदय सामंत अडचणीत?

■ राष्ट्रवादीचे थेट मुख्यमंत्र्यांना पत्र ■

**मुंबई :** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून दरवर्षी आयोजित होणारी बालनाट्य स्पर्धा आणि दिव्यांग बालनाट्य स्पर्धा यंदा मोठ्या वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. यावर्षी या स्पर्धांची जबाबदारी खासगी संस्था बालरंगभूमी परिषदकडे



देण्यात आली आहे. मात्र, ही संस्था राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या पत्नी, अभिनेत्री नीलम शिर्के-सामंत यांची असल्याने राजकीय दबाव आणि हायजॅकचा गंभीर आरोप होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सांस्कृतिक विभागाचे अध्यक्ष बाबासाहेब पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना थेट पत्र लिहून या निर्णयावर आक्षेप नोंदवला आहे. बालरंगभूमी परिषदेने सांस्कृतिक कार्य संचालनालयावर दबाव आणून शासकीय स्पर्धा आपल्या ताब्यात घेतल्याचा दावा त्यांनी केला आहे.

**पारदर्शकतेचा अभाव**-गेल्या २१ वर्षांपासून या स्पर्धा शासनाच्या सांस्कृतिक विभागाकडून यशस्वीपणे आयोजित केल्या जात होत्या. मात्र, यंदा कोणतीही अधिकृत घोषणा न करता स्पर्धा खासगी संस्थेकडे सोपवण्यात आल्या. यामुळे स्पर्धांचे खासगीकरण होत असून, पारदर्शकतेचा अभाव निर्माण होईल, असा विरोधकांचा आरोप आहे. राज्यातील अनेक नामवंत नाट्य संस्थांनीही या निर्णयाला तीव्र विरोध केला असून, स्पर्धेचा दर्जा, परीक्षकांची निवड आणि पारंपरिक नाट्यप्रेमींचे योगदान धोक्यात येईल, असा इशारा दिला आहे.

**खासगी संस्थांना हक्क देणे थांबवावे**-राष्ट्रवादीने स्पष्ट मागणी केली आहे की, बालनाट्य आणि दिव्यांग बालनाट्य स्पर्धा शासनानेच स्वतः आयोजित कराव्यात. या स्पर्धांवर सांस्कृतिक कार्य संचालनालयाचेच पूर्ण नियंत्रण राहावे आणि खासगी संस्थांना हक्क देणे थांबवावे, अशी त्यांची भूमिका आहे. हा वाद आता राजकीय पातळीवर पोहोचला असून, स्पर्धांच्या भवितव्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### मालवणीचा गोडवा, ठसका जगभर पोहोचविणा-या प्रतिभावंताला मुकलो

**मुंबई :** मालवणी बोलीचा गोडवा आणि ठसका जगभर पोहोचविणारा, कोकणातील बहुमुखी प्रतिभावंत अशा साहित्यिक, नाटककाराला आपण मुकलो आहोत, अशा



शब्दांत ज्येष्ठ नाटककार गंगाराम गवाणकर यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. वस्त्रहरण या विक्रमी नाटकासह, इतर नाट्यकृतींच्या माध्यमातून मराठी रंगभूमीसाठीचे स्व. गवाणकर यांचे योगदान सदैव स्मरणात ठेवले जाईल, असेही मुख्यमंत्री यांनी म्हटले आहे. अभिजात मराठीचे सौंदर्य आणि सौष्ठव मालवणी बोली आणखी ठसठशीतपणे मांडते. अशा या मालवणीची नादमाधुर्यता आणि तिचा ठसका स्व. गवाणकर यांनी आपल्या नाट्यकृतींतून जगभर पोहोचविला. त्यांच्या इतर नाट्यकृती देखील वेगळ्या धाटणीच्या आणि आशयघन राहिल्या आहेत. पौराणिक ढाचातील वस्त्रहरण वर्तमानातील चपखल संदर्भ घेत आजही महाविक्रमी वाटचाल करीत आहे, ही त्यांच्या लेखनाची ताकद राहिली. त्यांच्या निधनामुळे मराठी रंगभूमी, कला-साहित्य क्षेत्रात पोकळी निर्माण झाली आहे. गवाणकर कुटुंबीय, मराठी रंगभूमी चळवळ, त्यांच्या चाहत्यांवर दुःखाचा आघात झाला आहे. आम्ही या सर्वांच्या दुःखात सहभागी असून, त्यांना हा आघात सहन करण्याची क्षमता मिळावी अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो आणि ज्येष्ठ साहित्यिक, नाटककार गंगाराम गवाणकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोकसंदेशात म्हटले आहे.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची 'वस्त्रहरण'कार ज्येष्ठ नाटककार गंगाराम गवाणकर यांना श्रद्धांजली**

### बार्टी, सारथी, आर्टीमध्ये पीएचडी, फेलोशिपसाठी 10 दिवसात जाहिरात प्रसिद्ध करावी-एकनाथ शिंदे

**मुंबई** : राज्यातील बार्टी, टीआरटीआय, सारथी, महाज्योती, अमृत, आर्टी या स्वायत्त संस्थांमार्फत देण्यात येणा-या अधिछात्रवृत्ती, शिष्यवृत्तीचा लाभ मिळवण्याबाबत मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने समिती नियुक्त केली आहे. या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर दहा दिवसात जाहिरात प्रसिद्ध करण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. या स्वायत्त संस्थांमध्ये पीएचडी फेलोशिपसाठीची जाहिरात गेल्या अडीच वर्षांपासून प्रसिद्ध झालेली नाही यासंदर्भात विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनाची दखल घेउन उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या समिती कक्षात बैठक झाली. यावेळी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे मंत्री संजय शिरसाट, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीन सोना, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, वित्त विभागाच्या सचिव शैला ए, इतर मागास बहुजन कल्याण विभाग सचिव आप्पासाहेब धुळाज, विद्यार्थी प्रतिनिधी उपस्थित होते.

# सुषमा अंधारे, आगवणेंवर 50 कोटींचा अब्रुनुकसानीचा दावा

## रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या वकिलांकडून नोटीस

**फलटण /प्रतिनिधी :** सुषमा अंधारे व जयश्री आगवणे यांनी पुण्यात पत्रकार परिषद घेउन माजी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्यावर केलेले आरोप चुकीचे आहेत. याबद्दल त्यांनी ४८ तासांच्या आत माध्यमांसमोर लेखी माफी मागावी, अन्यथा ५० कोटींचा अब्रुनुकसानीचा दावा ठोकला जाईल अशा आशयाची नोटीस अंधारे आणि आगवणे यांना पाठविली आहे, अशी माहिती ॲड. धीरज घाडगे यांनी दिली.



फलटण येथे सोमवारी पत्रकार परिषदेत ॲड. धीरज घाडगे यांच्यासह ॲड. सचिन शिंदे, ॲड. नरसिंह निकम उपस्थित होते. यावेळी ॲड. घाडगे म्हणाले, सुषमा अंधारे यांनी पुण्यात पत्रकार परिषद घेउन रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी २७७ एफआयआर दाखल केल्याचा आरोप चुकीचा आहे. उपविभागीय पोलिस अधिका-यांनी दिलेल्या पत्रात फलटण शहर व फलटण ग्रामीण पोलिसांत रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या फिर्यादीवरून उस मुकादमाविरोधात तक्रार अथवा गुन्हा दाखल नाही. मुकादमांना उचलून आणणे, मारहाण करून पोलिसांच्या ताब्यात देणे, अटकेनंतर अनफिट असतानाही फिटनेस सर्टिफिकेटसाठी स्थानिक डॉक्टरवर दबाव आणणे, त्यात आत्महत्या केलेल्या महिला डाक्टरचा समावेश असणे असा एकही प्रसंग घडला नाही. आरोपीने पोलिसांकडून मारहाण झाल्याची कोणतीही तक्रार न्यायालयाकडे केली नाही. सुषमा अंधारे ज्यांच्या सोबत बसलेल्या आहेत, त्या जयश्री दिगंबर आगवणे मोक्कामधल्या आरोपी असून त्यांनी फलटण पोलिस ठाण्यात कर्मचा-यांना मारहाण केली आहे. सुषमा अंधारे स्वतःचा पॉलिटिकल अजेंडा राबवण्यासाठी आल्या होत्या, की मृत डाक्टरप्रती सहानुभूतीसाठी गेल्या होत्या, की पुण्यातच बसून नाईक-निंबाळकरांची बदनामी करण्यासाठी आल्या, असा सवालही ॲड. घाडगे यांनी केला.

**या आरोपांचेही वकिलांकडून खंडन-** रणजितसिंह यांच्या त्रासामुळे नंदकुमार ननावरे यांनी आत्महत्या केल्याचे वक्तव्य सुषमा अंधारे यांनी केले आहे. परंतु, त्यांच्या नावाशी साधर्म्य असलेली व्यक्ती असल्याचे त्यांचे बंधू धनंजय ननावरे यांनी सत्र न्यायालयात प्रतिज्ञापत्र दिले आहे. तसेच त्यांनी कोणत्याही बँकेचे कर्ज घेतलेले नसल्याने कोणत्या बँका बुडवल्या हे त्यांनी स्पष्ट करावे, असे आव्हानही ॲड. घाडगे यांनी यावेळी दिले.

## सोने-चांदीच्या दरात मोठी घसरण

# सोने 4 हजारांनी तर चांदी 5 हजारांनी स्वस्त

**जळगाव/प्रतिनिधी-** सोने-चांदी खरेदी करणा-यांसाठी आनंदाची बातमी आहे. जळगावच्या सुवर्णनगरीमध्ये सोने-चांदीच्या दरामध्ये मोठी घसरण झाली आहे.



दिवाळीमध्ये सोने-चांदीचे दर प्रचंड वाढले होते. त्यामुळे ग्राहकांमध्ये नाराजीचे वातावरण होते. पण आता सलग दुस-या दिवशी सोने-चांदीच्या दरात मोठी घसरण झाली आहे. सोन्याच्या दरात ४००० रुपयांनी आणि चांदीच्या दरात ५००० रुपयांनी घसरण झाली आहे. त्यामुळे ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे. सोने-चांदी खरेदीसाठी ग्राहकांनी सुवर्णनगरीत गर्दी केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जागतिक बाजारात यूएस आणि चीन यांच्यातील सुरू असलेल्या भू-राजकीय तणावात थोडी स्थिरता आल्याने आज जळगावच्या सुवर्णनगरीत सोने-चांदीच्या बाजारात मोठी घसरण नोंदवली गेली आहे. या घसरणीमुळे लग्नसराईच्या पार्श्वभूमीवर ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे. आज दुपारच्या सत्रात सोन्याचा दर एका तासात तब्बल ४ हजार रुपयांनी खाली आला. तर चांदीचा दर ५ हजार रुपयांनी घसरल्याची नोंद झाली. सध्या जळगावच्या सराफा बाजारात सोन्याचा दर १,१७,८०० रुपये प्रति १० ग्रॅम असून चांदीचा दर १,४४,००० रुपये प्रति किलो असा आहे. जीएसटीसह सोन्याचे दर १,२१,००० रुपये आणि जीएसटीसह चांदीचे दर १,४८,००० रुपये इतके झाले आहे. सोने-चांदीच्या दरामध्ये झालेल्या या घसरणीमुळे ग्राहकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्राहकांचा सोनं-चांदी खरेदीकडे कल वाढला आहे. लग्नसराईची धामधूम सुरू असल्याने सोन्याच्या दागिन्यांची मागणी वाढली आहे. दिवाळीनंतर पुन्हा एकदा सुवर्णनगरीत सोन्याच्या खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी वाढताना दिसत आहे. स्थानिक सराफ व्यापा-यांच्या मते, जागतिक आर्थिक परिस्थितीत स्थैर्य आल्यास दरात आणखी काही प्रमाणात चढ-उतार होउ शकतो. सोनं-चांदीचे दर कमी झाल्यामुळे खरेदीची सुवर्णसंधी आहे.

# महिला डॉक्टर आत्महत्येचे दिल्लीत पडसाद

## युवा काँग्रेसचे आंदोलन; फडणवीसांचा पुतळा जाळला

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिल्ली येथे युवा काँग्रेसकडून फलटण प्रकरणाच्या निषेधार्थ तीव्र आंदोलन सुरू करण्यात आले असून मृत डॉ. संपदा मुंडे यांना न्याय मिळाला पाहिजे



अशी मागणी यावेळी कार्यकर्त्यांनी केली आहे. या आंदोलनावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पुतळा देखील जाळण्यात आला. यावेळी कार्यकर्ते पोलिसांनी लावलेल्या बॅरिकेड्सवर देखील चढल्याचे पाहायला मिळाले. तसेच देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे. फलटण येथील डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येच्या घटनेनंतर कांग्रेस नेते राहुल गांधी यांनी देखील ट्विट करत निषेध नोंदवला होता. साता-यातील घटना कोणत्याही सुसंस्कृत समाजाच्या विवेकाला हादरवून टाकणारी असल्याचे राहुल गांधी यांनी म्हटले होते. इतरांचे दुःख कमी करण्याची आकांक्षा बाळगणारी एक होतकरु डॉक्टर भ्रष्ट व्यवस्थेतील गुन्हेगारांच्या छळाचा बळी ठरली. गुन्हेगारांपासून जनतेचे रक्षण करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर सोपवण्यात आली, त्यांनीच हा सर्वात घृणास्पद गुन्हा केला असे ते म्हणाले होते. भाजपशी संबंधित काही प्रभावशाली लोकांनी तिच्यावर भ्रष्टाचार करण्यासाठी दबाव आणण्याचा प्रयत्नही केला. संरक्षित गुन्हेगारी विचारसरणीचे हे सर्वात घृणास्पद उदाहरण आहे. ही आत्महत्या नसून संस्थात्मक हत्या आहे. जेव्हा सत्ता गुन्हेगारांना संरक्षण देते, तेव्हा न्यायाची अपेक्षा कोण करू शकते? असा सवाल राहुल गांधी यांनी उपस्थित केला. डॉक्टरच्या मृत्यूने भाजप सरकारचा अमानवी आणि निर्दयी स्वभाव उघडकीस आणला आहे. न्यायाच्या या लढाईत आम्ही पीडितेच्या कुटुंबासोबत खंबीरपणे उभे आहोत. भारताच्या प्रत्येक मुलीसाठी आता भीती नाही, आम्हाला न्याय हवा आहे अशी मागणीही राहुल गांधी यांनी केली.

# राज्याच्या तिजोरीवर प्रचंड बोजा

## लाडकी बहीण योजनेसाठी एका वर्षात तब्बल 43 हजार कोटी रुपयांचा खर्च; धक्कादायक आकडेवारी पुढे



**मुंबई/ प्रतिनिधी-**महायुती सरकारला लाडकी बहीण योजनेचा फायदा निवडणुकीमध्ये प्रचंड झाला. मात्र, आता राज्याच्या तिजोरीवर या योजनेमुळे मोठा ताण येत असल्याचे पुढे येत आहे. त्यामध्ये आता धक्कादायक अशी आकडेवारी पुढे आली आहे.ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महायुती सरकारने राज्यात लाडकी बहीण योजना सुरू केली. या योजनेतून महिलांना प्रत्येक महिन्याला सरकारकडून १५०० रुपये दिले जातात. विशेष म्हणजे या योजनेसाठी अर्ज करणा-या महिलांची संख्या अत्यंत जास्त आहे. विधानसभा निवडणुकीत महायुतीला या योजनेचा प्रचंड असा फायदा झाला आणि थेट सत्तेवर यायची संधी मिळाली. मात्र. या योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर मोठा परिणाम झाला असून खर्च वाढला आहे. लाडक्या बहिणींसाठी राज्य सरकारकडून एका वर्षात ४३ हजार कोटी रुपयांचा खर्च करण्यात आल्याची मोठी माहिती नुकतीच माहिती अधिकारातून उघड झाली. या योजनेसाठी इतर विभागाच्या निधीचा वापर केला जात असल्याचा सातत्याने आरोप केला जात आहे. आरटीआय कार्यकर्ते जितेंद्र घाडगे यांनी लाडकी बहीण योजनेच्या खर्चाची आकडेवारी समोर आणली. जुलै २०२४ ते जून २०२५ या काळात ४३ हजार ०४५.०६ कोटी इतकी रक्कम वितरित करण्यात आल्याचे आरटीआयमधून समोर आले आहे. सरकारकडून काही नियमांत या योजनेत बदल करण्यात आल्याने लाभार्थी महिलांच्या संख्येत घट झाली. सरकारने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी या योजनेसाठी ३६,०००कोटी रुपयांचा निधी वाटप केला आहे.पहिल्या वर्षी सरासरी मासिक खर्च ३,५८७ कोटी होता. त्यामुळे, जर निकषांनुसार लाभार्थ्यांची संख्या आणखी कमी केली नाही, तर सरकारी तिजोरीवर दबाव वाढण्याची शक्यता आहे. मुळात म्हणजे राज्याचे अर्थमंत्री अजित पवार अनेकदा बोलताना दिसले आहेत की, सर्व गोष्टींचे सोंग करता येते पैशांचे नाही. राज्याचे उत्पन्न आहे तेवढेच आहे. मात्र, लाडकी बहीण योजनेमुळे खर्च चांगलाच वाढला आहे.माहिती अधिकारानुसार, लाडकी बहीण योजना सुरू झाल्यापासून ४३,०४५,०६ कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले आहे. जुलै महिन्यापासून अर्ज दाखल करताना लाभार्थ्यांची संख्या वाढली आणि एप्रिल २०२५ पर्यंत सर्वाधिक लाभार्थी म्हणजेच २,४७,९९,७९७ महिला होत्या. त्यानंतर पुढील काही महिन्यांत सरकारने महिलांना दाखल केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर महिलांच्या संख्येत मोठी घट झाली. लाडकी बहीण योजनेत सरकारी तिजोरीमधून मोठा पैसा जात असल्याचे या आकडेवारीवरून आता स्पष्ट होताना दिसत आहे.

# सिंहस्थ कुंभमेळ्याचे उत्कृष्ट व प्रभावी नियोजन करून नाशिकचा देशभरात लौकिक व्हावा

### कुंभमेळा मंत्री तथा मंत्री समिती प्रमुख गिरीश महाजन

**मुंबई/प्रतिनिधी :** सिंहस्थ कुंभमेळानिमित्त विविध विभागाच्यावतीने राबविण्यात येणा-या विकास प्रकल्पांचा आढावा कुंभमेळा मंत्री तथा नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा मंत्री समिती प्रमुख गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयामध्ये सिंहस्थ कुंभमेळा २०२७ मंत्री समितीच्या बैठकीत घेण्यात आला. नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याचे उत्कृष्ट व प्रभावी नियोजन करून नाशिकचा देशभरात लौकिक होईल असे नियोजन करावे, असे आवाहन श्री. महाजन यांनी यावेळी केले.यावेळी अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, उद्योग मंत्री उदय सामंत, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, क्रीडा व युवक कल्याण मंत्री माणिकराव कोकाटे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, नाशिकचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव शेखर सिंग, महापालिका आयुक्त मनीषा खत्री, नाशिक महानगर विकास प्राधिकरणाचे जलेज शर्मा, पोलीस विशेष महानिरीक्षक नाशिक परिक्षेत्र दत्तात्रय कराळे, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस अधीक्षक बाळसाहेब पाटील यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन म्हणाले, नाशिकचा कुंभमेळा पावसाळ्यामध्ये होत असल्याने विशेष खबरदारी घेण्याची आवश्यकता असून प्रशासनाने सर्व शक्यतांची पडताळणी करून कार्यवाही करावी. १२ वर्षांपूर्वीच्या कुंभमेळ्याचा अनुभव लक्षात घेता यावेळी येणा-या भाविकांची संख्या अधिक असल्याने त्या दृष्टीने सूक्ष्म नियोजन राज्य शासनाच्या वतीने करण्यात येत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी रामकुंडावर होणारी गर्दी लक्षात घेता प्रशासनामार्फत करण्यात येत असलेल्या नियोजनाबाबत समाधान व्यक्तकरून ज्या सुविधा कुंभमेळ्याच्या निमित्ताने उपलब्ध होत आहेत त्या कायमस्वरूपी नाशिकच्या जनतेला उपलब्ध व्हाव्यात या दृष्टिकोनातून नियोजन होणे आवश्यक असल्याचे यावेळी सूचित केले. तसेच गोदावरी नदीमध्ये मिसळणा-या सांडपाण्यावर देखील तातडीने कार्यवाही करून नदीपासून ते वेगळे करणे आवश्यक असल्याचे व त्यावर प्राधान्याने कार्यवाही करावी असे त्यांनी निर्देशित केले. गणालय उभारण्याची आवश्यकता असल्याचे सांगून ज्या सुविधा उभारण्यात येत आहेत त्याचा वापर भविष्यात झाला पाहिजे यासाठी प्रशासनाने नियोजन करावे असे सूचित केले.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# निवडणूक पटावरील डाव

स्थानिक स्वराज्य संस्थांसाठीच्या जागावाटपाच्या रणनीतीला सुरुवात झाली आहे. सत्ताधारी महायुतीतील घटकपक्षाचे नेते ताकद असेल तिथे स्वतंत्र लढून नंतर एकत्र येण्याची आखणी करत आहेत. विरोधक सध्या मतदारयादीविरोधी मोर्चाची तयारी करत आहेत.एएऐभारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वातील सत्ताधारी युती मतदारांना प्रलोभने दाखवते आणि निवडणुका जिंकते, त्यामुळे आता खरे तर निवडणुका लढण्यातच अर्थ नाही, असे हताश उद्गार विरोधी पक्ष काढू लागले आहेत. मतदारयादी सदोष, त्यातच कुठे १५०० रुपये महिन्याची तर कुठे १०००० रु. वर्षाची ओवाळणी! सगळी व्यवस्थाच सत्ताधाऱ्यांची बटीक. लढले तरी पराभव निश्चित! असे बडे राजकीय नेते खासगीत सांगतात. विरोधी पक्षांचा विश्वास असा डळमळीत झाला की युतीने सत्तेत असलेल्या एकमेकांना प्रतिस्पर्धी मानत स्वबलावर जागा लढून त्या जिंकत विस्तारण्याची स्पर्धा सुरू होते. सध्या महाराष्ट्रात तसेच काहीसे घडते आहे. खरे तर लोकभेतील यशानंतर विरोधी बाकांवर इतकी हताशा का हा खरे तर प्रश्न. अभ्यास केला नाही, पेपर सोडवायला आत्मविश्वास येणार कसा, असे टोमणे सत्ताधारी मारताहेत! असो. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या वारसाला उद्धव ठाकरे यांना छोटे ठरवत भाजपच्या वळचणीला येऊन बसलेल्या एकनाथ शिंदे यांना त्यांच्या राजकीय बंडाची किंमत हवी आहे. खरे तर मुख्यमंत्री करून त्यांच्या या साहसाचा सन्मान भाजपने केला होता. तो उचित होता, असे राज्यातील भाजप नेत्यांना वाटते.विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपने प्रचंड मुसंडी मारली. एकनाथ शिंदे हे मित्र असले तरी ते कुठल्या रांगेतले मनसबदार आहेत, असा प्रश्न आता त्यांना स्वतःला आणि भाजपच्या नेत्यांनाही पडत असावा. मला राजासारखे वागवा, मी उद्धव ठाकरे यांच्यापेक्षाही लोकप्रिय नेता असल्याचे सांगण्यासाठी एकनाथ शिंदे दिल्लीत गेले असावेत. आजही भारतीयांच्या मनोराज्यावर गारुड करणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना प्रदीर्घ वेळ दिला हेच शिंदे यांचे महत्त्व आहे. बिहारच्या निवडणुकांचे निकाल वेगळे लागले तर भारतीय जनता पक्षाला मित्रपक्षांची गरज अधिकच भासेल. शिंदे यांना भाजपसारख्या मजबूत संघटनात्मक बांधणी असलेल्या ज्येष्ठ सहकारी मित्रासमोर स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवायचे आहे. ते करताना जिथे स्वतःची शक्ती आहे तिथे योग्य तो वाटाही मिळवयायचा आहे. शेवटी राजकारणात स्वतःची किंमत स्वतःच ठरवायची असते आणि ती वसूलही करून घ्यायची असते. या नियमाचे अचूक पालन शिंदे करतील, असे दिसते. त्यामुळेच ठाणे या त्यांच्या गडात युती होईल की नाही याबाबत प्रश्नचिन्ह आहे. लगतच्याच कल्याण -डोंबिवलीमध्ये भाजप आणि शिंदे सेनेने आपणच दोघे ताकदवान पक्ष असल्याचे लक्षात घेत वेगवेगळे लढायचे ठरवले आहे. नवी मुंबईमध्ये ठाण्यासारखेच युद्ध आहे. तिथे भाजपकडे गणेश नाईक यांच्यासारखा एकनाथ शिंदे यांना आव्हान देणारा नेता आहे. नाईक आणि शिंदे हे दोघे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या काळातही परस्परांसमोर प्रतिस्पर्धी म्हणूनच वावरत असत.आता ही लढाई अधिकच तीव्र होणार आहे. मुंबई जिंकण्यासाठी भाऊबंदकी आता भावबंधनात बदलली आहे. ठाकरे ब्रँड एकत्र येऊन लढेल असे दिसते. भाजपदेखील हे बहुभाषिक महानगर आता सेनेचे नाही तर संपूर्ण देशातील सत्ता केंद्र असलेल्या भाजपच्या मोदींचे झाले आहे हे दाखवण्यासाठी धडपडणार आहे. त्यासाठी त्यांना खरा शिवसेना ब्रँड आमच्यासमवेत आहे हे दाखवावे लागेल. शिंदे यांची ताकद लक्षात घेऊन जागा देणे हे आव्हान आहे. उद्धव ठाकरे यांना सोडून शिंदे यांच्या आश्रयाला आलेले मुंबईतले बहुतांश माजी नगरसेवक हे भाजपच्या उमेदवारांना पराभूत करून जिंकले होते. त्यामुळे मुंबईतील जागा वाटप सोपे नाही. आगामी काही दिवसांत आचारसंहिता लागू होताच जागा वाटपाच्या चर्चा रंगू लागतील. स्थानिक नेत्यांच्या परस्पर आरोपांमुळे त्या टोकालाही जातील. यातच जनतेशी संबंधित काही प्रश्नांची चर्चा होण्याची अंधुक शक्यता आहे.स्पर्धात्मकतेमध्ये काही 'जनप्रश्न' चर्चेला येतात आणि समस्यांची उत्तरे शोधली जातात. पुण्यातील जैन बोर्डिंगच्या वादग्रस्त जागेबद्दलही असेच झाले. काँग्रेस सोडून शिवसेना शिंदे गटाच्या आश्रयाला आलेल्या रवींद्र धंगेकर यांनी पदार्पणातच राष्ट्रीय स्तरावर केंद्रीय मंत्रिपद मिळवलेल्या मुरलीधर मोहोळ यांना स्वतःच्या ताकदीची चुणूक दाखवली. मोहोळ यांनी हा हल्ला अचूक हाताळला. युतीत बेकी निर्माण होऊ नये यासाठी पुणे येथे या प्रकरणात केलेले प्रयत्न हेच साधारण निवडणुकीचे स्वरूप असेल. आरोप होतील, पण ते आरोप तुटेस्तोवर ताणले जाणार नाहीत. विरोधी पक्षाला कोणताही फायदा होऊ नये यासाठी युतीतले सहकारी परस्परांविरोधात निवडणुका लढवतील, नंतर एकत्र येतील. पिंपरी-चिंचवड येथे भाजप आणि अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्या जागावाटपात ज्यांना संधी मिळणार नाही ते शरद पवार यांच्या आश्रयाला जातील. केवळ नाराजीमुळे शरद पवारांना ४० ते ५० नगरसेवक लाभू शकतात, हे लक्षात घेत युतीचे नेते डाव टाकत आहेत- आधी दूर जायचे अन् नंतर एकत्र यायचे.राजकीय पक्षांना कायमच निवडणुकीचे वेध लागले असतात. प्रत्येक युतीचा खरा धर्म सत्ता मिळवणे हाच असतो. तुझी माझी धाव आहे सत्तेपासून सत्तेकडे, एवढेच सत्य असते. पावसाळ्याचे दिवस आले की, 'बरसाती मेंडक' जसे स्वतःची ताकद दाखवतात तसेच राजकीय पक्ष आपापल्या शक्तीची जाणीव करून देत जागांची वाटणी सुरू करतात. एखाद्या राज्याच्या सत्तेत तीन भागीदार असतील तर अर्थातच या जागा वाटपाच्या चर्चांना वेगळेच आयाम लाभतात. महाराष्ट्राने खरे तर १९९५ नंतर युतीचे राजकारण पाहिले. घ्यायचे अन द्यायचे. राजकीय पक्ष व्यावहारिकदृष्ट्या अत्यंत चतुर असल्यामुळे ही वेगळी धाव तुटेपर्यंत ताणली जात नाही. २०१९ सारखे मित्र बदलण्याचे प्रसंग कधीतरीच येतात आणि मग संपूर्ण राज्याचा राजकीय पट बदलवून टाकतात. सध्या या बदललेल्या राजकीय पटांचे खेळाडू आपापसात निवडणूक कशी लढवायची याची आखणी करत आहेत. प्रत्येकालाच आपापल्या कार्यकर्त्याला खुश ठेवायचे असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा पट हा एकेकाने आपापल्या ताकदीनुसार लढायचा हे देखील जवळपास ठरले आहे. सत्ताधारी असे सुस्पश्ट धोरण स्वीकारत असताना विरोधक मतदारयादीबद्दलचा मोर्चा किती यशस्वी करून दाखवतात ते बघायचे. महाविकास आघाडीत अद्याप अधिकृतरीत्या सामील करण्यात न आलेले राज ठाकरे या मोर्च्याचे नेते होताहेत, असे सध्या दिसते आहे.



**'ऑपरेशन सिंदूर?'नंतर भारत आणि पाकिस्तानच्या दिशा बदलल्या. पाकिस्तानने चीनबरोबरचे संबंध कायम ठेवताना अमेरिका आणि तुर्कस्तानशी संबंध वाढवले आहेत. याउलट, भारताचे अमेरिकेशी संबंध बिघडले असून, चीन, रशिया आणि अफगाणिस्तानशी वाढले आहेत. अशात पाकिस्तानमध्ये अमेरिका पासनी नावाचे बंदर विकसित करत असून, भावी काळात भारत-इराण व्यापारासह अन्य बाबींवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.**

# भारतासाठी नवी चिंता

पाकिस्तानने ग्वादर जिल्ह्यात ग्वादर बंदरापासून शंभर किलोमीटर अंतरावर पासनी बंदर विकसित करण्याबाबत दिलेल्या प्रस्तावाचा उद्देश अमेरिकेला या प्रदेशात आपले धोरणात्मक स्थान पुढे नेण्याची संधी प्रदान करतो. हे बंदर अमेरिकेला अरबी समुद्र आणि मध्य आशियातील संवेदनशील भागात आपला प्रभाव वाढवण्याची संधी प्रदान करेल. अमेरिकन गुंतवणूकदारांनी पासनीमध्ये टर्मिनल विकसित केल्याने पाकिस्तानच्या खनिज संसाधनांमध्ये, विशेषतः तांबे आणि अँटिमोनीसारख्या महत्त्वाच्या खनिजांमध्ये वाढ होईल. बॅटरी, अग्निरोधक साहित्य आणि क्षेपणास्त्र निर्मितीमध्ये ही खनिजे महत्त्वाची भूमिका बजावतात. या प्रकल्पाची किंमत अंदाजे १.२ अब्ज डॉलर असेल आणि हा पाकिस्तान आणि अमेरिकेतील संयुक्त उपक्रम असेल. पाकिस्तानची आर्थिक परिस्थिती संकटात असताना आणि परकीय गुंतवणूक कमी होत असताना, हा प्रस्ताव काहीसा सकारात्मक मानला जाऊ शकतो. पाकिस्तानच्या या पावलाचा चीन आणि भारतावरही विपरीत परिणाम होईल. पाकिस्तानच्या या पावलाचा चीनच्या 'बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह'अंतर्गत ग्वादर बंदरावर लक्षणीय परिणाम होईल. ग्वादरच्या निधी आणि संचालनात चीन सक्रियपणे सहभागी आहे आणि पासनी बंदर प्रकल्पाशी त्याची जवळीक एक जटिल राजकीय समीकरण निर्माण करते. अमेरिकेने पासनीमध्ये गुंतवणूक करणे हे चीनच्या विस्तारवादी धोरणांना थेट विरोध करणारे धोरणात्मक पाऊल म्हणून पाहिले जाईल. शिवाय, भारतासाठी हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे, कारण आपण चाबहार बंदराद्वारे इराण आणि मध्य आशियाशी आपले संबंध मजबूत करत आहे.

पासनी आणि चाबहारची जवळीक भारतासाठी एक धोरणात्मक चिंतेची बाब असू शकते. सध्या हा उपक्रम अधिकृत धोरण नाही, तर दक्षिण आशियाला प्रोत्साहन देण्यासाठी पाकिस्तानी अधिकाऱ्यांकडून राबवण्यात येत असलेला एक व्यावसायिक विचार आहे. पाकिस्तानमधील वाढत्या भू-राजकीय अशांततेमध्ये आपली भूमिका बळकट करण्यासाठी हा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. या प्रस्तावावर काही अमेरिकन अधिकाऱ्यांशी चर्चा झाली आहे. तथापि, 'व्हाईट हाऊस'मधील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी किंवा ट्रम्प प्रशासनाने या प्रस्तावावर अधिकृतपणे भाष्य केलेले नाही. अहवालात असेही म्हटले आहे, की ही योजना ट्रम्प प्रशासनाशी चांगले संबंध राखण्यासाठी पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या अनेक कल्पनांपैकी एक आहे. पाकिस्तान या पावलाद्वारे अमेरिकेशी आपले संबंध आणखी मजबूत करू इच्छित आहे. अलीकडे पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात चांगले संबंध निर्माण झाले आहेत. मे महिन्यात पाकिस्तान आणि भारत यांच्यातील युद्धबंदीचे श्रेय ट्रम्प यांनी घेतले, तेव्हा हा दावा भारताने फेटाळून लावला. पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी ट्रम्प यांच्या भूमिकेबद्दल सार्वजनिकपणे आभार मानले आणि त्यांना नोबेल शांतता पुरस्कारासाठीही नामांकित केले.'ऑपरेशन सिंदूर'नंतर अमेरिका-पाकिस्तान संबंध पूर्णपणे बदलले आहेत.

मुनीर यांनी अमेरिकेला दुर्मीळ खनिजे देण्याच्या बदल्यात पासनी येथे बंदर विकसित करण्याची चर्चा केली. गेल्या महिन्यात शाहबाज शरीफ आणि मुनीर यांच्या ट्रम्प यांच्याशी झालेल्या बैठकीनंतर पाकिस्तानने अमेरिकेला हा प्रस्ताव दिला. मुनीर यांच्या सल्लागारांनी अरबी समुद्रात बंदर विकसित करून चालवण्याचा प्रस्ताव अमेरिकन अधिकाऱ्यांना दिला. पासनी हे अफगाणिस्तान आणि इराणच्या सीमेवर असलेल्या बलुचिस्तान प्रांतातील ग्वादर जिल्ह्यात स्थित एक बंदर शहर आहे. या बैठकीत पाकिस्तानने कृषी, तंत्रज्ञान, खाणकाम आणि ऊर्जा क्षेत्रात अमेरिकेला गुंतवणुकीची विनंती केली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रस्तावाची माहिती अमेरिकन अधिकाऱ्यांना आगाऊ देण्यात आली होती महत्त्वाचे म्हणजे या योजनेत स्पष्टपणे म्हटले आहे, की हे बंदर अमेरिकेच्या लष्करी उद्देशांसाठी वापरले जाणार नाही, तर पश्चिम पाकिस्तानमधील खनिजांनी समृद्ध प्रांतांना जोडणाऱ्या रेल्वे कॉरिडॉरच्या विकासात गुंतवणूक सुरक्षित करण्यासाठी वापरले जाईल. मे महिन्यात भारताने केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'नंतर पाकिस्तान खूप घाबरला आहे. मे महिन्यात भारत आणि पाकिस्तानमधील संघर्षाच्या काही काळापूर्वी, ट्रम्प कुटुंबाच्या मालकीच्या एका कंपनीने पाकिस्तानसोबत क्रिप्टो करन्सीबाबत करार केला होता. शरीफ यांच्या व्हाईट हाऊसच्या भेटीदरम्यान पाकिस्तान आणि अमेरिकेत काही व्यापार करारही झाले होते. जून २०२४ पर्यंत, अमेरिका आणि पाकिस्तानमधील एकूण वस्तू आणि सेवा व्यापार १०.१अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी तो आतापर्यंत ६.३ टक्के वाढला आहे. पाकिस्तानमधून अमेरिकेला एकूण कापड आणि सेवा निर्यात ५.१ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकी होती आणि अमेरिकेतून पाकिस्तानला निर्यात २.१ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकी होती. दोन्ही देशांमधील व्यापार तूट तीन अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत त्यात ५.९ टक्के वाढ आहे. शीतयुद्धाच्या काळात पाकिस्तान हा अमेरिकेचा एक महत्त्वाचा मित्र मानला जात होता; परंतु ९/११ नंतर दहशतवादविरोधी पाकिस्तानच्या दुटप्पी दृष्टिकोनामुळे संबंध दुरावले. तथापि, 'ऑपरेशन सिंदूर' नंतर अमेरिका पुन्हा पाकिस्तानकडे झुकली आहे. प्रादेशिक स्थैर्य, खनिज संसाधनांमध्ये प्रवेश आणि चीनच्या वाढत्या प्रभावाचे संतुलन ही त्यामागील कारणे आहेत. पाकिस्तानने अमेरिकेला बलुचिस्तानमधील पासनी येथे १.२ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त खर्चाचे नागरी बंदर बांधण्याची आणि चालवण्याची ऑफर दिली आहे. हे बंदर चीनने बांधलेल्या ग्वादर बंदरापासून फक्त शंभर किलोमीटर अंतरावर आहे आणि संयुक्तपणे विकसित केलेल्या भारत-इराण चाबहार बंदराजवळ आहे.हा प्रस्ताव आकर्षक बनवण्यासाठी, पाकिस्तानने त्याच्या खनिज संपत्तीमध्ये, विशेषतः दुर्मीळ पृथ्वी खनिजांमध्ये प्रवेश देण्याचे संकेत दिले आहेत. ते संरक्षण आणि स्वच्छ ऊर्जा तंत्रज्ञानासाठी महत्त्वाचे आहेत. यामुळे पाकिस्तानला अमेरिकेकडून गुंतवणूक आणि राजनैतिक पाठिंबा मिळण्याची अपेक्षा आहे. पासनीमधील उपस्थितीमुळे अमेरिकेची अफगाणिस्तान आणि इराणवर देखरेख ठेवण्याची क्षमता पुनर्संचयित होऊ शकते. २०२१ मध्ये अमेरिकेने अफगाणिस्तानमधून माघार घेतल्यानंतर ही देखरेख कमी झाली होती. पाकिस्तानची अमेरिकेसोबतची संरक्षण, अर्थव्यवस्था आणि राजनैतिक क्षेत्रातील युती अभूतपूर्वपणे मजबूत झाली आहे. या वर्षी तुर्कस्तानचे अध्यक्ष एर्दोगान यांच्या इस्लामाबाद भेटीदरम्यान पाक-तुर्कीदरम्यान मानवरहित हवाई वाहने आणि रडार प्रणालींच्या संयुक्त उत्पादनासह २४ करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी कराची इंडस्ट्रियल पार्कमधील एक हजार एकर जमीन तुर्कीचे अध्यक्ष एर्दोगान यांना मोफत देण्याची घोषणा केली. तेथे एक निर्यात प्रक्रिया क्षेत्र (ईपीझेड) स्थापन केले जाईल. ते कर सवलती, सुलभ रसद आणि मध्य आशिया आणि आखाती देशांना थेट शिपिंग देईल. हे केवळ आर्थिक पाऊल नाही, तर एक राजनैतिक संकेतही होता. टर्मिनलपासून जेमतेम तीनशे किलोमीटर अंतरावर आहे. अमेरिकेला तेथे प्रवेश मिळाल्यास चाबहार (भारत-इराण), ग्वादर (चीन-पाकिस्तान) आणि पासनी (अमेरिका-पाकिस्तान) या धोरणात्मक नोड्समुळे एक त्रिकोण तयार होईल. त्यामुळे भारताची कोंडी होईल. अमेरिका-पाकिस्तान ड्रोन सहकार्य भारताच्या पश्चिम सीमेवर नवीन गुप्तचर क्षमता प्रदान करू शकते. कराचीमध्ये तुर्कस्तानची वाढती आर्थिक उपस्थिती भारताच्या विरोधात आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर तुर्कस्तान-पाकिस्तान युतीला बळकटी देऊ शकते. पाकिस्तानचे धोरण निश्चितच धाडसी आहे; परंतु हा मूलतः 'भूगोल विकून अर्थव्यवस्था वाचवण्याचा' प्रयत्न आहे.

**प्रा. जयसिंग यादव**

# कोकण किनारा विकासाची नवी दिशा!



अनेकवेळा समुद्राचीही तोंडओळख नसलेल्या मंत्र्यांकडे कार्यभार असल्याने अनेकवेळा हा विभाग नेहमीच उपेक्षित राहिला. त्यामुळे वर्षानुवर्षे मत्स्यव्यवसायाशी संबंधित सर्वच प्रश्न आणि समस्या ज्याठिकाणी होते तिथेच राहिले. कोकणच्या मच्छीमारांचेही अनेक प्रश्न गेली अनेक वर्षे कागदावरच होते. या प्रश्नांची चर्चा विधीमंडळात झालीच तर ते प्रश्न सुटत नव्हते. परंतु दहा महिन्यांपूर्वी बंदरे व मत्स्य विभागाचा कार्यभार मत्स्योद्योग व बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांनी स्विकारल्यानंतर कोकणातील १२१ कि.मी.च्या किनारपट्टीवर विकासाचा खऱ्या अर्थाने एक नव पर्व सुरू झाले.

कोकणातील फळबागायती जशी निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून आहे तसाच कोकणातील मत्स्यव्यवसायही अलीकडच्याकाळात समुद्रात होणाऱ्या बदलावर अवलंबून झालेला आहे. एकतर काँग्रेसी सत्ताकाळात मत्स्यव्यवसाय खाते कुठल्यातरी विदर्भ किंवा मराठवाड्यातील नेत्याकडे मत्स्यविभागाच मंत्रालय दिले जायच. ज्यांचा समुद्र आणि मत्स्यव्यवसायाशी काहीही संबंध नसायचा. कधी कोणती माहितीही नसायची अशा मंत्र्यांकडे हा या मत्स्यव्यवसाय विभागाचा कारभार असायचा. बर त्यातही त्यांना कोकणात आणि या मत्स्यव्यवसाय विभागात काडीचाही रस नसायचा. अनेकवेळा समुद्राचीही तोंडओळख नसलेल्या मंत्र्यांकडे कार्यभार असल्याने अनेकवेळा हा विभाग नेहमीच उपेक्षित राहिल्याचा पाहायला मिळाला आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे मत्स्यव्यवसायाशी संबंधित सर्वच प्रश्न आणि समस्या ज्याठिकाणी होते तिथेच राहिल्याचे पूर्वीचे कोकणच्या मच्छीमारांचेही अनेक प्रश्न गेली अनेक वर्षे कागदावरच होते. परंतु दहा महिन्यांपूर्वी बंदरे व मत्स्य विभागाचा कार्यभार नितेश राणे यांनी स्वीकारल्यानंतर कोकणातील १२१ कि.मी.च्या किनारपट्टीवर विकासाचा खऱ्याअर्थाने एक नव पर्व सुरू झाले. कोकणच्या समुद्रात मासेमारीसाठी परराज्यातून मोठ्या प्रमाणावर आधुनिक ट्रॉलर्स येत होत्या. परराज्यातून येणाऱ्या बोटी कोकणातील समुद्रातील मत्स्योत्पादन घेऊन जायचे. बंदी असूनही ही मासेमारी व्हायची. परराज्यातील बोटींची दादागिरीही चालायची. त्यालाही आळा घालण्याची आवश्यकता होती. त्याबाबतीतही बंदरे आणि मत्स्यव्यवसाय विभागाने दखल घेत तो प्रयत्नही यशस्वी झाला. कोकणातील बोट वाहतूक बंद झाल्यानंतर गेल्या चाळीस वर्षांत कोकणातील किनारपट्टीला अवखळा आली होती; परंतु आता पुन्हा एकदा कोकण किनारपट्टीला निश्चितच चांगले दिवस येतील यात शंका नाही. कोकणातील मच्छीमार हा परराज्यातून येणाऱ्या मासेमारी बोटींमुळे हैराण होता.परंतु परराज्यातील मच्छीमार बोटींवर कारवाई व्हायला लागल्यानंतर कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील समुद्रात परराज्यातून येऊन अनधिकृतपणे मासेमारी करण्यावर आपोआपच बंधन आले आहे. एकीकडे मत्स्यव्यवसाय अडचणीत असताना भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या महायुती सरकारने मत्स्यव्यवसायाला कृषीचा दर्जा दिल्याने कृषीला असलेल्या सोयी सुविधा मच्छीमारांनाही लागू होत आहेत. त्यातच सरकारने महाराष्ट्रातील मच्छीमारांना शेतकऱ्यांप्रमाणेच वीजदरात सवलत देण्यात आली आहे. मच्छीमारांना वीज दरात सवलत दिल्याने मच्छीमारांसाठी राज्यसरकारने घेतलेला हा फार मोठा निर्णय आहे. पाऊस, वादळ याचा तडाखा जसा फळबागायतदार शेतकरी यांना बसला आहे. या पार्श्वभूमीवर मच्छीमारांसाठी वीजदरात शेतकऱ्यांना जशी सवलत मिळते तशी सवलत मच्छीमारांना मिळणार असल्याने त्याचा फायदा महाराष्ट्रातील मच्छीमारांना मिळणार आहे.

शेतकऱ्यांप्रमाणे मच्छीमारांनाही सवलतीच्या दरात वीज देण्याची मागणी मत्स्योद्योग व विकासमंत्री नितेश राणे यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली होती. नितेश राणे यांच्या मागणीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मकतेने मान्यता देत नुकत्याच झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीतही मच्छीमारांना सवलतीच्या दरात वीज देण्याचा निर्णय घेतला. मत्स्यव्यवसाय प्रकल्पांना सवलतीच्या दरात वीज मिळण्यासाठी मत्स्यप्रकल्पाची राष्ट्रीय मत्स्य विकास मंडळाकडे नोंदणी असणे आवश्यक असणार आहे. नितेश राणे यांनी राज्याच्या मत्स्यद्योग व बंदरे विकास खात्याचा कारभार स्वीकारल्यानंतर बंदरे विकास आणि मत्स्यविकासासाठी अनेक निर्णय घेण्यात आले. जे निर्णय आजवर कधीच घेण्यात आले नव्हते. या घेतलेल्या निर्णयाने कोकणातील बंदरांना उर्जितावस्था प्राप्त होईल आणि उपेक्षित राहिलेल्या मच्छीमार बांधवांनाही समुद्रकिनारी विकासाच्या नव्या पर्वाचा प्रारंभही झाला आहे. यामुळे कोकणातील मच्छीमार बांधव आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल.

मैत्रीपूर्ण स्वबळावरचे वारे...!

महाराष्ट्रात सध्या राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. राज्यातील महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका निवडणुकांचे केव्हाही बिगुल वाजेल. निवडणुकीची आचारसंहिता जाहीर व्हायची सध्या प्रतीक्षा आहे. राज्यातील राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) शिवसेना(उबाठा गट) यांची महाविकास आघाडी जरी मुंबईत निवडणुकीसाठी जागी झाली असली तरीही कोकणात मात्र महाविकास आघाडीतील सर्वच राजकीय पक्ष पूर्णपणे निद्रिस्त आहेत. कोकणात महाविकास आघाडीतील सर्वच घटकपक्ष आगामी निवडणुकांना सामोरे जाण्याच्याही मानसिकतेत नाही. महाविकास आघाडीतील घटक पक्षांतून काही मोजकेच कार्यकर्ते राहिले आहे. तर उबाठा सेनेतील अनेक कार्यकर्ते केव्हाही महायुतीतील घटक पक्षात उडी मारतील अशी स्थिती आहे. अनेक कार्यकर्ते फार सावध भूमिका घेऊन आहे. यामुळे महाविकास आघाडीच्या पक्षात पुढच्या १५ दिवस महिनाभरात काय घडेल हे सांगणे फारच अवघड आहे. महायुतीतील घटक पक्ष असलेले भारतीय जनता पक्ष, शिवसेना शिंदेगट, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या महायुतीतील घटक पक्ष आगामी निवडणुकीला सामोरे जाण्याच्या तयारीत आहे. नगरपंचायत, नगर परिषद, जिल्हा परिषद, पंचायत समिती या निवडणुकीमध्ये महायुतीतील सर्वच पक्षांना या निवडणुकीला स्वबळावर निवडणूक लढवून सामोरे जावे असे वाटते. प्रत्येक प्रभागात आणि जिल्हा परिषद, पंचायत समितीत एकापेक्षा अनेकजण इच्छुकही आहे. त्यामुळे कोकणात महायुतीतील घटक पक्षामध्ये मैत्रीपूर्ण लढती होतील अशी शक्यता आहे. अर्थात महायुतीतील नेत्यांमधील समन्वयातूनही या निवडणुकीसंबंधीचा निर्णय होऊ शकतात. रत्नागिरी जिल्ह्यातही राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप आणि शिवसेना या तीनही पक्षांकडून महायुतीचा प्रयत्न होऊ शकेल किंवा स्वबळावर निवडणुका लढवल्या जाऊ शकतात. सिंधुदुर्ग जल्ह्यातही मैत्रीपूर्ण लढती अपेक्षित आहेत. प्रत्येक पक्षातील कार्यकर्त्यांनाही वाटत असते. आपल्याच पक्षाची ताकद अधिक आहे. आपण सहज निवडून येऊ शकतो किंवा निवडणुका जिंकू शकतो. यासाठी स्वबळावरच निवडणुका लढवल्या पाहिजेत असे वाटत रहाणाऱ्या कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर राखण्यासाठी नेत्यांनाही निवडणुका स्वबळावर लढविण्याचा विचार करावा लागतो. यामुळेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि महायुतीचे कॅप्टन देवेंद्र फडणवीस यांनी मैत्रीपूर्ण लढतीचे सुतोवाच केले. मुंबईत महायुतीच्या माध्यमातून निवडणुका लढविण्याचा निर्णय घेण्यात आला. कोकणातही महायुतीतील घटक पक्ष समन्वयानेच या निवडणुकांना सामोर जातील. ज्या जागांवर एकापेक्षा अधिकजण इच्छुक असतील तर त्याठिकाणी त्या-त्या भागातील राजकीय परिस्थितीचा अंदाज घेऊन निर्णय घेण्यात येतील असा राजकीय धुरीणांचा अंदाज आहे. घोडा मैदान आता जवळच आहे. कोकणात राजकीयदृष्ट्या काय-काय घडेल याचे चित्र लवकरच स्पष्ट होईल.

**- संतोष वायंगणकर**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सखय

# एकतेचा संदेश घेऊन 'सरदार @१५० युनिटी मार्च' यवतमाळात

## ३१ नोव्हेंबर रोजी अमोलकचंद महाविद्यालयातून भव्य पदयात्रेची सुरुवात

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ : युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालय तसेच माय भारत यांच्या संयुक्त विद्यमाने 'विकास भारत पदयात्रा' अंतर्गत देशभरात सरदार @१५० युनिटी मार्च आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमाचा उद्देश तरुणांमध्ये राष्ट्रीय अभिमान, सामाजिक जबाबदारी आणि एकतेची भावना दृढ करणे हा आहे. लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या या मोहिमेद्वारे तरुणांना अखंड भारत आणि स्वावलंबी भारताचे आदर्श स्वीकारण्यास प्रेरित केले जाणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक सहभागावर आधारित राष्ट्रउभारणीच्या संकल्पनेतून प्रेरित या उपक्रमाद्वारे तरुणांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांना राष्ट्रनिर्मितीच्या प्रवासात सक्रियपणे सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. 'अमृत पिढी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आजच्या तरुणांना देशाच्या भविष्याचा कणा मानून त्यांच्यात देशभक्तीची भावना जागृत करणे हा या मोहिमेचा प्रमुख हेतू आहे. या पदयात्रेचा डिजिटल टप्पा केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी ६ ऑक्टोबर २०२५ रोजी MY Bharat पोर्टलवरून सुरू केला. सोशल मीडिया रील स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा आणि सरदार@१५० यंग लीडर्स प्रोग्राम या अंतर्गत देशभरातील तरुणांना सहभागाची संधी मिळाली आहे. या कार्यक्रमातील १५० विजेत्यांना राष्ट्रीय स्तरावरील पदयात्रेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. या मोहिमेचा जिल्हास्तरीय टप्पा देशभरात ३१ ऑक्टोबरपासून सुरू होत असून, यवतमाळ जिल्ह्यात ३१ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ८ वाजता अमोलकचंद महाविद्यालय, गोधनी रोड येथून या पदयात्रेचा शुभारंभ होणार आहे.

पदयात्रेचा मार्ग पुढीलप्रमाणे असेल अमोलकचंद महाविद्यालय,जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,अँग्लो हिंदी स्कूल,जाजू चौक,दत्त चौक माईंदे चौक,अँग्लो हिंदी स्कूल,अमोलकचंद महाविद्यालय. या मोर्चादरम्यान सरदार पटेल यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली जाईल, 'आत्मनिर्भर भारत' व 'गर्वाने स्वदेशी' प्रतिज्ञा घेतली जाईल तसेच सांस्कृतिक कार्यक्रम आणि प्रमाणपत्र वितरण सोहळे आयोजित केले जातील. मोर्च्यापूर्वी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये निबंध स्पर्धा, वादविवाद, सरदार पटेल यांच्या जीवनावर परिसंवाद, तसेच पथनाट्यांचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय स्वच्छता मोहीम, योग व आरोग्य शिबिरे आणि ड्रग्जमुक्त भारताची प्रतिज्ञा यासारखे कार्यक्रमही राबविण्यात येणार आहेत. या पदयात्रेचे नेतृत्व स्थानिक प्रशासन, माय भारत प्रतिनिधी, एनसीसी अधिकारी, तसेच जिल्ह्याचे लोकप्रतिनिधी करतील. राष्ट्रीय पदयात्रा २६ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर राष्ट्रीय पातळीवर १५२ किमीची ही पदयात्रा करमसद (सरदार पटेलांचे जन्मस्थान) ते केवडिया येथील स्टॅच्यू ऑफ युनिटी दरम्यान पार पडेल. मार्गावरील १५० थांब्यांवर सरदार पटेलांच्या जीवनावर आधारित प्रदर्शने, 'सरदार गाथा' कथन आणि सामाजिक विकास उपक्रम राबविण्यात येतील. या ऐतिहासिक उपक्रमात सहभागी होण्यासाठी सर्व तरुणांनी MY Bharat पोर्टल https://mybharat.gov.in/pages/unitymarch येथे नोंदणी करावी, असे आवाहन युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाकडून करण्यात आले आहे. "एक भारत, श्रेष्ठ भारत" या भावनेने प्रेरित हा युनिटी मार्च, तरुणांना राष्ट्रनिर्मितीच्या मार्गावर एकत्र आणणारा प्रेरणादायी उपक्रम ठरणार आहे.



## घाटंजीत श्री संत नगाजी महाराज जयंती उत्साहात

घाटंजी - तालुक्यातील नाभिक समाजाच्या वतीने साई मंदिर देवस्थान घाटंजी येथे श्री संत शिरोमणी नगाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. सुरवातीला नगाजी महाराज यांच्या पालखीची गावातुन मिरवणूक काढण्यात आली. मुरली येथील महिला भजन मंडळाने वाजत- गाजत नामाचा गजर करीत कार्यक्रमात उत्साहाने भजने सादर केली. या कार्यक्रमाकरिता प्रमुख पाहुणे माजी उपनगराध्यक्ष परेश कारिया, सामाजिक कार्यकर्ते महेश पवार, मनोज हामंद, जितेंद्र जुनगरे, प्रशांत मस्के, कोयल मस्के, होते. मान्यवरांनी संत नगाजी महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. यावेळी नुकतीच नाभिक समाजाची नवीन कार्यकारणीत अध्यक्ष मिलिंद वाटकर, उपाध्यक्ष विकास दुल्लरवार, सचिव किरण मुद्दलवार, प्रशांत फुलभोगे, प्रदिप अवधुकर, राम वाटकर, सुरज मोतेवार, विशाल दुल्लरवार, सुनील वाटकर, नितेश ठमके, नितीन अवधुतकर, यांचा समावेश करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक गजानन भालेकर यांनी केले.

# काँग्रेसमध्ये मोठी फूट ! हजारो कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत ३० ऑक्टोबरला समता मैदानावर भव्य पक्षप्रवेश सोहळा

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : जिल्हा काँग्रेसमधील अंतर्गत कलह, सत्तासंघर्ष आणि तणावाच्या पार्श्वभूमीवर अखेर काँग्रेसचे माजी जिल्हा सरचिटणीस प्रवीण देशमुख यांनी काँग्रेसचा "हात" सोडून राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) "घड्याळा"शी हातमिळवणी करण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या गुरुवार, ३० ऑक्टोबर रोजी यवतमाळच्या समता मैदानावर भव्य पक्षप्रवेश सोहळा पार पडणार असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत हजारो काँग्रेस कार्यकर्ते औपचारिकरित्या राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहेत.

या संदर्भात स्थानिक विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्य उपाध्यक्ष वसंतराव घुईखेडकर यांनी माहिती दिली. पत्रपरिषदेत प्रवीण देशमुख, नानाभाऊ गाडबोळ, क्रांती राऊत (धोटे), सुनयेना यवतकर, विवेक देशमुख, योगेश धानोरकर, अबोली देशमुख, विराज घुईखेडकर आदी पदाधिकारी उपस्थित होते. घुईखेडकर म्हणाले, "राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) हा शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारसरणीवर चालणारा पक्ष आहे. या विचारांनी प्रेरित होऊनच पक्षाची जडणघडण झाली आहे. त्यामुळे समाजाभिमुख कार्य करणाऱ्या अनेक नेत्यांनी पक्षात प्रवेश घेण्याची इच्छा व्यक्त केली आहे." काँग्रेसमध्ये गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेले अंतर्गत मतभेद आणि नेतृत्व संघर्ष यामुळे प्रवीण देशमुख गटातील अनेक पदाधिकाऱ्यांमध्ये नाराजी होती. माजी शिक्षणमंत्री प्रा. वसंत पुरके यांच्यासोबत विधानसभा निवडणुकीदरम्यान निर्माण झालेल्या शीत युद्धानंतर देशमुख गटाने पक्षप्रवेशाची तयारी केली होती. सप्टेंबरअखेर देशमुख यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश घेणार असल्याची घोषणा पत्रकार परिषदेत केली होती. मात्र, ५ ऑक्टोबर, २७ ऑक्टोबर आणि २९ ऑक्टोबर या तीनही तारखांना अजित पवार यांचा दौरा पुढे ढकलला गेल्याने प्रवेश सोहळा रद्द करण्यात आला होता. आता ३० ऑक्टोबरला हा बहुप्रतीक्षित सोहळा निश्चित झाला आहे. या प्रवेश सोहळ्यासाठी जिल्ह्यातील काँग्रेस, शेतकरी संघटना, सहकारी संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मोठ्या प्रमाणावर पदाधिकारी सामील होणार आहेत. यामध्ये कळंब, बाबुळगाव, उमरखेड, वणी, मारेगाव आदी तालुक्यांतील काँग्रेसचे कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, नगरपंचायत आणि नगरपरिषद सदस्य यांचा समावेश आहे. सुमारे १५ हजारांवर कार्यकर्ते आणि पदाधिकारी या सोहळ्याला उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार हे सकाळी यवतमाळ जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांची भेट घेऊन नुकसानभरपाईच्या कामाचा आढावा घेतील.

यानंतर ते जिल्ह्यातील विकास कामांची बैठक घेऊन थेट समता मैदानावर येऊन पक्षप्रवेश सोहळ्यात सहभागी होतील. या वेळी ते कार्यकर्त्यांना संबोधित करून आगामी निवडणुकांच्या तयारीबाबत मार्गदर्शन करणार आहेत. राजकीय समीकरणात मोठा बदल अपेक्षित प्रवीण देशमुख यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश हा यवतमाळ जिल्ह्यातील काँग्रेससाठी मोठा धक्का मानला जात आहे. जिल्हा स्तरावर काँग्रेसच्या संघटनात्मक बांधणीवर या घडामोडींचा परिणाम होणार असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधानसभा निवडणुकीत राजकीय समीकरणात लक्षणीय बदल होण्याची चिन्हे आहेत.

# महागाव तालुक्यामध्ये शिवसेना (शिंदे गट) एकाच समाजाच्या दावणीला?

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत इतर समाज 'मस्ती उतरवण्या'च्या तयारीत?

**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव - तालुक्यात शिवसेना (शिंदे गट) मध्ये सध्या 'सगे-सोयरे' गट सक्रिय झाल्याचे चित्र असून, सर्वसमावेशक राजकारणाला बगल देत केवळ नातेवाईक आणि एकाच समाजातील मित्रांना महत्त्वाच्या पदांवर संधी देण्यात आल्याने इतर समाजांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आणि इतर निवडणुकांमध्ये या धोरणामुळे इतर समाज शिवसेना पदाधिकाऱ्यांची मस्ती उतरवण्याच्या तयारीत असल्याची चर्चा तालुक्यात रंगली आहे.

महागाव तालुक्यातील शिवसेना (शिंदे गट) च्या संघटनात्मक बांधणीत आणि महत्त्वाच्या निर्णय प्रक्रियेत उपजिल्हा प्रमुख व तालुका प्रमुख यांनी आपल्याच समाजातील नातेवाईक,मित्र असलेल्या कार्यकर्त्यांनाच प्राधान्य देत आहे. यात महत्त्वाचे तालुकाप्रमुख, उपतालुकाप्रमुख, विभागप्रमुख,युवासेना , यांसह विविध आघाडीची महत्वाची पदे देताना 'रक्ताचे नाते' आणि 'समाजातील सोयरे' यांनाच झुकते माप मिळाल्याचे स्पष्टपणे दिसत आहे.

राजकीय पक्ष बांधणी करताना विविध समाजघटकांना प्रतिनिधीत्व देणे, त्यांची ताकद ओळखणे आणि सर्वसमावेशक धोरण ठेवणे अपेक्षित असते. मात्र, महागाव तालुक्यात शिवसेना शिंदे गटाने या तत्त्वाला फाटा देण्यात आला आहे. विशेषतः मराठा, ओबीसी, दलित ,आदिवासी आणि इतर अल्पसंख्याक समाजातील निष्ठावान कार्यकर्त्यांना आणि नेत्यांना जाणूनबुजून डावलण्यात आल्याची तक्रार आहे. यामुळे अनेक जुने आणि निष्ठावान कार्यकर्ते बाजूला फेकले गेल्याची भावना आहे. ज्या समाजाने शिवसेनेच्या (शिंदे गट) वाढीसाठी मेहनत घेतली, त्यांना कोणतीही विचारणा न करता केवळ एकाच विशिष्ट समाजाला पदे दिल्याने इतर समाजांमध्ये नाराजीचा सूर उमटला आहे. "वर्षानुवर्षे पक्षासाठी काम करूनही आम्हाला केवळ 'कॅशियर' म्हणून वापरले गेले," अशी खंत एका ज्येष्ठ कार्यकर्त्यांने व्यक्त केली. आगामी काळात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद,पंचायत समिती निवडणुकीत या 'सगे-सोयरे' पॅटर्नचा थेट परिणाम दिसण्याची शक्यता आहे. नाराज झालेले समाज आणि कार्यकर्ते यांनी एकत्र येत 'ज्यांनी आम्हाला डावलले, त्यांची मस्ती उतरवण्याची' तयारी सुरू केल्याचे सूत्रांनी सांगितले. मतांचे ध्रुवीकरण आणि बंडखोरी होण्याची शक्यताही वर्तवली जात आहे. या संदर्भात शिवसेना (शिंदे गट) च्या तालुका नेतृत्वाने तातडीने पक्षांतर्गत समन्वय साधून सर्व समाज घटकांना न्याय दिला नाही, तर तालुक्यात पक्षाला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, केवळ काही मोजक्या लोकांमध्ये पदे वाटून टाकल्याने पक्ष वाढण्याऐवजी संकुचित होत असल्याचे हे ज्वलंत उदाहरण आहे.

पालकमंत्र्यांचे सुद्धा समाजालाच प्राधान्य का?

शिवसेना प्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी माणसाच्या हक्कासाठी लढण्यासाठी शिवसेनेची स्थापना करून जातीपातीच्या राजकारणाला कधीच थारा दिला नाही.

परंतु त्याच बाळासाहेबांच्या तालमीत वाढलेल्या यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी मात्र महागाव तालुक्या आपल्याच समाजातील उपजिल्हा प्रमुख, तालुका प्रमुख व इतर महत्वाची पदे दिल्याने केवळ आपल्या समाजाला प्रथम प्राधान्य देत पक्षातील इतर समाजातील कार्यकर्त्यांना महत्वाच्या जबाबदाऱ्यांमधून वगळले असल्याचा आरोप कार्यकर्ते करीत आहेत.

# जागृतीचे आवाहन : आपल्या पिढीसाठी एक जबाबदारी!

## बदलत्या काळात पालकांना योग्य दिशा देणारी 'सुजाण पालकत्व' कार्यशाळा पांढरकवड्यात

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - सतत बदलत जाणाऱ्या आधुनिक युगात मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या आहारी गेलेली आजची तरुण पिढी संस्कार, मूल्यं आणि जबाबदारीपासून दूर जात आहे. विद्यार्थ्यांच्या वर्तनात, अभ्यासावरील अनास्था आणि मानसिक ताणतणावामुळे अनेक कुटुंबांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या बदलत्या परिस्थितीत पालकांना योग्य मार्गदर्शनाची गरज ओळखून पांढरकवडा शहरात 'सुजाण पालकत्व – बदलत्या काळात आपल्या मुलांना योग्य दिशा' या विषयावर विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

या कार्यशाळेत प्रसिद्ध तज्ञ डॉ. गिरीश माने आणि डॉ. सौ. वृषाली माने हे पालकांना मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा रविवार, दिनांक २ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजता मित्र क्रीडा मंडळ मैदान, पांढरकवडा येथे पार पडणार आहे. या कार्यक्रमात वर्ग ५वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांना मुलांच्या वाढत्या मानसिक ताणतणाव, अभ्यासातील अनास्था आणि तंत्रज्ञानाच्या अतिवापरामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर उपयुक्त सल्ला मिळणार आहे. युवा टायगर फोर्सचे संस्थापक अध्यक्ष मदन जिद्देवार यांनी सर्व पालक, शिक्षकवृंद आणि सुज्ञ नागरिकांना आवाहन केले आहे की "आपल्या मुलांचं भविष्य उज्ज्वल करायचं असेल, तर आज त्यांच्यासोबत चालणं आणि त्यांना योग्य दिशा देणं आपली पालक म्हणून जबाबदारी आहे. प्रत्येक पालकाने या उपक्रमात सहभागी होऊन समाजात जागरूकतेचा संदेश द्यावा." या कार्यशाळेत शहरातील विविध शैक्षणिक संस्था, महाविद्यालये आणि सामाजिक संघटनांचा सहभाग राहणार आहे. कार्यक्रमाचे आयोजन सर्व शैक्षणिक संस्था, तालुका पांढरकवडा आणि युवा टायगर फोर्स, पांढरकवडा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आल्याची माहिती युवा टायगर फोर्स चे संयोजक अंकित नैताम यांनी दिली आहे.

# वेचक

## जिल्ह्यात दोन दिवस मुसळधार पावसाची शक्यता

यवतमाळ : हवामान विभागाने जिल्ह्यात दोन दिवस पावसाचा इशारा दिला आहे. यामध्ये मंगळवारी 'यलो', बुधवारी 'ऑरेंज' अलर्ट जारी केला आहे. त्यानुसार, बहुतांश भागात मध्यम आणि जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या कालावधीत विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस होण्याची शक्यता असल्याने जिल्हा प्रशासनाने सर्व नागरिकांना आणि विशेषतः शेतकऱ्यांसाठी तातडीच्या सूचना निर्गमित केल्या आहेत. विजा कोसळून होणारी जीवित हानी आणि वादळी वाऱ्यामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी नागरिकांनी विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. याकरीता शेतपिकांच्या काढणीनंतर शेतीपिके त्वरित सुरक्षित ठिकाणी ठेवावीत. आकाशात विजा चमकत असल्यास त्वरित सुरक्षित स्थळी जावे, कोणत्याही परिस्थितीत झाडाखाली थांबणे टाळावे. तालुका तहसीलदारांनी त्यांचे नियंत्रण कक्ष २४ तास अलर्ट राहावे, असे निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुध्द बक्षी यांनी कळविले आहे.

## वाहनाच्या धडकेत कामगार जखमी

पांढरकवडा : एका अज्ञात वाहनाच्या धडकेत धाब्यावर काम करणारा कामगार गंभीर जखमी झाला. ही घटना २५ ऑक्टोबर रोजी सकाळी ८.३० वाजताच्या सुमारास तालुक्यातील मंगी बसस्थानकावर घडली. अजय आहत्रे (५०) असे जखमी कामगाराचे नाव आहे. घटनेनंतर हरजीतसिंग रणजीत सिंग (५०) रा. कोंघारा तालुका केळापूर यांनी पांढरकवडा पोलीस ठाणे गाठून याप्रकरणी रीतसर तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी अज्ञात वाहन चालकावर गुन्हा दाखल केला आहे.

## दुचाकीचा कट लागल्याने इसम जखमी

यवतमाळ : दुचाकीने जात असल्याने अज्ञात वाहनाचा कट लागून इसमाच्या पायाला गंभीर जखम झाली. ही घटना २६ ऑक्टोबर रोजी इचोरा फाट्यानजीक घडली. गणेश अशोक कांबळे (रा. भानसरा, ता. आर्णी) असे जखमी इसमाचे नाव आहे. ते दुचाकीने भानसरा येथून दातोडी येथे जात होते. दरम्यान इचोरा फाट्यानजीक त्यांच्या वाहनाला अज्ञात वाहनाने कट मारला असता त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली. नागरिकांनी त्यांना आर्णी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना यवतमाळ येथील जिल्हा रुग्णालयात पुढील उपचारार्थ रेफर करण्यात आले.

## राजमाता जिजाऊ नागरी पतसंस्था श्रीरामपूरकडुन बेंचचे वाटप



पुसद - राजमाता जिजाऊ नागरी सहकारी पतसंस्था पुसदच्या वतीने पुसद शहरात सह ग्रामीण भागातील वेगवेगळ्या सामाजिक स्थळांना बेंच वाटप करण्यात आले त्यामध्ये श्रीरामपूर येथील बुद्ध विहार ला, बान्सी येथील स्मशानभूमीला, श्रीरामपूर येथील महादेव मंदिराला, पुसद येथील शिवराज पार्क मध्ये असलेल्या हनुमान मंदिराला, तसेच पुसद येथील संकट मोचन हनुमान मंदिर, विटावा वार्ड येथील महादेव मंदिर या सर्व सामाजिक स्थळांना पतसंस्थेच्या वतीने नागरिकांना बसण्याकरिता होणाऱ्या अभावामुळे पतसंस्थेने प्रत्येकी दोन बेंच दिलेत त्यामुळे त्या ठिकाणी येणाऱ्या भाविक भक्तांना निश्चितच बसण्याकरिता पतसंस्थेच्या वतीने दरवर्षीच अशा पद्धतीच्या सामाजिक उपक्रमातून समाजसेवा केल्या जाते. नुकतेच पतसंस्थेची शाखा उमरखेड येथे सुद्धा वेगवेगळ्या सामाजिक संस्थांना बेलचे वाटप करण्यात आले होते. सामाजिक उपक्रमांतर्गत संस्था दरवर्षी सामाजिक कार्य करीत असते त्यामुळे संस्थेला वेगवेगळे बक्षीसही प्राप्त होतात. सामाजिक उपक्रमाची संकल्पना ही संस्थेची मार्गदर्शक तथा संस्थापक प्राध्यापक महादेव. एड रमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नेहमी केल्या जाते संस्थेने अल्प कालावधीत जनतेचा विश्वास संपादित केला असून कर्जदार तसेच संस्थेचे सर्व सभासद यांच्या सहकार्यातून संस्था प्रगतीपथाकडे जात आहे संपूर्ण जिल्ह्यात संस्थेच्या आता पाच शाखा कार्यरत असून त्याही शाखाची सामाजिक प्रगती ही होत असल्याचे प्राध्यापक महादेव गावंडे यांनी सांगितले संस्थेमार्फत वेगवेगळ्या समाजाभिमुख योजना सुद्धा राबविल्या जातात त्यामध्ये होम बँकिंग सुविधा देणारी एकमेव पतसंस्था ही पुसद मध्ये ठरल्या गेली आहे तसेच नागरिकांसाठी लॉकरची सुद्धा सुविधा उपलब्ध आहे राज्यात व देशात कुठेही सहज रित्या पैसा पाठविता येतो डीडी सुविधा सुद्धा उपलब्ध आहे अशा अनेक प्रकारच्या समाजातील योजना संस्थेकडून रावीला जात आहे त्यामुळे अल्प कालावधीत संस्थेने सर्वत्र नावलौकिक प्राप्त केले आहे.

# औषधी निरीक्षकांच्या रिक्त पदांची तात्काळ भरती करावी : ग्राहक पंचायतीची मागणी

## "प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधांची विक्री"

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ : यवतमाळ जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासन विभागातील औषधी निरीक्षकांची पदे दीर्घकाळापासून रिक्त असून, त्यामुळे विभागाचा कारभार पूर्णपणे ठप्प झाला आहे. औषध विक्रीवर नियंत्रण आणि गुणवत्तेच्या तपासणीसाठी आवश्यक असलेले अधिकारीच अनुपस्थित असल्याने औषधविक्रीचे नियम धाब्यावर बसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. या गंभीर प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायत, यवतमाळ जिल्हा शाखेच्यावतीने निवेदन सादर करण्यात आले.

ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष अनंत भिसे आणि विदर्भ प्रांत कार्यकारिणी सदस्य हितेश सेठ यांनी शासनाकडे पाठवलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जिल्ह्यातील अनेक मेडिकल दुकानांमधून डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधे विकली जात आहेत. तसेच बिल न देता औषधांची विक्रीही सुरू असून, यावर कोणतेही नियंत्रण राहिलेले नाही.

सध्या जिल्ह्यात औषधी निरीक्षकांची सर्व पदे रिक्त आहेत, तर सहायक आयुक्त हे एकाच वेळी अमरावती जिल्ह्याचा कारभारही सांभाळत असल्याने कार्यक्षमता कमी झाली आहे. अधिकृत अधिकारी व कर्मचारी नसल्याने बाजारात उपलब्ध औषधांची गुणवत्ता तपासली जात नाही, यामुळे ग्राहकांच्या आरोग्याशी थेट धोका निर्माण होण्याची शक्यता आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ग्राहक पंचायतीने ही बाब गांभीर्याने घेऊन अन्न व औषध प्रशासन विभागाने यवतमाळ जिल्ह्यातील रिक्त पदे तातडीने भरावीत, अशी ठाम मागणी केली आहे. या निवेदनावर प्रांत कोषाध्यक्ष संतोष डोमाळे, विरेंद्र चौबे, जिल्हा सचिव डॉ. केशव चेटूले, उपाध्यक्ष डॉ. कैलास वर्मा, प्रा. मतीन खान, ॲड. अनुपमा दाते, शोभा इंगोले, प्रा. राजेंद्र ठाकूर, प्रा. पी.एन. देशमुख, सहसचिव जिनेंद्र बंगाले, शहर अध्यक्ष ॲड. राजेश पोहरे, सचिव शेखर बंड, प्रविण पाटील, डॉ. नेहा पंडित, चंद्रकांत गड्डमवार, प्रकाश चणेवार, श्रीकांत भट, उमेश पखाले आदी पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# पुसद शहर डी. बी. पथकाची प्रशंसनीय कामगीरी घातक अग्णी शस्त्र देशी कट्टा (पिस्टल) बाळगणारा ईसमास केले जेरबंद

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद : शहरात वाढलेल्या गुन्हेगारी प्रवृतीचे ईसमावर आळा बसावा या करीता ठाणेदार सेवानंद वानखडे यांनी प्रभावी गस्त (पेट्रोलींग) वाढवुन कारवाई करन्याचे आदेश पोलीस स्टेशनचे डी. बी. पथकास दिले त्याच सुचणे प्रमाणे दि.27/10/2025 रोजी पुसद शहर डी. बी. पथक शहरात पेट्रोलींग करीत असताना डी. बी. पथकास गोपनिय बातमीदार यांचे कडुन खात्रीलायक खबर मिळाली की, एक ईसम देशी पिस्टल (देशी कट्टा) सोबत बाळगुन असुन त्याचे ईनोव्हा गाडी क्र.MH-12-EM-0977 ने पुसद शहरात येत आहे.

असे गोपनिय माहीती वरुण घटनेचे गांभीर्य ओळखुन डी.बी.स्टॉप.पथकांनी अतिशय कौशल्यपुर्वक सापळा रचुन ईनोव्हा चारचाकी वाहन क्र.MH-12-EM-0977 यास आंबेडकर चौक पुसद येथे थांबवुन चालक आरोपी दिनेश देविदास खोडे वय 38 वर्षे रा. मांजर्डा ता. जि. यवतमाळ यांची कायदेशीररीत्या अंगझडती घेतली असता त्यांचे कमरेला पॅन्ट मध्ये खोसुन एक गावठी बनावटीची पिस्टल (देशी कट्टा) मॅगझीनसह किमंत रुपये 30,000/-रुपये व टोयोटा ईनोव्हा कंपनीची चारचाकी कारवाहन क्र.MH-12-EM-0977 किमंत 5,00000/रुपये असा एकुण 5,30,000/ रुपये चा मुद्देमाल मिळुन आल्याने त्यास घातक अग्नीशखासह अटक करुण त्याचेवर पोलीस स्टेशन पुसद शहर येथे कलम 3,25 शस्त्र अधिनियम 1959 प्रमाणे गुन्हा नोंद करुण पुढील तपास डी.बी.स्टॉप करीत आहेत. सदरची कारवाई - पोलीस अधिक्षक, श्री, कुमार चिंता, अप्पर पोलीस अधिक्षक, अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी पुसद हर्षवर्धन बि.जे. यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार सेवानंद वानखडे यांचे सुचणे प्रमाणे डी.बी.प्रमुख सपोनि प्रेमकुमार केदार, पोउपनि प्रमोद काळे, पोउपनि संतोष खांडेकर, पो.हवा. प्रफुल इंगोले, पो. हवा. मनोज कदम, पो.काँ. शुध्दोधन भगत, पो.कॉ. सचिन राउत, पो. कॉ. भोला कानडे यांनी पार पाडली आहे.

# मानवी जीवनाचा सदुपयोग करून घ्या : विलास साबळे महाराज

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - मानवी जीवन क्षणभंगुर आहे, जायची वेळ कधी आहे सांगता येत नाही,सोबत काही घेऊन जाता येत नाही त्यामूळे अधर्माने पैसा कमावू नका, सद्विवेकाने, सत्कर्माने व किर्तिने अजरामर होता येते त्यामूळे जीवनात वेळेचा सदुपयोग करून समदृष्टी ठेऊन सर्वांशी प्रेमाने वागा जश्या कुसुमताई प्रेरणादायी जिवन जगल्या व सर्वांच्या हृदयात विराजमान झाल्यात असे प्रतिपादन रामकृष्णहरी मंदीर दास टेकडी गुरुकुंज मोझरीचे अध्यक्ष राष्ट्रीय कीर्तनकार विलास साबळे महाराज यांनी केले.

जिल्हा सेवाधिकारी गणेश धर्माळे व ग्रामगीताचार्य मुक्ता काळबांडे यांनी आयोजित केलेल्या त्यांच्या मातोश्री स्व.गं.भा. कुसुमताई धर्माळे यांच्या अकरामासानिमित्त कुसूम कुंज स्थित कार्यक्रमात साबळे महाराजांच्या हस्ते प्रथम राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व कुसुमताई धर्माळे यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. किर्तनापुर्वी उत्कृष्ट गायक गजानन महाराज कवाने यांनी ये ना आई हे भावपूर्ण गीत गायन करताच सर्वांच्या डोळ्यातून अश्रू ओघळले. यावेळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या नर देहाची सुंदर वेळा साधून घे लवलाही मनुजा सुख कर हरी गुण गाई हया भजनाचे निरूपण करतांना ते पुढे म्हणाले की सर्व संत व ग्रंथांनी सांगितले की जिवन अनमोल आहे कमी वेळात जास्त सत्कार्य करावे, गुरुपेक्षा माता श्रेष्ठ आहे त्यांनी गर्भापासुन समजूतदारपणा येईपर्यंत मुलास घडविणे त्याच्या संगतीकडे लक्ष ठेऊन उत्तम संस्कार द्यावे, कुसुमताई यांनी जात,धर्म,पंथाच्या भिंती तोडून सर्वांशी आपुलकी, जिव्हाळा निर्माण करुन ऋणानुबंध जोडले कारण त्यांनी राष्ट्रसंतांची भजने व गाडगे बाबांची कीर्तने बालपणी ऐकली त्यांना संत सहवास लाभला व संत उपदेशनुसार जिवन जगल्या तेच संस्कार कुटुंबात पहायला मिळतात, यावेळी त्यांनी अनेक कर्तृत्ववान,भक्तिमती मातांनी सुसंस्कारातून पूत्र घडविले यांची तसेच अनेक संत, महापुरुष,देशभक्त व महामानवांची उदाहरणे देऊन सुश्राव्य किर्तन केले. कीर्तनात साथसंगत ज्ञानेश्वर ताकतोडे, अशोक भगत महाराज, भोला,अनिल अस्वार,श्यामराव देशमाने,कैलास मस्के, कस्तूरी व भुमिका धर्माळे,शर्वरी व देवश्री काळबांडे बाबासाहेब वाघमारे, दशरथ सोनटक्के ,यशवंत भगत,पुंडलीक भालेराव यांनी केली. यावेळी दास टेकडी गुरुकुंज मोझरीचे सदस्य उत्तमराव केने,शंतनु महाराज धर्माळे, ज्ञानेश्वर महाराज इंगोले, नंदकुमार महाराज मुडानकर, संतोष महाराज तालन, शिवशंकर महाराज नागरे, ग्रामगीताचार्य नारायण कवटकर, वैजनाथ खंदारे, मोहन नागपूरकर, प्रा.डॉ.शरद ठाकरे, नरेश ढाले, स्वामी डाकरे, खुशाल धर्माळे,पंजाब गडदे, यशवंत देशमुख,ग्यानबा खंदारे, नाना इंगळे, शंकर संघई, जगन्नाथ घाटगे, भगवान चव्हान, साहेबराव जाधव, प्रवीण धर्माळे, शंकरराव देशमुख,विठ्ठल निस्ताने, सारंग अडसड,पोलिस पाटील पंडीत अडतकर, दिगांबर डोके सह सावित्रीबाई फुले महिला भजन मंडळ,श्री .गुरुदेव पुरूष भजनी मंडळ कोपरा व असंख्य स्त्री पुरूष बाल गोपाल मोठया संख्येने उपस्थित होते. समन्वयाचारी संत नरहरी महाराज यांचे बंधू धर्मा महाराज,जयगुरू शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुभाष कोसलगे, सेवानिवृत्त ठाणेदार अरूण बायस्कर, वृध्द कलाकार समिती माजी पदाधिकारी मनोहर बनस्कर, प्रा.जनार्दन विटोले यांच्या हस्ते ह.भ.प. विलास साबळे महाराज यांचा प्रा.नंदकुमार खैरे लिखित राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व्यक्तिमत्त्वाचे काही वैशिष्टपूर्ण पैलू पुस्तक शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. ग्रामगीताचार्य स्मिता धर्माळे यांनी उपस्थितांचे आभार मानले राष्ट्रवंदना व भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# काँग्रेसकडून पांढरकवडा नगरपरिषद, जिल्हापरिषद, पचायत समीतीसाठी इच्छुकांकडून अर्ज मागविले

## ३० नोव्हेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा : आगामी होऊ घातलेल्या पांढरकवडा नगरपरिषद,जिल्हापरिषद,पचायत समीती निवडणूकी संदर्भात विश्रामगृह पांढरकवडा येथे दि.२५ ऑक्टोबर शनिवार रोजी तालुका काँग्रेस कमिटीचे तालुका अध्यक्ष प्रेमदास राठोड यांच्या अध्यक्षतेखालील आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.त्यावेळेस माजी तालुका अध्यक्ष अमर पाटील, शहर अध्यक्ष मनोज भोयर, इक्राम अली, अनिस पोसवाल, ठाकरे सर, श्रीनिवास रेकुलवार, शेहबाज खान, काझी सर, कीसनराव राठोड बलवंत नैताम सह आदी काँग्रेस कमिटीचे पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते उपस्थित होते. पांढरकवडा नगरपरिषद, जिल्हापरिषद, पचायत समीती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने तयारीला सुरुवात केली आहे. पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांसाठी ३० नोव्हेंबरपर्यंत महाराष्ट्र काँग्रेस कमिटीकडे अर्ज जिल्हा काँग्रेस कमिटीच्या माध्यमातून घेऊन जावे असे आवाहन तालुका काँग्रेस कमिटी व शहर काँग्रेस कमिटीकडून आवाहन करण्यात आले आहे.अर्ज करणाऱ्या इच्छुकांनी अर्जासोबत आपली संपूर्ण आणि अचूक माहिती देणे अनिवार्य आहे.

काँग्रेस विचारधारेच्या आणि परिवर्तन घडवू इच्छिणाऱ्या नवतरुण-तरुणींनी या निवडणुकीत सक्रिय सहभाग घ्यावा,असे विशेष आवाहन तालुका अध्यक्ष प्रेमदास राठोड यांनी केले आहे.

पक्षनिष्ठ, सामाजिकदृष्ट्या सक्रिय आणि प्रतिष्ठित नागरिकांना काँग्रेसकडून उमेदवारी दिली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# दिवाळी मिलन कार्यक्रमात भाजप कार्यकर्त्यांचा उत्साह

## भाजपा अमरावती शहर जिल्हा अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांच्या नेतृत्वात केलेले आयोजन

**अमरावती/ का.प्र**

भारतीय जनता पार्टी अमरावती शहर जिल्हा तर्फे दिवाळी मिलन कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. हा भव्य कार्यक्रम शहर जिल्हा अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांच्या नेतृत्वात संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथील लॉनवर मोठ्या थाटामाटात पार पडला.

प्रदेश भाजपाच्या सूचनेनुसार जिल्हाभर आयोजित करण्यात आलेल्या या दिवाळी मिलन सोहळ्यात शहर जिल्हा अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, माजी अध्यक्ष प्रवीण पोटे पाटील, प्रदेश सचिव जयंत डेहनकर, प्रवक्ते शिवराय कुलकर्णी, किरण पातुरकर, रवींद्र खांडेकर, सरचिटणीस बादल कुलकर्णी, ललित समदुरकर, चेतन पवार, माजी पक्षनेता सुनील काळे, माजी स्थायी समिती सभापती सचिन रासने, ॲड. प्रशांत देशपांडे, ॲड.





नवलानी आदी मान्यवर उपस्थित होते.

भारत मातेचे पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर भव्य फटाक्यांच्या आतषबाजीने परिसर उजळून निघाला. आपल्या शुभेच्छा पर भाषणात डॉ. धांडे म्हणाले,दिवाळीच्या या मंगल पर्वावर कार्यकर्त्यांमध्ये एकात्मता आणि नवचैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. ही ऊर्जा घेऊन आपण आगामी सर्व कामात अधिक जोमाने सहभागी होऊया.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शहर जिल्हा सरचिटणीस बादल कुलकर्णी यांनी केले. डॉ. धांडे यांनी मे २०२५ मध्ये अध्यक्षपद स्वीकारल्यापासून शहर जिल्ह्यातील संघटन कार्याला नवी दिशा मिळाल्याचे उपस्थितांनी नमूद केले. सांस्कृतिक कार्यक्रमात अमरावती येथील सुप्रसिद्ध आर.के. मेलोडी व बी.के.डी. ग्रुपच्या टीमने रंगतदार ऑर्केस्ट्रा सादर केला. या प्रसंगी अनेक भाजप पदाधिकाऱ्यांनी स्वतः गायन सादर केले, त्यामध्ये जयंत डेहनकर, बादल कुलकर्णी, सचिन रासने, सुधा तिवारी आदींचा सहभाग विशेष उल्लेखनीय ठरला. कार्यक्रमाचे संचालन कल्याणी मुदलियार यांनी केले. युवा मोर्चा अध्यक्ष विक्की शर्मा व त्यांच्या टीमने डॉ. धांडे यांना छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती भेट देऊन स्वागत केले. महिला मोर्चा तर्फेही भव्य स्वागत करण्यात आले. संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनचे संपूर्ण लॉन कमळमय सजावट, कमळरांगोळी, बॅनर, कटआउट्स व 'भारत माता की जय', 'जय श्रीराम' या घोषणांनी दुमदुमून गेले. या कार्यक्रमाला संघ परिवाराचे मान्यवर, विविध घटकांतील नामवंत व्यक्ती, भाजपचे आजी-माजी पदाधिकारी, नगरसेवक-नगरसेविका, शक्ती केंद्रप्रमुख, बूथ प्रमुख तसेच मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# ट्रस्टच्या माध्यमातून घडणारे सामाजिक कार्य कौतुकास्पद -न्या.खोचे

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

धर्मदाय आयुक्त कार्यालय यांच्या अंतर्गत नोंदणी झालेल्या सामाजिक संस्था ट्रस्ट यांच्या माध्यमातून गरीब गरजू लोकांना जीवनावश्यक वस्तू चे वाटप करण्यात आले आहे.आपत्कालीन परिस्थितीत सापडलेल्या लोकांसाठी केलेले कार्य हे कौतुकास्पद असून ते धर्मदाय आयुक्त कार्यालयासाठी अभिमानास्पद आहे, असे मत अमरावती विभागाचे धर्मदाय सहआयुक्त न्यायाधीश दीपक खोचे यांनी कौशल्याबाई जगन्नाथ मालपाणी चारिटेबल ट्रस्ट दर्यापूर च्या वतीने दीपावली निमित्त मेळघाट भागातील अतिदुर्गम भागातील आदिवासी बांधवांकरिता दीपावली निमित्य २०० कुटुंबांना



किराणा वाटप कपडे व जीवनावश्यक वस्तू वाटप प्रसंगी पितंब तालुका धारणी येथे आयोजित कार्यक्रमाचे विशेष उपस्थिती म्हणून व्यक्त केले

याबाबत सविस्तर असे की कौशल्याबाई जगन्नाथ मालपाणी चारिटेबल ट्रस्ट दर्यापूर यांच्या वतीने दरवर्षी गरीब व गरजू लोकांकरिता दिवाळीनिमित्त किराणा तसेच जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले जाते सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या या संस्थेने यावर्षी आदिवासी मदतीचा हात म्हणून मेळघाटातील अतिदुर्गम भागातील २०० कुटुंबातील आदिवासी बांधवांना किराणा साहित्य कपडे व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले तितंबा तालुका धारणी येथे आयोजित या कार्यक्रमा ची सुरुवात आदिवासी बांधव यांनी आपल्या परंपारिक नृत्याने प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले त्यानंतर द्वीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाला विशेष उपस्थिती म्हणून जिल्हा न्यायाधीश तथा धर्मदाय सह आयुक्त अमरावती विभाग श्री दीपक खोचे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ट्रस्टचे अध्यक्ष श्री रामेश्वर मालपाणी, प्रमुख उपस्थिती म्हणून सभापती खरात, श्री मावस्कर सहाय्यक प्रकल्प अधिकारी धारणी, एडवोकेट सदानंद जाधव कोषाध्यक्ष सार्वजनिक न्यास वकील संघ अमरावती,डॉक्टर काळे, आनंद शेठ चौरसिया, माजी सभापती मधुकर पाचे, आकाश देवस्थर, मुख्याध्यापक भागवत आदी मान्यवर उपस्थित होते.

# अक्षय नवमीला, संकटमोचन हनुमान मंदिरात छपन्नभोग महाप्रसाद

**अमरावती/ का.प्र.**

दरवर्षी प्रमाणे या वर्षी ही अमरावतीच्या दसरा मैदानावरील बडनेरा रोडवरील संकटमोचन विजय हनुमान मंदिरात शुक्रवार, ३१ऑक्टोबर रोजी, सकाळी ७:३० ते ११:३० या वेळेत आवळा नवमीच्या शुभ मुहूर्तावर छपन्न भोग नैवेद्य समारंभ आयोजित केला आहे. हा कार्यक्रम १९८५ मध्ये श्री. संत शिरोमणी बाबा नरसिंहदासजी यांनी सुरू केला होता. बाबांचे आशीर्वादित शिष्य श्री महंत मदन मोहनदासजी यांनी ही परंपरा चालू ठेवली आहे. याशिवाय, मंदिरात हनुमान जयंती, महाशिवरात्री, गोकुळ अष्टमी, श्री राम महायज्ञ, कोजाजिरी पौर्णिमा आणि गुरु पौर्णिमा असे अनेक कार्यक्रम मोठ्या उत्साहात आयोजित केले



जातात. अमरावतीतील श्रद्धाळू भक्तांना आठवण करून दिली जाते की बाबाजींनी स्थापन केलेले अखंड रामायण आता ४४ व्या वर्षात आहे.

अक्षया नवमीचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंदिर सदस्य दीपक नवाथे, अरुण वरणगावकर, शरद सोनकुसरे, महेंद्र गांधी, गजानन पाठक, गजू वानखडे, दिलीप पैठणकर, डॉ.काळबांडे, सुनील डुब्बलवार, श्रीधर बोपुलका, किशोर दोडे, पवण कुळकर्णी, किशोर देवळे, आदींनी परिश्रम घेतले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गणेश तिडके, आशुतोष इंगळे, अनिकेत गाडवे, सचिन शेठ भारुका, प्रेम जोड, सूर्या इंगोले, आदित्य लोखंडे, दुर्गेश वळंदे, मंगेश मिटकरी, आदी अथक परिश्रम घेत आहेत.

## क्रांती ज्योती बिग्रेड संघटनेचा दीपावली स्नेहमिलन सोहळा



**अमरावती/ का.प्र.**

समाजाचे सर्वांगीन हित साधून त्यांना राजकीय क्षेत्रात संधी उपलब्ध करून देण्यासाठी युवा स्वाभिमान पक्षात मी राष्ट्रीय उपाध्यक्ष या पदावर प्रवेश घेतला असल्याचे प्रतिपादन क्रांती ज्योती बिग्रेड संघटनेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. नंदेश अंबाडकर यांनी सत्कारा प्रसंगी केले. क्रांती ज्योती बिग्रेड संघटना महानगर शाखेच्या वतीने आयोजित दीपावली स्नेह मिलन सोहळ्यात वायएसपी मध्ये राष्ट्रीय उपाध्यक्ष पदावर ॲड.नंदेश अंबाडकर यांची नियुक्ती

संस्थापक अध्यक्ष आमदार रवि राणा आणि राष्ट्रीय अध्यक्ष नीलकंठ कात्रे यांनी नुकतीच केली आहे. या निमित्त संघटनेच्या वतीने ॲड. नंदेश अंबाडकर यांचा शाल व पुष्पगुष्य देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी,संघटनेचे महानगर अध्यक्ष प्रवीण मेहरे, प्रदेश समनव्यक ओमप्रकाश अंबाडकर, प्रदेश उपाध्यक्ष समाज भूषण देवानंद गणोरकर, प्रदेश संघटक रत्नाकर चरडे, प्रा. सुरेश यावले, कृषक आघाडीचे जिल्हाध्यक्ष ॲड.प्रभाकर वानखडे, महिला आघाडी विदर्भ अध्यक्षा किरण मेहरे, वनिता फरकाडे, अनिता चरडे, शुभांगी टाकरखेडे आदी उपस्थित होते. बैठकीत संघटनेच्या वतीने २२ फेब्रुवारी २६ रोजी पुनरविवाहित युवक युवती परिचय मेळावा घेण्याचे सर्वानुमते ठरले. कला महोत्सव जानेवारी मध्ये होईल.

# जिवंत विद्युत तारेच्या धक्क्याने बालक जखमी!

## महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळावर तीव्र रोष

**मोर्शी/ वार्ताहर**

दिवाळी सणाचे औचित्य साधून घरावर टाकलेली सिरीज लाइटिंग काढण्याकरिता घराच्या स्लॅपवर चढलेल्या बालकाला घरावरून गेलेल्या ३३ के.व्ही.च्या उच्चदाब वीजवाहिनीच्या तारांमधून स्पार्किंग होऊन त्याला जोरदार विजेचा धक्का बसल्यामुळे तो गंभीर जखमी झाल्याची घटना घडली.

आयुष नरेंद्र रामटेके (१३) रा.समर्थ कॉलनी मोर्शी असे जखमी झालेल्या बालकाचे नाव आहे.समर्थ कॉलनी येथे खरेदी विक्री संघाचे संचालक नरेंद्र रामटेके यांचे घर असून त्यांच्या घरावर दिवाळी सणाच्या निमित्ताने टाकलेली सिरीज लायटिंग काढण्यासाठी नरेंद्र रामटेके यांचा मुलगा आयुष हा घरावरील स्लॅपवर गेला होता.त्यांच्या घराच्या वरून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीची ३३ के.व्ही.हिवरखेड येथे जाणारी अतिउच्च दाबाची विद्युत तारा असून या तारांमधून अचानक स्पार्किंग होऊन त्याला जोरदारविजेचा धक्का बसल्यामुळे आयुषचा चेहरा,दोन्ही हात,पोट भाजल्या गेले.

स्पार्किंग झाल्याचो आढळताच कुटुंबातील व्यक्तींनी व परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेऊन गंभीर अवस्थेत आयुषला मोर्शी येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आयुषचि गंभीर परिस्थिती पाहता त्याला पुढील उपचारासाठी अमरावती येथे नेण्याचा सल्ला देण्यात आला असून सध्या आयुषचा उपचार



रिम्स हॉस्पिटल अमरावती येथे सुरू आहे.यावेळी समर्थ कॉलनी येथील संतप्त नागरिकांनी या घडलेल्या घटनेला विद्युत महामंडळ जबाबदार असल्याचा आरोप केला असून भविष्यात अशा प्रकारची दुर्घटना घडू नये यासाठी त्वरित ३३ के.व्ही.हिवरखेड येथे जाणाऱ्या अतिउच्च दाबाच्या विद्युत तारा प्लॉटचे बाहेर काढण्यात याव्या.अन्यथा सदर प्रकारची दुर्घटना घडल्यास विद्युत महामंडळावर सदोष मनुष्यहाणीचा गुन्हा दाखल करण्यात यावा. असे निवेदन कार्यकारी अभियंता यांना समर्थ कॉलनी परिसरातील नागरिकांनी दिले.

सदर निवेदनाची प्रत मुख्य कार्यकारी अभियंता,वीज महावितरण मंडळ, अमरावती,पोलीस निरीक्षक मोर्शी आणि कनिष्ठ अभियंता, म.रा.वि.वि.कं.मोर्शी यांना देण्यात आली आहे.अपघातग्रस्त बालकाला तातडीने शासनस्तरावरून आर्थिक मदत व मोफत वैद्यकीय उपचार मिळावा अशी मागणी करण्यात आली आहे. चौकट:- यापूर्वी सुद्धा जवाहर कॉलनी येथील एका बालकाला हिवरखेड येथे जाणाऱ्या ३३ केव्ही विद्युत तारेचा स्पर्श होऊन तो सुद्धा जखमी झाला होता सुदैवाने मात्र त्याचे प्राण वाचले.

# मुर्ती व धार्मिक फोटो मनपाकडे सुपूर्त



**अमरावती/ का.प्र**

महानगरपालिकेतर्फे शहरातील स्वच्छता, पर्यावरण संवर्धन व धार्मिक भावनांचा सन्मान राखण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या जनजागृती मोहिमेला शहरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

हा उपक्रम अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे राबविण्यात आला. या प्रसंगी मनपा अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर, सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी नर्मदा चव्हाण, ज्येष्ठ स्वच्छता निरीक्षक विजय बुरे, दिनेश देशमुख तसेच राजापेठ झोनचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. एम. एच.-२७ एटिएस ग्रुपतर्फे प्रमोद पांडे, अंजली प्रमोद पांडे, छाया कडु, प्रा. प्रविण गुल्हाने, संध्या अवसरे, मोनाली आगाशे, संगिता गजभिये, प्रा. समीर चौधरी, मिलिंद सराफ, किशोर कडु यांच्यासह अनेक नागरिकांनी सक्रिय सहभाग घेतला. पडलेल्या मूर्ती व धार्मिक फोटो संकलित करून त्यांची पर्यावरणपूरक पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी ग्रुपतर्फे मनपाला सहकार्य करण्यात आले.

# आठवड्याभरात सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करा

## अन्यथा तीव्र आंदोलन, तालुका काँग्रेस कमिटीचा सरकारला इशारा

**तिवसा/ वार्ताहर**

यंदाच्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकाला जबर फटका बसला आहे.सोयाबीनसारखे पीक मातीमोल झाले आहे, त्यामुळे जे काही हाती आलेले सोयाबीन पीक आहे,निदान त्याची तरी शासनाने खरेदी करावी,यासाठी एका आठवड्यात सोयाबीनचे शासकीय खरेदी केंद्र सुरू करावे अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा ईशारा तिवसा तालुका काँग्रेस कमिटी व शेतकऱ्यांनी तिवसा तहसीलदार यांना एका निवेदनातुन दिला आहे. तिवसा तालुक्यातील सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकरी हवालदिल झालेला असून, सततच्या पावसामुळे अतिवृष्टी सदृश्य पर्जन्यमानामुळे सोयाबीनचे पीक



त्याच्या हातून गेले. अनेक शेतकऱ्यांना सोयाबीन सोंगावे सुद्धा लागले नाही. दिवाळी सण आटोपून एक आठवडा झाला असूनसुद्धा शासनाकडून कुठलीही मदत तालुक्यातील शेतकऱ्यांना झाली नसून सोयाबीन उत्पादक शेतकरी आर्थिक विवंचनेत आहे.

रब्बी हंगामासाठी शेतीचे नियोजन करावयाचे असून,जे काही पदरी पडलेले सोयाबीन आहे त्याला समाधानकारक भाव मिळत नसल्याने, व व्यापारी वर्ग शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक करत असून, शासनाने हमीभाव जाहीर केला त्याप्रमाणे सोयाबीन हमीभावाच्या तुलनेत अत्यल्प भावाने अडचणीचा फायदा घेऊन शेतकऱ्यांना त्याचे सोयाबीन नाइलाजाने विकावे लागत आहे.शासकीय (नाफेड) सोयाबीन खरेदी केंद्र तिवसा येथे एका आठवड्यात सुरू करण्यात यावे अशी मागणी निवेदनाद्वारे तिवसा तालुका काँग्रेस व शेतकऱ्यांनी तहसीलदार तिवसा यांना केली. यामुळे शेतकऱ्यांना हमीभावाप्रमाणे रास्त भाव मिळाल्यास त्याला या शासकीय खरेदी केंद्राचा आधार होईल.एका आठवड्यात शासकीय खरेदी केंद्र सुरू न झाल्यास तालुका काँग्रेस कमिटी व शेतकरी प्रशासनाच्या व सरकारच्या विरोधात आंदोलन करणार असल्याचा इशारा यावेळी देण्यात आला.यावेळी तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष वैभव वानखडे, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष सुरेश मेटकर, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती रवी राऊत, मोहनराव वानखडे, विवेक देशमुख, शहराध्यक्ष सेतू देशमुख, कार्याध्यक्ष सुनील बाखडे, गजानन अळसपुरे, रवींद्र हांडे, लुकेश केने, सचिन सोटे, नगरसेवक योगेश वानखडे, मंगेश भगोले, प्रदीप दमाये, विश्वजित बाखडे, प्रमोद वानखडे, गजानन भोंबे, प्रशांत कांबळे, संदीप आमले, नरेंद्र विघ्ने, हरिदास भगत, आशिष बायस्कर, भारत ढोणे, सुधीर बोके, राजू वेरूळकर, छत्रपती डोंगरे, सुरज धूमनखेडे, प्रणव गौरखेडे, अतुल खुळे, अमोल पन्नासे, सागर राऊत, अनिकेत तालन,अक्षय पवार, संजय इंगळे, वैभव ढवळे,दीपक वानखडे, सुनिल कुऱ्हाडे, रणजित सपाटे, अमोल बंगरे शेहजाद पटेल, मोतीभाऊ पवार, अरुण मोहोड, जानराव मारोटकर,अनंत शेंद्रे आदी पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

# नागरिकांचे जीवनमान उंचविण्यासाठी विकासकार्य अबाधित राखू- आ.सुलभा खोडके

**अमरावती/ का.प्र.**

शहरात पायाभूत सुविधांची पूर्तता करत असतांना स्थानिक नागरिकांचे जीवनमान उंचाविण्यासाठी स्थानिक भागात सौंदर्यीकरण, अखंडित वीज पुरवठा, मुबलक पाणी पुरवठ्याची सोय तसेच सार्वजनिक खुल्या जागांना चेनलिंग फेन्सिंग करून चांगल्या सुविधा निर्माण करण्यावर आपला सातत्यपूर्ण भर आहे. कठोरा रोड स्थित पुष्कर कॉलनी येथील खुल्या जागेला एक आकर्षक व देखणे स्वरूप प्राप्त होत असतांना विकास हा दीर्घकाळ पर्यंत टिकला पाहिजे, म्हणून आपण सर्वांनी त्याचे संगोपन व संवर्धनाची जबाबदारी स्वीकारावी ,असे आवाहन आ.सुलभा खोडके यांनी केले.

पुष्कर पार्कच्या चेनलिंक कुंपन व पेव्हींग ब्लॉक वॉकीग ट्रॅक च्या लोकार्पन सोहळया प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



आदर्श प्राथमिक शाळेच्या सचिव सौ.सुनंदाताई होशंगाबादकर होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते यश खोडके, माजी नगरसेवक प्रशांत डवरे, गुड्डू धर्माळे, रत्नदीप बागडे आदी उपस्थित होते. यावेळी आमदार महोदयांनी विकास कामांच्या फलकाचे अनावरण करून तसेच फीत कापून लोकार्पणाची औपचारिकता साधली. स्थानिक भागातील नागरिकांचा सर्वांगीण विकास व्हावा, म्हणून त्यांच्या जीवनात क्रीडांगण व उद्यान यांचे महत्व महत्वाचे आहे. आमदार महोदयांच्या माध्यमातून याची पूर्तता झाल्याबद्दल पुष्कर कॉलनी परिसरवासीयांच्या वतीने आ. खोडके व श्री यश खोडके यांचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रफुल्लकुमार वाठ तर संचालन सौ. सुषमा इंगोले यांनी केले. सरतेशेवटी आभार प्रदर्शन विजय विंचुरकर यांनी केले. सदर कार्यक्रमाला भूषण लाखानी ,सौ. प्रातिमा लखानी ,सुरेंद्र देशमुख,प्रफुल्ल वाठ ,प्रकाश इंगोले, पियुष काळबांडे,आशिष काळबांडे, राजेश हुशंगाबादकर, मोहन काळबांडे, अनिल साखरकर, राजेश मुधोळकर सारंग पांडे बरवट साहेब, नरेश मंडलिक, गोपाल जानोरकर, विनय कोठाळे,उमंग पांडे,गिरीश कोठाळे आदींसह पुषक कॉलनी येथील नागरिक तसेच महिला भगिनी प्रामुख्याने उपस्थित होते.



# माहिती तंत्रज्ञान उजळवतेय शिक्षणक्षेत्र

**इतर क्षेत्रांप्रमाणेच शिक्षणक्षेत्रातही माहिती तंत्रज्ञानाचा वापर वाढला असून एक प्रकारची क्रांती अनुभवायला मिळत आहे. तांत्रिक विषयांसह इतरही सर्वच विद्याशाखांच्या अभ्यासकांना माहिती तंत्रज्ञानाने विविध प्रकारे सहाय्य केले आहे. खेरीज इलेक्ट्रॉनिक संवादमाध्यमे वापरून शाळा-कॉलेजांमध्ये दिल्या जाणाऱ्या पारंपरिक शिक्षणातही बदल घडले असून दूरशिक्षणासारखे मार्ग आता प्रत्येकाच्या आवाक्यात आले आहेत.**

**न**व्या युगात शिक्षणक्षेत्रामध्ये नवतंत्रज्ञानाचे महत्त्व वाढले आहे. महत्त्वाचे म्हणजे हा बदल ग्रामीण भागातही पाहायला मिळत असून माहिती तंत्रज्ञानाने शिक्षणाच्या क्षेत्रात घडवून आणलेली क्रांती आपण सर्वजण पाहत आहोत. तांत्रिक विषयांसह इतरही सर्वच विद्याशाखांच्या अभ्यासकांना माहिती तंत्रज्ञानाने विविध प्रकारे सहाय्य केले आहे. खेरीज इलेक्ट्रॉनिक संवाद माध्यमे वापरून शाळा-कॉलेजांमध्ये दिल्या जाणाऱ्या पारंपरिक शिक्षणातही बदल घडले असून दूरशिक्षणासारखे मार्ग आता प्रत्येकाच्या आवाक्यात आले आहेत. ताज्या निष्कर्षानुसार सर्वाधिक तरुण लोकसंख्या असणाऱ्या देशांमध्ये भारताचा क्रमांक खूपच वरचा आहे. अर्थातच देश प्रगतिपथावर ठेवण्यासाठी आणि वैयक्तिक जीवनमान उंचावण्यासाठी तरुणाईला योग्य शिक्षण-प्रशिक्षण देण्याची मोठी गरज आहे. तरुणाईला विकास हवा आसल्याचे त्यांनी विविध मार्गाने स्पष्ट केले आहे.

आजच्या शाळकरी तसेच कॉलेजवयीन विद्यार्थ्यांची शिक्षण घेण्याची तीव्र इच्छा आहे; परंतु आतापर्यंतच्या धोरणांमुळे म्हणा वा अन्य कारणांनी म्हणा, त्यांना पुरेशी संसाधने पुरवण्यात यंत्रणा नेहमीच कमी पडली आहे. बरे रस्ते, अन्नपाणी, कपडे, वह्या-पुस्तके, घरातील परिस्थिती आणि आसपासचे वातावरण आदी सामाजिक-आर्थिक बाबींमध्ये अपूर्णत्व असूनही छोटी मुले-मुलीदेखील चार-चार मैल चालून शाळेत जाताना आपण पाहतो आणि हळहळतो, कारण सर्व संसाधने पुरवणे कधी कधी प्रशासनालाही अवघड असते. दुसरीकडे, बहुसंख्य विद्यार्थी इंग्रजी माध्यमाच्या आणि खासगी शाळांमध्ये जातात, असा अनेकांचा समज असतो. काही अंशी हे खरे आहे. पण हे चित्र शहरी आणि तुलनेने संपन्न ग्रामीण भागात बघायला मिळते, हे विसरून चालणार नाही. आजही सर्वाधिक विद्यार्थी सरकारी शाळांमध्ये शिकतात आणि इतक्या व्यापक प्रमाणावर अशा प्रकारे शिक्षण पुरवणारी भारतातील सरकारी यंत्रणा जगात सर्वात मोठी आहे. मात्र इतक्या विस्तृत आणि सुस्थापित शैक्षणिक जाळ्यांचा वापर दर्जेदार शिक्षण देण्यासाठी केला जात नाही हे आपल्या यंत्रणेचे अपयश म्हणजे देशाचे दुर्दैव म्हणावे लागेल.

या पार्श्वभूमीवर इंटरनेटने कशी क्रांती घडवली आहे, ते पाहणे गरजेचे ठरते. ग्रामीण आणि दुर्गम भागातल्या विद्यार्थ्याला एखाद्या अभ्यासक्रमाची माहिती हवी असेल तर अगदी अलीकडेपर्यंत तो मिळेल त्या वाहनाने किंवा खरे तर बरेचदा चक्क चालतच तालुक्याचे गाव गाठत असे. तिथे एखादी चांगली शिक्षणसंस्था असेल तर ठीक, नाही तर पुन्हा प्रवास करून तो जिल्ह्याच्या ठिकाणी किंवा शहरात येईल. संबंधित संस्थेचा पत्ता शोधून कार्यालयातून माहिती मिळवण्यात त्याचे दोन-तीन दिवस सहज जात. एवढ्या उद्योगानंतर त्याला योग्य ती माहिती मिळाली असेल तर ठीक, अन्यथा अजून कळले नाही, नोटीस निघालेली नाही, चार दिवसांनी फोन करा किंवा येऊन बोर्डावर पाहा असे उत्तर मिळाले की पुन्हा पुढच्या आठवड्यात हीच यात्रा काढण्याखेरीज पर्याय नसायचा. हा विद्यार्थी एकट्याने प्रवास करण्याइतका मोठा नसेल तर सोबतीला वडील, काका-मामा अशांना जावे लागायचे. म्हणजे दुप्पट खर्च आणि तेवढीच यातायात. इथे मुलींची म्हणजे विद्यार्थिनींची परिस्थिती तर आणखी बिकट व्हायची. मुलींनी शिकायचेच कशाला, मुलीच्या शिक्षणावर खर्च करून आमचा फायदा काय असे प्रश्न आपल्याकडे अजूनही विचारले जात असल्याने तिची पुढची शैक्षणिक वाट तर बहुधा बंदच होऊन जाते. मात्र अशा सरस्वतीच्या लेकीच्या आयुष्यात इंतरनेट महत्त्वाची क्रांती घडवू शकते, हे आता सर्वांना समजले आहे.विषयाचे चांगले आकलन होण्यासाठी किंवा तो अधिक प्रभावीपणे मांडण्यासाठी आपण शिक्षणाचे दोन भाग करू या. शालांत परीक्षेपर्यंतचे आणि त्यानंतरचे, असे हे दोन भाग करता येतील. नंतरच्या शिक्षणामध्ये अधिक पर्याय असल्यामुळे समजून घेऊन त्यानुसार कृती करण्यात आणि विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्याची दिशा ठरवण्यात माहिती तंत्रज्ञान मोठी भूमिका बजावते. शिक्षा अभियानासंबंधी माहिती देणाऱ्या या वेबसाइट्स वापरून एखाद्या राज्यातील एखाद्या तालुक्यामध्ये कोणत्या शाळा, कोणत्या गावात आहेत हे शोधता येते. आयुष्यात एका टप्प्यानंतर विद्यार्थ्यांना शिक्षण सोडावे लागते ते त्यासाठी येणाऱ्या खर्चामुळे. सध्या उच्चशिक्षण, तर भयंकर महाग होत चालले आहे. अशा वेळी पात्र आणि हुशार विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्त्या अर्थात स्कॉलरशिप्स पुरवणाऱ्या असंख्य व्यक्ती आणि संस्था आहेत. इंटरनेटच्या कृपेने झाडून अशा साऱ्या शिष्यवृत्त्यांची माहिती काही क्लिक्समध्ये झटपट मिळू शकते. यासाठी स्कॉलरशिप्स किंवा फ्रीशिप्स असा सर्च द्यावा. अर्थात हे काम करण्यासाठी आपण 'शिक्षा'च्या वेबसाइटचाच वापर केला पाहिजे असे नाही; हा शोध सर्च इंजिन उघडून स्वतंत्रपणेही घेता येतो. शिक्षणक्षेत्रात आयटीचा इतक्या खोलवर शिरकाव झाल्याने विद्यार्थ्यांना करावी लागणारी अनुत्पादक पायपीट आणि खर्चात मोठी बचत झाली असून अधिक नेमकपणाने संस्थांची निवड करणे आता शक्य झाले आहे. अशा उपक्रमांमध्ये प्रौढ शिक्षण, कामगारांसाठीच्या रात्रशाळा तसेच अपंग आणि विकलांग विद्यार्थ्यांनाही नवतंत्राचा खूपच फायदा मिळू शकतो. आजच्या तरुणाईसाठी 'करिअर' हा शब्द अतिशय महत्त्वाचा ठरतो. या शब्दाचे ढोबळमानाने भाषांतर 'उपजीविकेसाठी केलेले काम किंवा व्यवसाय' असे होत असले तरी एखाद्याच्या जीवनशैलीच्या आणि मुख्य म्हणजे जीवनपद्धतीच्या संदर्भात करिअर या शब्दाचे नव्हे, तर संकल्पनेचे वजन निश्चितच जास्त भरते. आपल्या आवडीच्या क्षेत्रात काम केल्याने मिळणारे मानसिक समाधान किती मोलाचे असते हे आणि असे अनेक मुद्दे यावेळी विचारात घेतले जातात. मात्र व्यावहारिक पातळीवर पाहता केलेल्या कामातून मिळणारे उत्पन्न हाच निकष बहुसंख्य प्रकरणांमध्ये पाळलेला आढळतो. याच अर्थाने 'करिअर' या संकल्पनेचा विचार केला आणि जरा मागे वळून पाहिले तर गेल्या शतकात म्हणजे सन २०००च्या थोडे आधीपर्यंत इंजिनीअर होणे ही बहुतेकांची महत्त्वाकांक्षा असे, असे म्हणता येईल; परंतु एकविसाव्या शतकाची सुरुवातच सर्वांचे जीवन व्यापणाऱ्या संगणक आणि संगणकाधारित प्रणालींनी झाली आणि इच्छुकांना करिअर करण्यासाठी सापडलेला नवा पैलू, नवे क्षेत्र म्हणजे कॉम्प्युटर.

कॉम्प्युटर, इंटरनेट, त्यानंतर आलेला स्मार्टफोन आणि या तिघांचे त्रिकूट जमल्यामुळे वर उल्लेख केल्याप्रमाणे महानगरांपासून खेड्यांपर्यंत सर्वांच्याच जीवनात फरक पडला. खासगी, व्यावसायिक आणि औद्योगिक क्षेत्रांबरोबरच गेल्या पाच-दहा वर्षांमध्ये सरकारी विभागही संगणकीय सेवासुविधांवर चालू लागल्याने आणि त्या पुरवूही लागल्याने माहिती तंत्रज्ञान उर्फ 'आयटी सेक्टर' मध्ये प्रचंड मनुष्यबळाची आवश्यकता भासली. इलेक्ट्रॉनिक इंजिनीअर सोडाच, तुलनेने अगदीच प्राथमिक पातळीवरचे संगणकीय अभ्यासक्रम उत्तीर्ण होणाऱ्यांनाही थोड्याफार उमेदवारीनंतर नोकऱ्या सहज मिळत राहिल्या. महत्त्वाचे म्हणजे आयटीमध्ये बहुतेक सर्वांनाच अगदी सुरुवातीपासूनच भरपूर पगार मिळू लागला. पगाराला 'पॅकेज' असे संबोधण्याची लाटही बहुधा आयटीमधूनच उगम पावली. परिणामी, करिअर म्हणजे आयटी असे नवे समीकरण प्रस्थापित झाले. अर्थात या गोष्टीलाही आता पंधरा-वीस वर्षे झाली आहेत. या गेल्या पंधरा-वीस वर्षांमध्ये 'चेंज इज द ओन्ली कॉन्स्टंट थग' म्हणजेच 'बदल हीच सर्वात शाश्वत बाब आहे' या वाक्प्रचाराचा विसर पडू लागला. खरे तर संगणकीय विश्व इतक्या झपाट्याने बदलत आले आहे की, जुने तंत्रज्ञान किंवा पद्धती कालबाह्य होण्याचा वेग ('रोलओव्हर पीरिअड') इथे सर्वाधिक आहे. काही बाबतीत तर अक्षरशः गेल्या महिन्यातल्या प्रणालीची जागा या महिन्यात हाती आलेले नवतंत्रज्ञान घेते आहे. अर्थात इतके क्रांतिकारी बदल अत्युच्च पातळीवरच होत असले तरी कधी ना कधी शेवटच्या स्तरापर्यंत झिरपतात. त्यामुळेच आता संगणक साक्षरता ही कायम सुरू असणारी बाब बनली आहे.

**डॉ. दीपक शिकारपूर**

# जागतिक इंटरनेट दिन

**आ**जचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट आज सर्वांच्या जीवनातील अविभाज्य घटक बनला आहे. इंटरनेट शिवाय कोणी राहू शकत नाही एकवेळ माणूस अन्नापाण्याशिवाय राहील पण इंटरनेटशिवाय नाही इतकी इंटरनेट आज जीवनावश्यक गोष्ट बनली आहे. आपला इंटरनेट पॅक अचानक संपला तर आपली काय अवस्था होते हे तपासून पहा. असे कोणतेच क्षेत्र नाही जिथे इंटरनेटचा वापर होत नाही सर्वच क्षेत्रात इंटरनेटचा वापर केला जातो म्हणूनच इंटरनेट आपल्या जीवनातील अविभाज्य भाग बनला आहे. भारतात १९९५ च्या सुमारास इंटरनेट उपलब्ध झाले मात्र असले तरी त्याच्या कितीतरी आधी अमेरिकेत आणि युरोपात इंटरनेटचा वापर केला जात होता. २९ ऑक्टोबर १९६९ रोजी इंटरनेटवरचा पहिला संदेश पाठवला गेला म्हणूनच २९ ऑक्टोबर हा दिवस जागतिक इंटरनेट दिवस म्हणून मानला जातो . इंटरनेटवर पहिला संदेश पाठवला त्याला आज बरोबर ५६ वर्ष पूर्ण झाली. या ५६ वर्षात इंटरनेटमुळे जगात अनेक क्रांतिकारी बदल झाले मात्र इंटरनेटवर पहिला संदेश कसा पाठवला गेला हे पाहणे खूप मनोरंजक आहे. १९६० चा दशकात अमेरिका आणि रशिया यांच्यात शीतयुद्ध चालू होते अमेरिकन सैन्याला इंटरनेट व्यवस्था सारखी गुप्त व्यवस्था संदेशवहनासाठी हवी होती. अशी यंत्रणा स्थापन करण्यासाठी



अमेरिकन संरक्षण खात्याने एका संशोधन प्रकल्पाला मोठ अर्थसहाय्य देऊन अमेरिकेतील काही विद्यापीठाकडे त्या संशोधनाचे काम सोपवल. या प्रकल्पासाठी एकूण चार संगणक अमेरिकेतील चार विद्यापीठात जोडण्यात आले. त्या चार संगणकातच जगातील पहिले इंटरनेट होत. या चार संगणकांपैकी एक होता कोलिफॉर्निया लॉस एंजेलिस विद्यापीठात, दुसरा होता स्टॅनफोर्ड विद्यापीठात तिसरा होता सांता बार्बरा विद्यापीठात तर चौथा होता उता विद्यापीठात. एका संगणकातून दिला जाणारा संदेश इंटरनेटद्वारे दुसऱ्या संगणकात पोहचतो असे संशोधन या प्रकल्पातील तज्ज्ञांनी केले होते त्याची चाचणी या चार संगणकाद्वारे केली जाणार होती. अर्थात त्याकाळी आजच्या इतके प्रगत तंत्रज्ञान नव्हते. संगणकाचे मॉनिटर तर हिरव्याजर्द अक्षरांनी चमकणारे असत. कॉलिफॉर्नियामध्ये चार्ली क्लीने या संगणकप्रणाली निर्मात्याने एका संगणकावरून दुसऱ्या संगणकाला एकेक्ट्रोनिक संदेश पाठवला. पहिल्या वेळी पाठवलेल्या log in शब्दापैकी lo शब्द पोहचल्यावर सिस्टीम फेल झाली. पुढील अक्षरे पोहचू शकली नाहीत मात्र अर्धवट का होईना संदेश पोहचला ही बाब दूरसंचार आणि तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती घडवणारी ठरली. हा दिवस माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील सुवर्ण दिन ठरला. म्हणूनच २९ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक इंटरनेटदिन म्हणून साजरा केला जातो.

**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे

# काळजी आणि समर्थनः मानवी संवेदनांचा सामाजिक पाया

**२९** ऑक्टोबर हा दिवस संयुक्त राष्ट्रसंघाने 'आंतरराष्ट्रीय काळजी आणि समर्थन दिन' म्हणून जाहीर केला आहे. २०२३ साली प्रथमच या दिवसाची घोषणा करण्यात आली आणि यामागचा उद्देश असा की, 'काळजी' आणि 'समर्थन' या मानवी जीवनातील मूलभूत पण अनेकदा दुर्लक्षित राहणाऱ्या क्षेत्रांना जागतिक स्तरावर ओळख, मान्यता आणि धोरणात्मक प्राधान्य मिळावे. आजचा हा दिवस फक्त एक प्रतीकात्मक उत्सव नाही, तर तो मानवतेच्या अस्तित्वाचा, समाजाच्या एकतेचा आणि मानवी विकासाचा पाया असलेल्या काळजीच्या मूल्यांचा सामाजिक आराखडा आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले, तर काळजी आणि समर्थन ही केवळ वैयक्तिक कृती नसून ती समाजाच्या रचनेतील सर्वात महत्त्वाची सांस्कृतिक, आर्थिक व भावनिक संस्था आहे. समाजशास्त्रात एमिल दुर्खीम यांनी मांडलेले 'सामाजिक ऐक्य' हे संकल्पनात्मक तत्त्व सांगते की प्रत्येक समाज टिकून राहण्यासाठी सदस्यांमधील नैतिक जबाबदारी, सहकार्य आणि परस्पर आदर आवश्यक असतो. काळजी आणि समर्थन ही या सामाजिक ऐक्याचीच व्यावहारिक रूपे आहेत. आपण जेव्हा दुसऱ्याच्या आरोग्याची, दुःखाची, वृद्धापकाळाची, अपंगत्वाची किंवा बालकांच्या संगोपनाची जबाबदारी घेतो, तेव्हा आपण समाजाच्या नैतिक आरोग्याला बळ देतो. दुर्खीमप्रमाणे, समाज हे केवळ कायद्याने किंवा शासनाने चालत नाही; ते चालते ते सामाजिक मूल्यांवर, आणि काळजी ही त्यातील सर्वात महत्त्वाची मूल्यव्यवस्था आहे.

इतिहासात पाहिले तर काळजीची संकल्पना मानवी जीवनात आदिम समाजापासून आहे. एकत्र कुटुंब व्यवस्था, गावसमाजातील परस्पर साहाय्य प्रणाली, धार्मिक दानसंस्था या सर्व काळजीच्या सामाजिक संस्थाच होत्या. परंतु औद्योगिक क्रांतीनंतर आणि आधुनिकतेच्या प्रवाहात, घरगुती क्षेत्रातील काळजीचे काम हळूहळू आर्थिक मूल्यांशिवाय, अदृश्य व अवमूल्यित झाले. विशेषतः स्त्रिया या काळजीच्या कामात गुंतलेल्या राहिल्या, आणि या कामाला 'स्वाभाविक' मानले गेले. समाजशास्त्रीयदृष्ट्या हे 'लिंगाधारित श्रम विभाजन' म्हणून ओळखले जाते. स्त्रीवादी समाजशास्त्रज्ञ आर्ली होच्सचाइल्ड यांनी त्यांच्या 'The Managed Heart' या ग्रंथात 'Emotional Labour' ही संकल्पना मांडली. त्यांनी दाखवून दिले की स्त्रिया फक्त शारीरिकच नव्हे, तर भावनिक श्रम देखील सतत करतात, काळजी घेणे, समजून घेणे, सहानुभूती दाखवणे हे सर्व त्यांच्या दैनंदिन जीवनाचा भाग आहे. परंतु या श्रमाचे ना आर्थिक मूल्यमापन होते, ना सामाजिक सन्मान मिळतो. याच पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्रसंघाने 'आंतरराष्ट्रीय काळजी आणि समर्थन दिन' स्थापन करताना जगभरातील काळजी क्षेत्रातील असमानता आणि अवमूल्यन दूर करण्याचे उद्दिष्ट ठरवले आहे. UN Resolution A/RES/७८/२२० (२०२३) नुसार, काळजी आणि समर्थन क्षेत्रात गुंतवणूक वाढवणे, कामगार हक्कांचे संरक्षण करणे, आणि लिंगभाव समानतेला चालना देणे हे या दिनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. जागतिक कामगार संघटना - २०२२) च्या 'Care at Work' अहवालानुसार, जगभरात सुमारे ३७७ दशलक्ष लोक काळजीच्या क्षेत्रात कार्यरत आहेत, त्यापैकी ७६ टक्के महिला आहेत. परंतु त्यांना मिळणारे वेतन, सुरक्षा आणि सामाजिक मान्यता अत्यल्प आहे.भारतातील वास्तवही फार वेगळे नाही. घरगुती मदतनीस, आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी सेविका, वृद्ध व अपंगांच्या निगेसाठी काम करणाऱ्या महिला या सर्वजणी काळजी क्षेत्राचे अदृश्य आधारस्तंभ आहेत. त्यांच्या कामामुळे समाजाची आरोग्यव्यवस्था, शिक्षण व्यवस्था आणि सामाजिक स्थैर्य टिकून आहे, तरीही त्यांचे श्रम 'सेवा' म्हणून पाहिले जातात, 'काम' म्हणून नव्हे. अमर्त्य सेन यांनी त्यांच्या Capability Approach मध्ये म्हटले आहे की व्यक्तीची क्षमता वाढवण्यासाठी समाजाला आधार आणि काळजी देणारी रचना आवश्यक आहे. जर समाजाने काळजीला प्राधान्य दिले नाही, तर विकास केवळ आकड्यांत मर्यादित राहतो, मानवी जीवनाच्या गुणवत्तेपर्यंत पोहोचत नाही. समाजशास्त्रज्ञ पियरे बोरदियू यांच्या संकल्पनेनुसार, समाजात परस्पर विश्वास, सहकार्य आणि सामंजस्य या घटकांमुळे सामाजिक भांडवल तयार होते. काळजी आणि समर्थन हे या सामाजिक भांडवलाचे मूळ आहे. ज्या समाजात काळजीचा अभाव आहे. तिथे तुटलेली नाती, एकाकीपणा आणि सामाजिक तणाव वाढतो. वृद्ध व्यक्तींना, अपंगांना किंवा आजारी लोकांना दुर्लक्षित करणारा समाज हा केवळ असंवेदनशीलच नाही, तर सामाजिकदृष्ट्या दुर्बलही ठरतो.

आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेत 'Care Economy' ही एक नवी संकल्पना उदयास आली आहे. ही अर्थव्यवस्था त्या सर्व सेवांवर आधारित आहे ज्या लोकांच्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक कल्याणासाठी आवश्यक आहेत. जसे की आरोग्यसेवा, बालसंगोपन, वृद्धांची देखभाल, शिक्षण, मानसिक आरोग्य, आणि सामाजिक काय. &UN Women (२०२३) च्या अहवालानुसार, जर देशांनी काळजी क्षेत्रात फक्त २ टक्के GDP इतकी गुंतवणूक केली, तर पुढील दशकात कोट्यवधी नवीन रोजगार निर्माण होऊ शकतात. म्हणजेच, काळजी आणि समर्थन हे आर्थिक विकासाचेही साधन आहे. कोविड-१९ च्या काळात काळजी क्षेत्राचे खरे महत्त्व जगाने अनुभवले. डॉक्टर, नर्स, साफसफाई कर्मचारी, आशा कार्यकर्त्या, स्वयंसेवक यांनी आपल्या प्राणांची पर्वा न करता समाजाला जिवंत ठेवले. पण या काळात त्यांना ज्या प्रकारे कमी वेतन, असुरक्षितता आणि थकवा सहन करावा लागला, त्यातून समाजातील काळजीच्या असमानतेचे चित्र समोर आले. ही महामारी एक आरसा होती, ज्यात आपल्याला दिसले की समाजाला चालवणारी खरी शक्ती 'काळजी'च आहे, आणि तिच्याशिवाय विकास, प्रगती, तंत्रज्ञान हे सर्व रिकामे आहेत.काळजी आणि समर्थन या संकल्पना समाजशास्त्रीयदृष्ट्या केवळ व्यक्तींमध्ये नव्हे, तर पिढ्यांमध्येही लागू होतात. वृद्धांचा सन्मान, बालकांचे संगोपन, अपंगत्वाचा स्वीकार, पर्यावरणाची काळजी ही सर्व पिढ्यानपिढ्यांची जबाबदारी आहे. इको-फेमिनिस्ट वंदना शिवा यांनी दाखवून दिले की स्त्रिया आणि निसर्ग या दोघांनाही काळजीच्या भावनेशी जोडले गेले आहे; म्हणून पर्यावरण संवर्धन, स्त्रीसशक्तीकरण आणि सामाजिक समता हे तिन्ही एकमेकांशी निगडित आहेत. काळजी म्हणजे केवळ व्यक्तीची नाही, तर पृथ्वीचीही जबाबदारी घेणे आवश्यक आहे. भारतीय सांस्कृतिक परंपरेत 'सेवा', 'ममता', 'दया', 'सहाय्य', 'करुणा' ही मूल्ये काळजीच्या संस्कृतीचा भाग आहेत. या तत्त्वात सर्व जीवांची काळजी घेण्याची भावना अंतर्भूत आहे. परंतु दुर्दैवाने, आधुनिक काळात या मूल्यांचा प्रत्यक्ष सामाजिक आचरणात अभाव दिसतो. वृद्धाश्रमात राहणारे पालक, दुर्लक्षित अपंग नागरिक, मानसिक आरोग्याविषयी असलेला कलंक हे सर्व काळजीच्या संस्कृतीच्या क्षीणतेचे प्रतीक आहेत.

प्रत्येक माणूस दुसऱ्याच्या कल्याणाची जबाबदारी घेईल, प्रत्येक संस्था मानवी सन्मानाचे रक्षण करेल, आणि प्रत्येक शासन काळजी क्षेत्राला प्राधान्य देईल तेव्हा तो दिवसच मानवतेचा खरा उत्सव ठरेल.

**डॉ. राजेंद्र बगाटे**

# अति मोबाइल वापराचे भयानक परिणाम : २०५० चा इशारा

**मो**बाइल ही २१व्या शतकातील सर्वात मोठी देणगी म्हणता येईल. पण ज्या वेगाने त्याने माणसाच्या जीवनात प्रवेश केला, त्याच वेगाने त्याचे दुष्परिणामही वाढत आहेत. नुकत्याच सोशल मीडियावर वायरल झालेल्या एका व्हिडिओ क्लिपमध्ये २०५० सालातील जग दाखवले आहे -जिथे लहान मुले, तरुण, वृद्ध सगळेच मोबाइलमध्ये इतके गुंतले आहेत की त्यांची मान कायमस्वरूपी खाली वाकलेली आहे. गर्दीत चालणारे लोक, बागेत बसलेले तरुण, वर्गातील विद्यार्थी - सगळ्यांची स्थिती सारखीच! मान सरळ ठेवण्यासाठी सर्वजण विशेष 'नेक सपोर्ट बेल्ट' वापरत आहेत.या दृश्यामागे लपलेली वस्तुस्थिती अत्यंत भयावह आहे. सततच्या स्क्रीनकडे बघण्यामुळे 'टेक्स्ट नेक सिंड्रोम' नावाचा विकार झपाट्याने वाढत आहे. यामुळे मान दुखी, मणक्यावर ताण, स्नायूंचे आकुंचन, आणि डोळ्यांवर तीव्र ताण निर्माण होतो. शारीरिक त्रासाबरोबरच




याचे मानसिक दुष्परिणाम अधिक खोलवर आहेत. सतत मोबाइल वापरामुळे लक्ष केंद्रीत होण्याची क्षमता कमी होते, चिडचिड, निद्रानाश, नैराश्य आणि एकटेपण वाढतो. लहान मुले तर खेळण्याऐवजी स्क्रीनसमोर वाढत असल्याने त्यांची सृजनशीलता आणि संवाद कौशल्ये हरवत आहेत. व्हिडिओमध्ये दाखवलेला आणखी एक इशारा म्हणजे प्रदूषण आणि ऑक्सिजनचा व्यापार. २०५० मध्ये रस्त्यावर 'शुद्ध हवा रु ९९ मध्ये' अशा फलकांसह लोक ऑक्सिजन मास्क लावून फिरताना दिसतात. हे केवळ काल्पनिक दृश्य नाही; वाढते शहरीकरण, धूर, औद्योगिक कचरा आणि झपाट्याने नष्ट होणारी झाडे यांच्या पार्श्वभूमीवर हे वास्तव ठरण्याची शक्यता आहे.

**उपाययोजना-** डिजिटल साक्षरता आणि वेळेचे नियोजन-प्रत्येकाने दिवसातील मोबाइल वापरासाठी निश्चित मर्यादा ठरवणे आवश्यक आहे.'स्क्रीन टाइम लिमिट' ॲप्सचा वापर करून नियंत्रण ठेवावे, शारीरिक हालचाल वाढवा-दर तासाने उठून ५ मिनिटे चालणे, मान-खांद्याचे व्यायाम करणे.आठवड्यातून एक दिवस 'नो मोबाइल डे'पाळणे हीसुद्धा चांगली सवय आहे. पर्यावरणाकडे लक्ष द्या-दरवर्षी किमान एक झाड लावा. प्रदूषण नियंत्रणासाठी सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवा.हवेची गुणवत्ता (Air Quality Index) जाणून घ्या आणि त्यानुसार सावधगिरी बाळगा. बालकांसाठी स्क्रीन नियम-५ वर्षांखालील मुलांना स्क्रीनपासून दूर ठेवावे. खेळ, वाचन, संवाद, आणि मैदानी क्रियाकलापांना प्रोत्साहन द्यावे. मानसिक आरोग्य जपा-मित्र-परिवाराशी प्रत्यक्ष संवाद वाढवा. योग, ध्यान, आणि सृजनशील छंदांनी मन स्थिर ठेवा.२०५० मध्ये दाखवलेले जग टाळायचे असेल, तर आत्ताच जागे होणे आवश्यक आहे.मोबाइल आपल्या हातात आहे, पण नियंत्रण आपल्याच मनात असले पाहिजे. तंत्रज्ञान आपल्याला माणूस बनवते, 'यंत्रमानव' नाही' - हे लक्षात ठेवूया !

**प्रा. विजय कोष्टी,**
कवठेमहांकाळ ,
जि. सांगली.

# अकोटचे श्री नरसिंग महाराज यात्रा महोत्सव ६ नोव्हेंबरपासून

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट शहराचे ग्रामदैवत संत श्री नरसिंग महाराज यांचा वार्षिक यात्रा महोत्सव यंदा ६ नोव्हेंबरपासून मोठ्या उत्साहात सुरू होत असून हा महोत्सव १५ डिसेंबरपर्यंत चालणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही महिनाभर विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाची सुरुवात कार्तिक वद्य तिथी, ६ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता तीर्थस्थापना विधीने होणार आहे.



७ नोव्हेंबरला सकाळी ९ वाजता संत मियासाहेब यांच्या तख्ताची स्थापना केली जाईल. कार्तिक महिन्यातील काकडा आरतीची समाप्ती ८ नोव्हेंबरला होणार आहे.

यानंतर ६ नोव्हेंबरपासून दररोज भजन, प्रवचन, हरिपाठ, भारुड, नामसंकीर्तन यांसारख्या भक्तिमय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्री नरसिंग महाराजांची पालखी श्री गुरूपूजेच्या निमित्ताने ८ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता अकोटपासून ९ किमी अंतरावर असलेल्या उमरा (तालुका अकोट) येथे अनंतराव देशमुख (कुटासा) यांच्या प्रमुख सहभागात निघेल. श्री गुरूपूजेनंतर सायंकाळी ६ वाजता अग्रसेन चौक, पोपटखेड रोड येथून पालखी मिरवणूक पुन्हा श्री नरसिंग मंदिरात परत येईल.

१० नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता दुसरी पालखी मिरवणूक श्री नरसिंग मंदिरातून निघेल. या मिरवणुकीचा मार्ग — नरसिंह रोड, गवळीपुरा, सोनू चौक, जयस्तंभ चौक, जवाहर रोड, जिगलवाडी, केशवराव वेटाळ चौक, सोमवार वेस, कालंका चौक, यात्रा चौक असा राहणार असून संध्याकाळी ४ वाजता मंदिरात परत येईल. त्यानंतर गोपाळकाला (दहीहंडी) आणि महाप्रसाद आयोजित करण्यात आला आहे. १३ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता प्रभाकर बुवा सरोदे (अकोट) यांचे काल्याचे कीर्तन होईल. १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजता श्री नरसिंग महाराज समाधीस्थळी रुद्राभिषेक व सकाळी ९ वाजता गाईची पूजा (गौताबिल) होणार आहे. १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता संत मियासाहेब यांच्या तख्ता समोर काकड, भजन, गोपाळकाला प्रभाळ पूजेचे भजन तसेच रात्री ८ ते १० वाजेपर्यंत विशेष कार्यक्रम पार पडणार आहेत. या सर्व धार्मिक सोहळ्यांमध्ये सहभागी होऊन भाविकांनी श्रींच्या दर्शनाचा व प्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संत नरसिंग महाराज संस्थानचे अध्यक्ष सतीश गुणवंतराव आसरकर यांनी केले आहे.

# निलेश कापकर यांच्या आंदोलनाच्या इशाऱ्याची दखल

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील आलेगाव येथे मुख्य रस्त्यावर २६ ऑक्टोबर रोजी झालेल्या पावसानंतर विजयाताई देशमुख कॉलेजसमोर मोठ्या प्रमाणात गटाराचे पाणी साचले होते. या पाण्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता, तसेच वाहन वाहतुकीतही अडथळा निर्माण झाला होता.

ही बाब सामाजिक कार्यकर्ते निलेश तोताराम कापकर यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. त्यांनी अकोला जिल्हाधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, पातूर तहसीलदार तसेच चान्नी पोलिस ठाण्याचे अधिकारी यांच्याकडे तात्काळ कारवाईची मागणी केली. तसेच, '२४ तासांत गटार साफ न झाल्यास २८ ऑक्टोबर रोजी आलेगाव बंद आंदोलन करून गटारात उतरून बसणार,' असा इशारा त्यांनी प्रशासनाला दिला होता. कापकर यांच्या इशाऱ्यानंतर प्रशासनाने तत्परतेने कार्यवाही केली. गटारातील पाणी दोन्ही बाजूंनी काढून टाकण्यात आले तसेच रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे कामही सुरू करण्यात आले आहे. या तात्काळ आणि प्रभावी पाठपुराव्यामुळे आलेगाव परिसरातील नागरिकांनी निलेश कापकर यांचे मनापासून कौतुक केले आहे. सामाजिक बांधिलकी जपत प्रशासनाला कामास प्रवृत्त करणाऱ्या त्यांच्या पुढाकाराचे सर्वत्र स्वागत होत आहे.

आलेगावमध्ये साचलेले गटाराचे पाणी काढले



# प्रभातचे दोन रायफल शुटर राज्यस्तरावर!



**अकोला :** प्रभात किड्स स्कूलच्या दोन रायफल शुटरनी विभाग स्तरीय स्पर्धेत उत्कृष्ट यश संपादन केल्याने त्यांची राज्यस्तरीय रायफल शुटींग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा संकुल व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विभाग स्तरीय रायफल शुटींग स्पर्धेचे आयोजन स्थानिक क्रीडा संकुल, अकोला येथे दि. १७ ते १९ ऑक्टोबर दरम्यान करण्यात आले होते. या विभाग स्तरीय रायफल शुटींग स्पर्धेत १४ वर्ष वयोगटातील मुलींमध्ये ओपन साईट प्रकारात पियुषा मानेवाघ हिने व्दितीय क्रमांक प्राप्त केला तसेच १४ वर्ष वयोगटातील मुलांमध्ये 'ओपन साईट' प्रकारात अंश तारकस याने तृतीय क्रमांक पटकविला.

या दोघांनीही खेळामध्ये चमकदार कामगिरी केल्याने या खेळाडूंची राज्यस्तरावर निवड झाली आहे.

# ग्रामस्थांनी घेतली गावात बालविवाह होऊ न देण्याची शपथ



■ प्रतिनिधी | अकोला ■

आपल्या गावात बालविवाह होऊ न देण्याची शपथ विविध ग्राम बाल संरक्षण समितीचे सदस्य, ग्रामस्थ यांनी महिला व बालविकास विभागातर्फे विविध ठिकाणी आयोजित कार्यशाळांत घेतली.

बालविवाह मुक्त महाराष्ट्र संकल्प अभियानात १०० दिवसांचा कृती कार्यक्रम राबविण्यात येत असून, गावोगाव जनजागृती होत आहे. महिला व बालविकास कार्यालय, तसेच जिल्हा बाल संरक्षण कक्षामार्फत अकोला, बार्शीटाकळी, पातूर, मुर्तिजापूर या तालुक्यांतील ग्राम बाल संरक्षण समितीचे सदस्य सचिव, अंगणवाडी सेविका व पोलीस पाटील आणि आशा सेविका यांच्या प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आल्या. यावेळी ग्राम समितीचे सदस्य व ग्रामस्थांनी गावात बालविवाह होऊ न देण्याबाबत प्रतिज्ञा घेतली.

प्रशिक्षण कार्यशाळेत बालकांचे हक्क कायदे, बालविवाह अधिनियम, बाल लैंगिक अत्याचार अधिनियम, बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम, तसेच ग्राम बाल संरक्षण समितीची रचना कार्य याबाबत माहिती देण्यात आली. राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे माजी सदस्य ?ड. संजय सेंगर, यशदाचे प्रशिक्षक अनिल राऊत व संतोष चक्रनारायण यानी सविस्तर मार्गदर्शन व उपस्थितांचे शंकानिरसन केले.जिल्हा बाल संरक्षण कक्ष,चाइल्ड हेल्प लाईन,सुखाय फाऊंडेशन, एन्करेज एज्युकेशनल फाऊंडेशन, विप्ला फाऊंडेशन यांचे उपक्रमाला सहकार्य लाभले.

# पाटसूल गावानजीक मारुती सुझुकी कार उलटली!



## चार जण किरकोळ जखमी; सहा महिन्याचे बाळ सुखरूप

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट तालुक्यातील देवरी–शेगाव रोडवरील पाटसूल गावाजवळ अमरावती जिल्ह्यातील एक मारुती सुझुकी कार (क्रमांक MH-27 BF 0319) अपघातग्रस्त झाली. या अपघातात कारमधील चार जण किरकोळ जखमी झाले असून, कारमध्ये असलेले सहा महिन्याचे बाळ सुखरूप आहे.

अपघातानंतर घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तत्काळ मदतकार्य सुरू केले. १०८ रुग्णवाहिकेचे चालक जुबेर खान आणि डॉक्टर ऋषिकेश कराळे यांनी जखमींना तातडीने मदत पुरवून अकोट येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. सध्या सर्व जखमींवर उपचार सुरू आहेत.

घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, रस्त्यावर असलेल्या मोठ्या भेगा व खराब रस्त्यामुळे चालकाचा वाहनावरील ताबा सुटून कार रस्त्याच्या कडेला उलटली. रस्त्यावरील खराब स्थितीमुळे हा अपघात घडल्याचे स्थानिकांनी सांगितले.


## जाहीर नोटीस

आमचे पक्षकाराने दिलेल्या माहीती व अधिकाराने या जाहीर नोटीस व्दारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी नितिनकुमार छगनलाल गनत्रा यांच्या सोबत अकोला महानगर पालिकेच्या हद्दीतील दुर्गा चौक तापडियानगर, येथील स्वमालकीची व ताब्यातील विभाजीत ले आउट मधील प्लॉट नं. ११२ अ, सर्वे नं. ५७ नझुल प्लॉट नं. २/२९/अ, शिट नं. ६३ -सी, मौजा उमरी अकोला येथील अकोला म. न. पा. विभगाचे आदेश डि.डि.एम.सी.ओ / एस.ए/२०२३/ए.पी.एल / १०६७ आदेश दि. २६/१०/२०२३ प्रमाणे पुर्व पश्चिम - ३५ फुट उत्तर दक्षिण- १०० फुट एकुण ३५०० चौ. फुट प्लॉटवर १४१. ५१ चौ. मी. २ मजली बांधकाम अकोला. म. न. पा. यांच्या बांधकाम परवानगी केस नं. १४/१३०/२००३-०४ दि.३०/०८/२००३ च्या आदेशाने केलेल्या बांधकामासहीत सदर आमच्या पक्षकाराचे मालकी हक्कातील घर ज्यामध्ये इतर कोणाचाही अधिकार व हक्क व बोजा नाही. अशी मालमत्ता आमचे पक्षकाराने विकण्याचा सौदा कायम केला असुन त्याची खरेदी सुध्दा नियोजीत तारखे मध्ये विकत घेणार नितिन गणत्रा यांच्या सोबत केला असुन आमचे पक्षकाराची मालमत्ता विकत घेणारे नितिन गणत्रा यांनी त्यांचे वकील ॲड. अनिल पारवानी याच्या मार्फत दि. २०/१०/२०२५ रोजी दैनिक भास्कर या दैनिकातुन जाहीर नोटीस प्रकाशीत केली होती व त्यावर आक्षेप व हरकत घेण्याची मुदत दिलेली होती परंतु त्या मुदतीत कोणताही आक्षेप व हरकत आलेली नसुन सदर मालमत्ते मध्ये कोणाचाही अधिकार नाही. तसेच सदर मालमत्ता आमच्या पक्षकाराच्या स्वमिळकतीची व अधिकाराची असुन ती आज रोजी आमचे पक्षकाराच्या ताब्यात आहे. त्यामुळे आमचे पक्षकाराची मालमत्ता विकण्याचा सौदा नितिन गणत्रा यांच्या सोबत हयापुर्वी झाला परंतु त्यांनी नियोजीत वेळेत सदर खरेदीखत करण्याकरीता त्यांच्या बॅकेने कर्ज पुरविलेले नाही असे सांगुन पुन्हा खरेदीची वेळ वाढवुन घेतली होती व त्यानंतर आमचे पक्षकाराने अनेकदा नितिन गनत्रा यांच्याशी संपर्क करून खरेदी नियोजीत तारखेच्या आत करून घेण्याचे सुचविले. परंतु नितिन गनत्रा यांच्या कडुन कुठलाही होकारार्थी उत्तर वा संपर्क केला नाही, म्हणुन आमचे पक्षकार सदर जाहीर नोटीस व्दारे सुचित करतात की, जर नितिन गनत्रा यांनी खरेदी खत करून घेण्याची पुर्ण तयारी झाली असेल तर ईसार प्रमाणे ठरल्या नुसार दि. ३०/१०/२०२५ रोजी खरेदी करून घ्यावी व ती करून देण्यास आमचे पक्षकार तयार आहेत. अन्यथा खरेदी करावयाची नसल्यास दि. ३०/१०/२०२५ पुर्वी वा रोजी आमचे पक्षकार नितिन गणत्रा यांना ईसाराची रकम परत देण्यास तयार आहेत. परंतु दि.३०/१०/२०२५ नंतर आमचे पक्षकार कोणतीही ईसारापोटी घेतलेली रक्कम परत देण्यास बंधनकारक राहणार नाहीत. तसेच आमचे पक्षकाराने केलेला ईसार हा संपुष्टात येईल व त्या परिणामास नितिन गणत्रा हे जबाबदार राहतील. करीता सदर जाहीर नोटीस.

अकोला.
दिनांक २७/१०/२०२५

पक्षकारा तर्फे अधिवक्ता
ॲड. प्रविण. आर. कडाळे
मो.नं. ९८५०३४३४७७

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी खालील मालमत्ता / शेती विकत घेण्याचा सौदा कायम केला आहे. मालमत्ता/शेतीचे वर्णन:- मौजे कौलखेड जहागीर, ता. जि. अकोला गट क्रं .६९/१, १. हे. ८४ आर. शेतजमीन, ज्यास चतु:र्सिमा:- पुर्वेस - ज्ञानेश्वर पदमने यांचे शेत, पश्चिमेस- श्री सरदार यांचे शेत, दक्षिणेस - पुंडलीक तायडे यांचे शेत व उत्तरेस- नितीन तायडे यांची शेतजमीन. वरील वर्णांकीत मालमत्ता/शेती मध्ये कोणाचाही कुठल्याहीप्रकारचा ताबा, हक्क, गहाण, बोजा, बक्षीस, वारसा, किंवा इतर कुठलाही अधिकार असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत खालील नमुद पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यासह संपर्क करावा, अन्यथा आमचे पक्षकार वरील मालमत्ता रजिस्टर खरेदी खता द्वारे विकत घेतील व त्यानंतर कोणाचाही कुठल्याही प्रकारचा उजर चालणार नाही. याची नोंद घ्यावी. करीता ही जाहीर नोटीस.

पक्षकारा तर्फे अधिवक्ता
ॲड. व्ही.आर. ढोरे
येवता रोड , मलकापूर, अकोला.
मो. ८६६९३२१९८६
अकोला
दि. २९.१०.२०२५

## जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १९३९/२०२५ — प्रोसेस नं.१७६४९/२०२५
चौ.ता. ०८/१२/२०२५ — दिनांक : १८/१०/२०२५

**अर्जदार :** १. निखिल अरविंद किबे रा. रणजित पाटील हॉस्पिटल जवळ, एमएलसी, जठारपेठ रोड, उमरी प्र, अकोला. ता. जि. अकोला. २. चंदन विजय पारखे रा. ४०५४, बुकेट पार्क लेन, सन जोस कॅलिफोर्निया ९५१३५, युएसए दुसरा पत्ता - व्दारा निखिल अरविंद किबे रा. रणजित पाटील हॉस्पिटल जवळ, एमएलसी, जठारपेठ रोड, उमरी प्र, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. अरविंद रामचंद्र किबे २. उषा अरविंद किबे
**पत्ता :-** रा. रणजित पाटील हॉस्पिटल जवळ, जठारपेठ रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अरविंद रामचंद्र किबे यांचे दि. ०४/१०/२०२४ रोजी अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत उषा अरविंद किबे यांचे दि. ०२/०२/२०१० रोजी निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास. वारसं नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०८/१२/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १८/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला


# स्त्रीभ्रूणहत्या जनजागृती काळाची गरज : डॉ. डोंगरे

**अकोला :** संत गाडगेबाबा आरोग्य सेवा अभियान वतीने गेल्या अनेक वर्षापासून स्त्रीभ्रूणहत्या जनजागृती बेटी बचाओ अभियान, आरोग्य सेवा अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागात विविध रोग निदान शिबिर राबवून संत गाडगेबाबा आरोग्य सेवा अभियानाचे प्रमुख डॉ. रामकृष्ण डोंगरे यांनी ग्रामीण व शहरी भागातील हजारो रुग्णांना मोफत तपासणी मोफत औषधी उपचार तज्ञ डॉक्टरांच्या वतीने मिळवून देत असताना २७ ऑक्टोबर रोजी कापशी प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणीमार्गदर्शन केले.

# उर्जापर्व फाउंडेशनतर्फे 'किल्ले बनवा' स्पर्धा संपन्न

■ प्रतिनिधी | अकोला ■

उर्जापर्व फाउंडेशन या सामाजिक संस्थेच्या वतीने छोट्या बालमित्रांसाठी 'किल्ले बनवा' ही आगळीवेगळी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. संस्थेच्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत तब्बल ३२ बालमित्रांनी या स्पर्धेत सहभागी होऊन आपल्या कल्पकतेची झलक सादर केली.

स्पर्धेतील किल्ल्यांचे परीक्षण करून काही उत्कृष्ट किल्ल्यांना क्रमांक देऊन गौरविण्यात आले. त्यामध्ये केवळ चार वर्षांच्या कु. थिया योगेश मोगरे हिने बनवलेल्या आकर्षक किल्ल्याला प्रथम क्रमांक मिळाला. द्वितीय क्रमांक नैतिक निशिकांत देशपांडे याला तर तृतीय क्रमांक प्रदीप बढे याला देण्यात आला. तसेच गजानन शेजोळे, योगीराज जगताप, युगांश जमदाळे, रुद्र चव्हाण, देवांश बोळे यांना प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात आले. स्पर्धेत सहभागी सर्व बालमित्रांना प्रमाणपत्र, खाऊ आणि शैक्षणिक साहित्य भेट स्वरूपात देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले.



या कार्यक्रमास उर्जापर्व फाउंडेशनचे अध्यक्ष व मा. भाजयुमो प्रदेश सचिव ॲड. संजय पाटील तिकांडे, तसेच शुभम बोन्डगावकर, गणेश बढे, अमोल कोल्हे, गजानन इचे, अरुण कावस्कार, विराज भगत, प्रमोद ठोंबरे, प्रमोद शहाकार आदी मान्यवर उपस्थित होते. पालकवर्गानेही मोठ्या संख्येने हजेरी लावून मुलांचे मनोबल वाढविले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आणि नियोजन उर्जापर्व फाउंडेशनतर्फे करण्यात आले.

# आलेगावमध्ये कापकर दांपत्याचे दुहेरी वरदान



## रुग्णवाहिका व फिरते स्वच्छालय सेवेचा शुभारंभ

■ प्रतिनिधी | खेट्री ■

'काम बोलतंय कामं...' या म्हणीचा प्रत्यय समाजासाठी कार्यरत असलेल्या आलेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते निलेश तोताराम कापकर आणि सौ. वैष्णवी निलेश कापकर या दांपत्याने दिला आहे. सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत त्यांनी दोन सेवांचा शुभारंभ करून आलेगाव परिसरात प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे.

महानुभव पंथ आश्रमातील 'आक्का' यांच्या शुभहस्ते रुग्णवाहिका सेवा आणि फिरते स्वच्छालय सेवा यांचा शुभारंभ करण्यात आला.निलेश कापकर यांनी स्वतःच्या वैयक्तिक निधीतून २४ तास उपलब्ध असलेली रुग्णवाहिका सेवा सुरू केली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी ही सेवा पूर्णतः मोफत असणार असून, सक्षम रुग्णांनी फक्त डिझेलचा खर्च उचलावा, अशी विनंती त्यांनी केली आहे. रुग्णवाहिका संपर्क क्रमांक: ८६९८९०१०५७ सुद्धा जाहीर करण्यात आला आहे.

आलेगाव बसस्थानक परिसरात महिलांसाठी स्वच्छतागृहाची सुविधा नसल्याने सौ. वैष्णवी कापकर यांनी 'फिरते स्वच्छालय' सेवा सुरू केली आहे. महिलांना सन्मानाने, सुरक्षिततेने आणि सुलभतेने स्वच्छतेचा उपयोग करता यावा, हा त्यांच्या उपक्रमामागचा मुख्य हेतू आहे. रुग्णसेवा आणि महिलांसाठी स्वच्छतेची सुविधा या दुहेरी समाजोपयोगी कार्यामुळे आलेगाव परिसरात कापकर दांपत्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. 'महिलांचा सन्मान, रुग्णांची सेवा आणि बेरोजगारांना रोजगार — हेच आमच्या कार्याचं ध्येय आहे,' असं निलेश कापकर यांनी सांगितलं.

# वाढते घटस्फोट, लग्न न जुळणे ही समाजा समोरील नवी आव्हाने - डॉ. रणजीत सपकाळ



## राज्यस्तरीय मराठा उपवर युवक-युवती परिचय मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

■ प्रतिनिधी | अकोला ■

'लग्न लवकर न जुळणे, जुळलेली लग्न तुटणे, वाढते घटस्फोट ही समाजासमोरील नवी आव्हाने आहेत,' असे प्रतिपादन महाबीजचे संचालक डॉ. रणजीत सपकाळ यांनी केले. ते अकोला जिल्हा मराठा मंडळ व पाटील बहुउद्देशीय सेवा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. नामदेवराव पोहरे सभागृह, मराठा मंडळ, रामदास पेठ येथे आयोजित राज्यस्तरीय उपवर युवक-युवती परिचय मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पाटील बहुउद्देशीय सेवा समितीचे अध्यक्ष महादेवराव भुईभार होते. यावेळी अकोला जिल्हा मराठा मंडळाचे अध्यक्ष प्रकाश पाटील, सचिव डॉ. विवेक हिवरे, उपाध्यक्ष दिवाकर पाटील, कोषाध्यक्ष डॉ. विनोद बोर्डे, सहसचिव श्रीकांत पागृत, सदस्य डॉ. विनीत हिंगणकर, संजय सरप, अनिल राऊत, पंकज देशमुख, निलेश पाचडे, डॉ. निखील बोर्डे तसेच पाटील सेवा समितीचे देविदास कोरपे, सुभाषराव पुंडकर, मनोहर महल्ले, बबनराव कानकिरड, सुरेश पागृत, महेंद्र पाटील, प्रशांत काळे, ॲड. रामेश्वर खोंड आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. 'लग्न जुळवणे ही गोष्ट दिवसेंदिवस अवघड होत चालली आहे. समाजाने या आव्हानाचा गांभीर्याने विचार करून उपाययोजना कराव्यात. तडजोड व समजुतीने दुभंगलेली मने पुन्हा जोडता येऊ शकतात,' असे मत डॉ. सपकाळ यांनी व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात महादेवराव भुईभार म्हणाले, 'कर्ज काढून लग्न करू नका. कमीतकमी खर्चात लग्न करा. लग्न-तेरवीवर अवाजवी खर्च न करता तो पैसा मुलांच्या शिक्षणावर खर्च करा.' कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीकृष्ण विखे यांनी केले. संचालन सौ. ज्योती इंगळे यांनी तर आभार प्रा. विवेक हिवरे यांनी मानले. यावेळी महाराष्ट्र शासनाचा सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक बजरंग गावंडे यांचा सत्कार करण्यात आला. सकाळच्या सत्रात उपवर युवक-युवतींनी नावनोंदणी करून आपला परिचय सादर केला. दुपारच्या सत्रात घटस्फोटित, विधवा व विधूर बांधवांचे स्वतंत्र परिचय सत्र पार पडले. याचे संचालन सौ. सोनाली मोरे व प्रा. जयश्री बंड यांनी केले.दरवर्षीप्रमाणे यावर्षीही आयोजक समितीच्या वतीने 'ऋणानुबंध' सोयरिक परिचय पुस्तिका प्रकाशित करण्यात येणार आहे. परिचय पत्रे व दोन फोटोसह अर्ज १० नोव्हेंबर २०२५ पर्यंत गणेश झेरॉक्स, सिव्हील लाईन चौक येथे जमा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी केशवराव मालोकार, गणेश काकड, शिवहरी ताले, संदीप गावंडे, बजरंग गावंडे, गजानन दोरे, अजय निचळ, ऋतुराज अवताडे, अशोक बोंद्रे, प्रा. प्रविण वाघमारे, रावसाहेब काळे, प्रफुल्ल डहाके, संतोष तादळे, अजाबराव पारसकर, श्रीराम काळे आदींसह शेकडो कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.


जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक ३२९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# झाडे लावा आणि झाडे तोडा प्रशासनाची नवी योजना

## सर्रास तोडले जातात झाडे :झाडे वाचवा म्हणणारे कुठे झोपले?

**रवींद्र लाखे/जनमाध्यम**

**वर्धा :** गेल्या वर्षभरात वर्ध्यात झाडांची शोभा वाढली नाही, उलट, झाडांचे पर्यावरण बळी पडले सरकारच्या जाहिरातींमध्ये हिरव्या रंगाच्या छटा, तर प्रत्यक्षात झाडांचे लाकूड काढून भुईसपाट प्रदेशाची विकास यात्रा सुरू आहे.

झाडाच्या छायेत घाम पुसणारे नेते, दुसऱ्या दिवशी तीच छाया हटवायला बेत घेतात... कारण झाडांच्या सावलीत त्यांच्या भाषणाला लाईट पुरत नाही म्हणे झाडे लावण्याचे फोटो सोशल मिडीयावर टाकणारी सरकारची टीम, झाडे तोडताना मात्र कॅमेऱ्याला दिसत नाही. आदेश कुठून आला, कुणी दिला, झाड का तोडलं याचा क्विझ स्थानिक पालिकेकडून दर दिवशी उत्तर मात्र वरून आले, या जादूई तालावर फांद्या विद्युत तारात आड आल्या,अशी जुनी जुनी कारणं आता संपली. या झाडापाशी तारा नाहीत, नेत्याची उंबऱ्याही नाही. तरी भुईसपाट झाड, मग पर्यावरण वाचवण्याची सरकारची




हरित योजना ही केवळ फाईलमधली हिरवळी आहे का?आणि वर्ध्याचे नागरिक खिडकीतून पाहतात, पण तक्रार करण्याची त्यांना हिंम्मत होत नाही. वृक्षप्रेमी संघटना मात्र सरकारी जाहिरातीत झाडाच्या फोटोला लाईक देण्यापलीकडे जात नाहीत. अशीच हरित क्रांतीची ब्रांडिंग चालली आहे, सरकारने झाडे लावा, झाडे जगवा म्हटलं होतं. पण आता नव्या योजनेनुसार झाडे लावा, लगेचच तोडा, छान नवी पर्यावरण निती ओठांवर हिरवाई, हातात कुऱ्हाड आणि मनात वरून आलेला आदेश, अशीच आहे आपली हरित यात्रा.

अशीच एक घटना शहरातील साई मंदिर रस्त्यावर उभ्या दोन हिरवळ झाडांची निर्दयपणे तोड हत्या करून 'विकास'च्या नावाखाली पर्यावरणावर थेट कुऱ्हाड चालवण्यात आली आहे. कुणाच्या आदेशाने ही झाडतोड झाली, याचं उत्तर प्रशासनाकडे नाही. म्हणजे कोणीतरी बिनदिक्कत झाडं कापतो आणि नगरपरिषद डोळे मिटून बसते, नगरपरिषदेचे अधिकारी विशाल सोमवंशी म्हणतात झाड कोणी तोडलं माहिती नाही, तर मुख्याधिकारी देशमुखांचे मौन प्रशासनाच्या निष्क्रियतेचे प्रतीक बनले आहे. झाडतोडीच्या या अंधाऱ्या कारवायामागे कोणते गलिच्छ हात आहेत, हे शोधण्याची हिंमत नगरपरिषदे दाखवणार आहे का? वृक्षप्रेमी मुरलीधर बेलखोडे यांनी या कृतीला निसर्गद्रोह ठरवत तीव्र निषेध केला असून दोषींवर तातडीने गुन्हे दाखल न झाल्यास जनता रस्त्यावर उतरेल, इशारा दिला आहे. वर्धेच्या जमिनीवर झाडं नाहीशी होतायत, पण प्रशासकांची मने मात्र दगडात बदलली आहेत.

वर्धा शहरात सुरू असलेली बिनपरवानगी वृक्षतोड ही पर्यावरण आणि नागरिकांच्या भविष्यास घातक आहे. रस्त्यावर असलेले झाड कोणाच्याही वैयक्तिक मालकीचे नसून त्यावर नगरपालिकेचा हक्क असतो. असे झाड तोडताना परवानगी घेणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. मात्र काहीजण स्वार्थासाठी मोठी झाडे कापून पर्यावरणाचा तोल बिघडवत आहेत. शासन एका बाजूने वृक्षारोपण मोहिमा राबवत असताना दुसरीकडे अशा तोडीचे प्रकार घडणे दुर्दैवी आहे. जैवविविधतेच्या जतनासाठी आणि पुढच्या पिढीसाठी प्रत्येक नागरिकाने जागरूक होऊन अशा कृत्यांना विरोध करणे हीच आजची खरी गरज आहे.

**मुरलीधर बेलखोडे,**
अध्यक्ष निसर्ग सेवा समिती.

# आम आदमी पक्ष व विदर्भ विकास आघाडीची निवडणूक रणनिती ठरली

**हिंगणघाट जनमाध्यम :** येत्या नगरपरिषद तसेच जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकांमध्ये आम आदमी पक्ष आणि विदर्भ विकास आघाडी सक्रियपणे सहभागी होणार आहेत. भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेविरुद्ध असलेल्या या निवडणुकांना महाविकास आघाडीत सहभागी होऊन सामोरे जाण्याचा दोन्ही पक्षांचा निर्णय झाला आहे. मात्र, महाविकास आघाडीतील जागावाटपात घटक पक्षांना सन्मानजनक स्थान मिळाले नाही, तर स्वतंत्रपणे निवडणूक लढविण्याचाही पर्याय दोन्ही पक्षांनी उघडा ठेवला आहे. तसेच अन्य समविचारी पक्षांना सोबत घेऊन निवडणूक रिंगणात उतरण्याची तयारीही दर्शवली आहे.सर्व पदाधिकारी व इच्छुक



उमेदवारांनी २९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सहा वाजता, आंबेडकर शाळेसमोर इझी पेंट्सच्या बाजूला असलेल्या विदर्भ विकास आघाडीच्या कार्यालयात उपस्थित राहावे, असे आवाहन आम आदमी पक्ष आणि विदर्भ विकास आघाडीचे संस्थापक अनिल जवादे यांनी केले आहे.

# कुत्रा हाकलण्याच्या वादातून वृद्धास काठीने केली मारहाण

**वर्धा :** श्वान घराकडे हाकलल्याच्या कारणातून वृद्धास काठीने मारहाण करून जखमी करण्यात आले. कुरझडी येथे रविवारी (ता. २६) ही घटना घडली. विठ्ठल पोटफोडे (वय ६५) रा. कुरझडी, असे जखमीचे नाव आहे. विठ्ठल पोटफोडे हे घरासमोरील गेटजवळ बसून होते. गेटजवळ गावातील भटके श्वान आल्याने त्याला हाकलले. ते श्वान भीमराव ताकसांडे यांच्या घराकडे गेले. त्यानंतर श्वानाला माझ्या घराकडे का हाकलले, असे म्हणत भीमरावने विठ्ठल पोटफोडे यांना काठीने मारहाण करून जखमी केले. तक्रारीवरून सावंगी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## संक्षिप्त

### आर्वीत काँग्रेसचा 'स्वबळा'चा बिगुल : भाजपविरोधात रणनीतीचा नवा शिलेदार

**आर्वी जनमाध्यम :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने आर्वी नगरपालिकेत स्वबळावर उतरायचा निर्धार केल्याने राजकीय वातावरण तापू लागले आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे महासचिव अनंत मोहोड यांनी जाहीर केले की नगरपालिकेच्या सर्व २५ पैकी २५ जागांवर काँग्रेसचे उमेदवार रिंगणात असतील.२७ ऑक्टोबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेत मोहोड म्हणाले की, कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे आघाड्यांच्या राजकारणाला विराम देत काँग्रेस आता स्वतंत्रपणे मैदानात उतरणार आहे. ही लढत केवळ विकासाच्या प्रश्नांवर नव्हे, तर स्थानिक सत्ताधाऱ्यांविरुद्धचा जनआक्रोश व्यक्त करणारी ठरणार आहे.आर्वी विधानसभा क्षेत्रात १३ जिल्हा परिषद आणि २६ पंचायत समितीच्या जागांवरही काँग्रेसकडे मोठ्या प्रमाणात अर्ज आले आहेत. युवक वर्गाचा उत्साह आणि गावपातळीवरील संघटनशक्ती पाहता पक्षाने स्वबळ हेच सूत्र अग्रक्रमाने स्वीकारले आहे.काँग्रेसच्या या भूमिकेमुळे विरोधकांची गणिते बिघडण्याची शक्यता व्यक्त होत असून, आगामी नगरपालिका निवडणुका आर्वीतील राजकीय नकाशा बदलवणाऱ्या ठरतील, असा कानोसा राजकीय वर्तुळात घेतला जात आहे.

### शेतातून घरी जात असताना महिलेला दोन अज्ञात इसमांनी लुटले

**चानकी कोपरा:** चारमंडळ परिसरात एका महिलेला लुटीचा धक्कादायक प्रकार घडला आहे. स्वतःच्या शेतातील काम आटोपून घरी जात असताना दोन अज्ञात इसमांनी तिच्या गळ्यातील सोन्याची गळसूत्र हिसकावून पोबारा केला. मिळालेल्या माहितीनुसार, मायाबाई चाटे या महिला आज दुपारी सुमारे ४.३० वाजता चारमंडळ शिवारातील रस्त्याने घरी निघाल्या होत्या. त्या वेळी मोटरसायकल वरून आलेल्या दोन अज्ञात इसमांनी एकट्या महिलेला पाहताच त्यांच्या गळ्यातील सुमारे ५० हजार रुपये किमतीचे सोन्याचे गळसूत्र जबरदस्तीने ओढून पळ काढला. या घटनेने महिला भयभीत झाल्या असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. लुटारूंपैकी एकाने काळा टी-शर्ट आणि हेल्मेट घातले असल्याचे पीडित महिलेकडून सांगण्यात आले. घटनेची माहिती मिळताच दहेगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून पुढील तपास सुरू आहे.

### घर का घेतले म्हणत तलवारीने हल्ला

**आर्वी :** घराशेजारील घर का घेतले असे म्हणत वाद करून तलवारीने एकावर हल्ला चढविण्यात आला. आर्वी शहरातील राणी लक्ष्मीबाई वॉर्ड येथे ही घटना घडली. राजेश बाळकृष्ण सोनोने रा. राणी लक्ष्मीबाई वॉर्ड, आर्वी असे या प्रकरणातील जखमीचे नाव आहे. त्यांना त्यांच्याच घराच्या परिसरातीलच अश्विन सुधीर चवरे याने तलवारीने मारहाण करून जखमी केल्याचे तक्रारीत नमूद असल्याचे आर्वी पोलिसांनी सांगितले. या प्रकरणातील आरोपीस पोलिसांनी अटक केली.

# हिंगणघाटमध्ये भागवत कथा महोत्सवाचा उत्साह

## सुरेशशरण शास्त्रींच्या वाणीने भक्तिभावाचा दरवळ

**हिंगणघाट जनमाध्यम :** नगरपरिषद कॉलनीतील श्री हनुमान मंदिराजवळ २४ ते ३० ऑक्टोबर दरम्यान सुरू असलेल्या श्रीमद् सनातन भागवत कथा महोत्सवाने शहरात अनोखा धार्मिक उत्साह निर्माण केला आहे. श्रद्धेय सुरेशशरण शास्त्री महाराज यांच्या मधुर आणि प्रभावी वाणीतून सादर केल्या जाणाऱ्या कथा ऐकण्यास दररोज मोठ्या संख्येने भाविक हजेरी लावत आहेत.महोत्सवाची सुरुवात शुक्रवार, २४ ऑक्टोबर रोजी बालाजी मंदिरापासून निघालेल्या भव्य मंगल कलश यात्रेने झाली. या शोभायात्रेत महिलांसह नागरिकांची उत्स्फूर्त सहभाग नोंदवला गेला. यात्रा शहरातील मुख्य मार्गांवरून फिरत




श्री हनुमान मंदिर, नगरपरिषद कॉलनी येथे संपन्न झाली.प्रत्येक दिवशी दुपारी ३ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत कथा वाचनाचे आयोजन आहे. परीक्षित जन्म, ध्रुव चरित्र, भक्त प्रल्हाद आणि भगवान नरसिंह अवतार यांसारख्या प्रसंगांनी वातावरणात भक्तिभावाचा दरवळ पसरला आहे. येत्या दिवसांत कृष्णजन्म, वामन अवतार, रुक्मिणी विवाह व सुदामा चरित्र या विशेष प्रसंगांचे सुंदर सादरीकरण होणार आहे.या धार्मिक सोहळ्याचे यशस्वी आयोजन करण्यासाठी समितीचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठे परिश्रम घेतले आहेत. कार्यक्रमात चंदीराम नैनानी, श्रीचंद कोचर, डॉ. आदर्श गुजर, राजभाऊ गौळकार, मनोज चंदाराणा, रविंद्र गोयनका, भरत रूपारेल, हरिओम अग्रवाल, श्याम घोड़वैद्य आदी मान्यवर उपस्थित होते. ही माहिती प्रचारप्रमुख राजेश कोचर यांनी दिली.

# स्वप्नील पापडकर यांचे नाभिक संघटनेतर्फे अभिनंदनाचा वर्षाव

**आष्टी (शहीद) जनमाध्यम :** नाभिक समाजातील प्रतिभावान युवक स्वप्नील अशोकराव पापडकर यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत 'सहाय्यक आयुक्त' या प्रतिष्ठित पदावर निवड मिळवली आहे. त्यांच्या या यशामुळे नाभिक समाजासह संपूर्ण तालुक्याचा अभिमान वाढला आहे.

स्वप्नील पापडकर यांनी कठोर परिश्रम, सातत्य आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश मिळवले. त्यांच्या यशाने स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रेरणादायी उदाहरण मिळाले असून, ते अनेकांसाठी आदर्श ठरले आहेत. या यशाबद्दल आष्टी तालुका नाभिक समाज संघटनेच्या वतीने स्वप्नील पापडकर यांचा सत्कार करून त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले. संघटनेचे अध्यक्ष मोहण वानखडे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा गौरव केला आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी बोलताना अध्यक्ष मोहण वानखडे म्हणाले, 'स्वप्नील यांनी कष्ट, चिकाटी आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर समाजाचा सन्मान उंचावला आहे. त्यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही आत्मविश्वास मिळाला आहे. स्वप्नील अत्यंत नम्र, होतकरू आणि मायाळू स्वभावाचा युवक आहे. त्याच्या यशाचा आम्हाला प्रचंड अभिमान आहे. 'स्वप्नील पापडकर यांनी आपल्या यशाचे श्रेय कुटुंबीय, शिक्षक आणि मार्गदर्शकांना दिले. त्यांच्या या यशामुळे समाजात आनंदाचे वातावरण असून, सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अमरावतीत होणाऱ्या ३८ व्या पक्षिमित्र संमेलनात फोरमची सहभाग नोंद

**हिंगणघाट जनमाध्यम :** निसर्ग संवर्धनाची ओळख ठरलेला हिंगणघाट व समुद्रपूर तालुक्यामधील 'निसर्गसाथी फोरम' हा संस्थेचा पुढाकार आता राज्यस्तरावर झळकणार आहे. अमरावती येथे १ आणि २ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या ३८व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनात निसर्गसाथी फोरम सक्रिय सहभाग नोंदवणार आहे.या पार्श्वभूमीवर फोरमने वना नदी परिसरात पक्षी निरीक्षण मोहीम राबवून पूर्वतयारी केली. मोहिमेत अध्यक्ष डॉ. बालाजी राजुरकर, उपाध्यक्ष राजश्री विरुळकर, सचिव प्रभाकर कोळसे, सहसचिव नियाजुद्दीन सिद्दीकी, तसेच यशवंत गडवार, वासुदेव पडवे, मनोज गायधने, गुणवंत ठाकरे, राकेश झाडे, संगीता मस्कर आदी सदस्य सहभागी झाले. निरीक्षणात देशी व विदेशी मिळून २५ पक्ष्यांची नोंद करण्यात आली.निसर्गसाथी फोरमने वना नदी परिसरातील आजंती, शहालंगडी, डंकीन, कवडघाट, ब्रिज, शिरुड डॅम तसेच समुद्रपूर तालुक्यातील पोथरा डॅम व लालनाला प्रकल्प येथे नियमित निरीक्षण सुरू ठेवले आहे. लालनाला येथे फ्लेमिंगो पक्ष्याची पहिली नोंद घेण्याचा मान या फोरमला मिळाला आहे.हिंगणघाट तहसील कार्यालय परिसरातील पान पक्षांच्या वसाहतीचीही महत्त्वपूर्ण नोंद फोरमने घेतली आहे. ही सर्व माहिती व ताज्या नोंदी अमरावती संमेलनात सादर करण्यात येणार असून या माध्यमातून विविध पक्षीप्रकार, त्यांचे अधिवास व संवर्धन पद्धती जाणून घेऊन फोरमचे कार्य अधिक बळकट होणार असल्याचे अध्यक्ष डॉ. राजुरकर यांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव; नाणी डिझाईन स्पर्धा १६ नोव्हेंबरला

## प्रवेशाची अंतिम तारीख ५ नोव्हेंबर; निसर्गसाथी फाउंडेशन व ऐतिहासिक ग्रुपची संयुक्त संकल्पना

**हिंगणघाट जनमाध्यम :** विद्यार्थ्यांच्या कलात्मक प्रतिभेला व्यासपीठ देत भारतीय संस्कृती, विज्ञान आणि पर्यावरणाचे भान जोपासण्याच्या हेतूने निसर्गसाथी फाउंडेशन व ऐतिहासिक ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने नाणी डिझाईन स्पर्धा २०२५ हिंगणघाटमध्ये प्रथमच आयोजित केली जात आहे. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता आणि संस्कृतीप्रेम उभे राहणार आहे. या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, पर्यावरण, विज्ञान आणि राष्ट्रीय एकात्मतेबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि त्यांच्या कल्पकतेला चालना देणे हा आहे. विषयांमध्ये भारतीय संस्कृती, पर्यावरण संवर्धन, विज्ञान व तंत्रज्ञान, राष्ट्रीय एकात्मता, वन्यजीव, वन्यपक्षी व फुलपाखरू यांचा समावेश करण्यात आला आहे.स्पर्धा दोन गटात होणार आहे, विद्यार्थी गट (इयत्ता ८वी ते १०वी) आणि खुला गट (वयोमर्यादा नसलेला). नाण्याचे डिझाईन पूर्णपणे स्वतंत्र असावे व कोणत्याही प्रचलित नाण्याची नक्कल केलेली नसावी. डिझाईन ए४ किंवा ड्रॉईंग पेपरवर गोल, चौरस किंवा आयत (१०×१० से.मी. आकारापर्यंत) स्वरूपात रंगीत किंवा कृष्णधवल स्वरूपात सादर करता येईल. नाण्याच्या दोन्ही बाजूंचे डिझाईन आवश्यक असून, मागील बाजूस नाव, इयत्ता, शाळा, पत्ता व संपर्क क्रमांक नमूद करणे बंधनकारक आहे.स्पर्धेत प्रथम, द्वितीय, तृतीय तसेच प्रोत्साहन पुरस्कार देण्यात येतील.

सर्व सहभागींस प्रमाणपत्र दिले जाणार आहे. प्रवेशिका सादर करण्याची अंतिम तारीख ५ नोव्हेंबर असून, आपल्या शाळेतील चित्रकलाचार्य, पराग बुक डेपो (बिडकर कॉलेजजवळ) किंवा जी.बी.एम.एम. हायस्कूल, हिंगणघाट येथे सादर करता येतील.पुरस्कार वितरण समारंभ १६ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या हिंगणघाट नाणे प्रदर्शनीच्या समारोप कार्यक्रमात पार पडणार आहे. विद्यार्थ्यांसाठी आणि नागरिकांसाठी भारतीय संस्कृतीचे भान राखत सर्जनशीलतेला उजाळा देणारी ही एक अनोखी संधी ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# जुन्या वादातून रॉडने बदडले

**आर्वी :** जुन्या वादातून एकास रॉडने मारहाण करून जखमी करण्यात आले. धनोडी बहाद्दरपूर येथे ही घटना घडली. या प्रकरणी आर्वी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सूरज जानुस्कार (वय ३२) रा. धनोडी बहाद्दरपूर, असे जखमीचे नाव आहे. त्याच गावातील अविनाश शिरघरे याने सूरजच्या सेंट्रिंगच्या प्लेटा नेल्या होत्या. यामुळे दोघांत बोलचाल बंद होती. दरम्यान सूरज हा आठवडी बाजारात उभा होता. तेथे अविनाश शिरघरे हा रॉड घेऊन आला. सूरजच्या कानाजवळ त्याने रॉड मारला. यात तो जखमी झाला. या प्रकरणी आर्वी पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

# ५० हजारांचा ऐवज लंपास

**हिंगणघाट :** चोरट्याने महात्मा फुले वॉर्डातून ४९ हजार २०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. महात्मा फुले वॉर्डातील पौर्णिमा रंगारी (वय ६९) यांच्या घरातून चोरट्याने सोन्याच्या बांगड्या, तीन अंगठ्या, सोन्याचे दोन टॉप्स असा ४९ हजार २०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. या प्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी तक्रारीवरून गुन्हा दाखल केला आहे.

# जलसंपदा कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या नवीन कार्यकारिणीची निवड

**वर्धा जनमाध्यम :** महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र असलेल्या जलसंपदा कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., वर्धा या प्रतिष्ठित संस्थेची नवीन कार्यकारिणी नुकतीच निवडण्यात आली. या निवडणुकीत गौरव बुधालीया यांची अध्यक्षपदी, आरती तायडे यांची उपाध्यक्षपदी, तर पंकज आगलावे यांची मानद सचिवपदी सर्वानुमते निवड करण्१ात आली.

निवडणुकीचे कामकाज जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था वर्धा यांचे अधिकारी अनिल वडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पार पडले. यावेळी पतसंस्थेचे संस्थापक सचिव तथा कार्यलक्षी संचालक ओंकार धावडे यांच्या मार्गदर्शनाखाली नव्याने निवडून आलेल्या संचालक मंडळाने नवीन कार्यकारिणीवर पूर्ण विश्वास व्यक्त केला. संस्था स्थापनेपासून सातत्याने प्रगतीच्या वाटेवर पंकज आगलावे सचिव असून, आज ती महाराष्ट्रभर कार्यक्षेत्र असलेली स्वावलंबी आणि विश्वासार्ह संस्था म्हणून नावारूपास आली आहे. मी संस्थेच्या कार्यरत स्थापनेपासून असून, आता वयानुसार जबाबदारी नव्या पिढीकडे सोपविणे आवश्यक होते, असे संस्थापक सचिव ओंकार धावडे यांनी सांगितले. नवीन कार्यकारिणीबाबत सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# मंडळ अधिकाऱ्यांसमोर खाली केली चोरीची रेती

## ट्रॅक्टरसह पोबारा; पुलगाव पोलिसांत दोघांवर गुन्हा

**वर्धा जनमाध्यम :** शासनाचा महसूल बुडवणाऱ्या रेतीमाफियांना आता अधिकाऱ्यांची झळ बसत आहे. देवळी तालुक्यात चोरीची रेती वाहून नेणारा ट्रॅक्टर मंडळ अधिकाऱ्यांनी पकडला. मात्र ट्रॅक्टर मालकाने हुशारीने खेळ करत अधिकाऱ्यांसमोरच ट्रॅक्टरमधील रेती उतरवली आणि चालकासह वाहनासह पसार झाला. ही धक्कादायक घटना गुंजखेडा शिवारात २५ ऑक्टोबर रोजी घडली. या प्रकरणी पुलगाव पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.देवळी तालुक्यातील विविध रेती घाटांतील पाण्याची पातळी घटल्याने रेती उघडी पडली आहे. याच संधीचा फायदा घेत काहीजण रेतीची बेकायदेशीर वाहतूक करून चढ्या भावाने विक्री करीत असल्याचे दिसून येत आहे. या कारवायांमुळे शासनाचा मोठा महसूल बुडत असल्याने जिल्हा प्रशासनाने अशा चोरट्या उपशावर कडक कारवाईचे निर्देश दिले आहेत.नाचणगाव येथील मंडळ अधिकारी चंद्रशेखर मारोतराव कोल्हे यांनी २५ ऑक्टोबर रोजी गुंजखेडा शिवारात रेती भरलेला ट्रॅक्टर पकडला.

चौकशीअंती चालक प्रमोद राऊत (रा. हिवरा हाडके) हा चोरीची रेती वाहतूक करीत असल्याचे समोर आले. ट्रॅक्टर रोशन कैथल (रा. गुंजखेडा) याचा असल्याची माहिती मिळताच कैथल घटनास्थळी धावून आला. त्याने अधिकाऱ्यांशी वाद घालत चालकाला रेती खाली करण्याचा सल्ला दिला. कोल्हे यांच्या डोळ्यादेखतच राऊतने रेती उतरवली आणि दोघांनी ट्रॅक्टरसह पळ काढला.या घटनेवरून कोल्हे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार पुलगाव पोलीस ठाण्यात प्रमोद राऊत आणि रोशन कैथल यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रेतीमाफियांच्या या थरारक कारवायेमुळे प्रशासनावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक ३२९**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# दक्षता जनजागृती सप्ताहाला भ्रष्टाचार निर्मूलन शपथेने सुरवात

**अमरावती/प्रतिनिधीः-** लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे दि.२७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. दक्षता जनजागृती सप्ताहाला भ्रष्टाचार निर्मूलन शपथेने सुरवात करण्यात आली.

सदर सप्ताह दरवर्षी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दि. ३१ ऑक्टोबर रोजीच्या जन्मदिनानिमित्त आयोजित करण्यात येतो. या वर्षीच्या दक्षता जनजागृती सप्ताहाची संकल्पना ‘दक्षता आपली सामायिक जबाबदारी’ या घोषवाक्यावर आधारीत राहणार आहे. सप्ताहाची सुरुवात सोमवार, दि. २७ ऑक्टोबर रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र कार्यालयात भ्रष्टाचार निर्मूलनाची शपथ घेऊन करण्यात आली. यावेळी सप्ताहानिमित्त राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांनी दिलेल्या संदेशाचे वाचन करण्यात आले.



कार्यक्रमाला लाचलुचपत विभागाचे पोलीस अधीक्षक मारुती जगताप, अपर पोलीस अधीक्षक सचिंद्र शिंदे, पोलीस उपअधीक्षक सुनिल किनगे आदी उपस्थित होते. जनजागृती उपक्रमात अमरावती शहरातील बसस्थानक आणि जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात भिंतीपत्रके लावण्यात आली. तसेच नागरिकांना पत्रके वाटून जनजागृती करण्यात आली. दक्षता जनजागृती सप्ताहात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून भ्रष्टाचार निर्मूलन संबंधाने जनजागृतीपर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. भ्रष्टाचारा संबंधाने काहीही तक्रार असल्यास भ्रष्टाचार विरोधी तक्रारीसाठी फोन क्रमांक ०७२१/२५५३०५५ किंवा ०७२१/२६६४९०२, टोल फ्री क्रमांक : १०६४, व्हॉट्सअप क्रमांक: ७५१७५७१०६४ तसेच पोलीस अधीक्षक कार्यालय, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, कॅम्प, अमरावती येथे प्रत्यक्ष येऊन भेटावे, असे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केले आहे.

# दादासाहेब गवई यांच्या विचारांचे अनुकरण आवश्यक- प्राचार्य डॉ.कमलकर पायस

**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, उत्तम नगर, अमरावती येथे दादासाहेब गवई यांच्या ९६ व्या जयंतीमहोत्सवानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. कमलकर पायस यांनी ‘श्री. दादासाहेब गवई : जीवन व कार्य’ या विषयावर मार्गदर्शन करताना दादासाहेबांचे विचार राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन केले.

रामकृष्ण उर्फ दादासाहेब गवई हे सर्वसमावेशक विचारांचे द्रष्टे नेते होते. राजकारणात असताना त्यांनी कधीही गटबाजीलाच प्राधान्य न देता समन्वय, विकास



आणि सामाजिक न्याय या तत्त्वांचा अवलंब केला. समाज, राज्य आणि देश यांचा सर्वांगीण विकास हाच त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू होता, असेही डॉ. पायस म्हणाले.

शिक्षण क्षेत्रात त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण असून ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी त्यांनी शिक्षणाचे दरवाजे खुले केले. दर्यापूर सारख्या ग्रामीण भागात इंजिनियरिंग महाविद्यालय, कला-वाणिज्य महाविद्यालय, बी.एड., डी.एड., आयटीआय अशा शैक्षणिक संस्था स्थापन करून युवकांना रोजगाराभिमुख शिक्षणाची संधी दिली.

जयंती महोत्सवानिमित्त २५ ते ३० ऑक्टोबर २०२५ दरम्यान खालील उपक्रम राबविण्यात येत आहेत.

# श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयात राज्यस्तरीय नाट्योत्सवाचा दिमाखदार शुभारंभ!

**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथे राज्यस्तरीय नाट्योत्सवाचा भव्य व दिमाखदार शुभारंभ सर सी. व्ही. रमण ऑडिटोरियममध्ये मोठ्या उत्साहात पार पडला. या उद्घाटन सोहळ्याला सांस्कृतिक रंगत, कलाविष्कार आणि विद्यार्थ्यांच्या ऊर्जेची मेजवानी लाभली.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी भूषवले. उद्घाटन अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा-चांडक यांच्या हस्ते झाले. मुख्य अतिथी म्हणून अमरावती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता महापात्र उपस्थित होत्या. तसेच अनिल साबळे (विभागीय अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, अमरावती), डॉ. व्हि. जी. ठाकरे (सचिव, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती) यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. हर्षलता बुराडे (संचालक, राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूर) यांनी केले. स्वागतपर भाषण डॉ. जी. व्ही. कोरपे , प्राचार्य, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. पंकज नागपुरे समन्वयक, राज्यस्तरीय नाट्योत्सव, यांनी मानले.

या स्पर्धेत महाराष्ट्रातील आठ विभागांमधील आठ विजेत्या चमूंचा सहभाग आहे. परीक्षक म्हणून प्रख्यात लेखक-दिग्दर्शक डॉ. चंद्रकांत शिंदे, ज्येष्ठ रंगकर्मी प्राचार्य राजाभाऊ दखणे आणि प्राध्यापक डॉ. दिनेश खेडकर हे जबाबदारी पार पाडत आहेत.

**स्पर्धेत सहभागी संघ** - लातूर विभाग: सरस्वती विद्यालय, तामलवाडी (धाराशिव)

पुणे विभाग: न्यू इंग्लिश स्कूल, लांडेवाडी अमरावती विभाग: प्रभात किड्स स्कूल, अकोला मुंबई विभाग: पार्ले टिळक विद्यालय (इंग्रजी माध्यम), विलेपार्ले नाशिक विभाग: जनता विद्यालय, लोहोणेर (देवळा, नाशिक) मराठवाडा विभाग: संस्कार प्रबोधिनी विद्यालय, कमळापूर (गंगापूर, छत्रपती संभाजीनगर) कोल्हापूर विभाग: शांतिनिकेतन विद्यालय, सांगली

नागपूर विभाग: नूतन कन्या शाळा, भंडारा या नाट्योत्सवाच्या यशासाठी डॉ. पंकज नागपुरे, आय क्यू ए सी समन्वयक डॉ. संगीता इंगोले , डॉ. राजकुमार अवसारे, लक्ष्मीकांत बांते, तसेच राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूरचे पदाधिकारी आणि श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयातील विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थीवर्ग यांनी अथक परिश्रम घेतले. या राज्यस्तरीय नाट्योत्सवामुळे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या नाट्यगुणांना नवे व्यासपीठ लाभले असून, अमरावतीच्या सांस्कृतिक दालनात एक सोनेरी पान जोडले गेले आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अभिनंदन बँक इमारतीचे गुरुवारी लोकार्पण

**अमरावती/प्रतिनिधीः-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गुरूवार, दि. ३० ऑक्टोबर रोजी अभिनंदन बँक इमारतीचे गुरुवारी लोकार्पण होणार आहे.

